● पुणे, रविवार, ६ एप्रिल २०२५ ● RASHTRA SANCHAR-Vol-4-issue 128 ● वर्ष ४ थे, अंक १२८ ● किंमत ₹ ६ ● पाने : १२

# राष्ट्रसंचार

@rashtrasanchar.com Beyond The News





जिवंतपणे नरकयातना देणारा वैद्यकीय सेवेचा 'रथ' आणि त्याचे ' महारथी' P३



दिल्लीचा चेपॉकवर ऐतिहासिक विजय १२





# सरकारमान्य हेल्मेटसक्ती खुंटीला



■ नाना साळुंके

**पुणे :** सरकारी कार्यालयात प्रवेश करताना दुचाकीस्वारांना हेल्मेटसक्ती झालीच पाहिजे, अन्यथा कार्यालय प्रमुखांवरच थेट कारवाई करण्यात येईल असा इशारा खुद्द विभागीय आयुक्त डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार यांनी काढला होता. मात्र; त्यांचा हा इशारा शहरातील सर्वच कार्यालयांनी बासनात गुंडाळला आहे. धक्कादायक बाब म्हणजे या कार्यालयांमध्ये हेल्मेटविना चालक बिनधास्तपणे प्रवेश करत आहेत, त्यामुळे सरकारी 'बाबू'च नियमभंगाना खतपाणी घालत असल्याचे पुन्हा एकदा स्पष्ट झाले आहे.

गेल्या साडेचार महिन्यात हेल्मेट परिधान न केलेल्या जेमतेम अर्धा टक्के वाहन चालकांवर जुजबी आणि केवळ समज देण्याची कारवाई झाली आहे; परिणामी या 'सरकारमान्य' फतव्यामुळे शासकीय कार्यालयातील हेल्मेटसक्ती अक्षरश: खुंटीला टांगली गेली आहे.



## शासकीय कार्यालयेच घालताहेत नियमभंगाना खतपाणी

## सरकारी कार्यालयात सक्ती नाहीच

गेल्या काही वर्षांच्या कालावधीत शहर आणि महामार्गावरील अपघातांच्या संखेत मोठी वाढ झाली आहे, त्याशिवाय अनेकांना कायमचे अपगंत्त्व आले आहे. यातील बहुतांशी अपघात हे दुचाकीस्वारांचेच आहेत, त्यातूनच चिंतेची परिस्थिती निर्माण झाल्याने शहरात आणि महामार्गावर हेल्मेटसक्ती लागू करण्याचा निर्णय राज्य शासनाने घेतला होता. मात्र; प्रत्येकवेळी पुणेकरांनी या निर्णयाला जोरदार विरोध केल्याने राज्य शासनाला सपशेल माघार घ्यावी लागली होती. त्यावर मध्य तोडगा म्हणून या हेल्मेटसक्तीची सुरुवात पोलीस आयुक्तालयामध्ये अधिकारी, कर्मचारी ते नागरिकांना करण्यात आली होती.

### असा निघाला सक्तीतून अजब 'मार्ग'

- कारवाईचे अधिकार कार्यालयाच्या सुरक्षारक्षकांना
- पोलीसांना कार्यालयाच्या आत कारवाई करण्यास मनाई
- वाहनचालक आणि कर्मचारी घालताहेत सुरक्षारक्षकांशी हुज्जत
- कार्यालय प्रमुखांचे 'तेरे भी चूप मेरी भी चूप'
- वाहनचालकांमध्ये जनजागृतीच नाही
- सक्तीसाठी मुदतच नाही
- घाई केली अन् अंगाशी आली



"हेल्मेटसक्तीच्या संदर्भात विभागीय आयुक्तांनी कार्यालय प्रमुखांना सक्त सूचना दिल्या होत्या, तरीही शासकीय कार्यालयात त्याची प्रभावी अंमलबजावणी होउ शकली नाही. ही निश्चितच चिंतेची बाब आहे, पोलीसांना मर्यादित अधिकार असल्याने त्यामध्ये आम्ही गरजेपेक्षा जास्त हस्तक्षेप करु शकत नाही."

**— अमोल झेंडे,** वाहतूक पोलीस उपायुक्त, पुणे शहर

खुद्द पोलीस आयुक्तालयातच ही हेल्मेटसक्ती लागू झाल्याने ती बहुतांशी प्रमाणात यशस्वी ठरली आहे, त्यानंतर शहरातील सर्व शासकीय कार्यालयात ही हेल्मेटसक्ती लागू करण्याचा निर्णय घेण्यात आला. त्यासाठी खुद्द विभागीय आयुक्त डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार यांनी शहरातील सर्व शासकीय कार्यालयाच्या प्रमुखांची विभागीय आयुक्त कार्यालयात साडेचार महिन्यांपूर्वी महत्त्वपूर्ण बैठक आयोजित केली होती.

त्यानुसार प्रत्येक शासकीय कार्यालयात प्रवेश करताना दुचाकीस्वाराने हेल्मेट परिधान केलेच पाहिजे, असे परिपत्रक डॉ. पुलकुंडवार यांनी जारी केले होते. विशेष म्हणजे या नियमांची अंमलबजावणी न केल्यास संबधित कार्यालय प्रमुखांना दंडात्मक आणि खातेनिहाय कारवाई करण्याचा इशाराही विभागीय आयुक्तांनी या परिपत्रकाद्वारे दिला होता, त्याची तातडीने अंमलबजावणी करण्याचेही या बैठकीत सर्वानुमते ठरले होते.



"शासकीय अधिकारी आणि कर्मचाऱ्यां नाच हेल्मेटसक्ती नको असल्याचे यावरुन पुन्हा एकदा स्पष्ट झाले आहे, कोणत्याही सक्तीची सुरुवात स्वत:पासूनच व्हावी अशी नागरिकांची धारणा आहे. त्यातच अशा बाबी होत असल्याने सर्वसामान्य नागरिक नव्हे तर सरकारी बाबूच नियम मोडण्यात आघाडीवर असल्याचे अधोरेखित झाले आहे."

**— डॉ. सिद्धार्थ धेंडे,** प्रसिध्द सर्जन आणि माजी उपमहापौर, पुणे मनपा

विशेष म्हणजे हे परिपत्रक जारी करुन तब्बल साडेचार महिन्यांचा कालावधी उलटला आहे, तरीही या कालावधीत हेल्मेट परिधान करत नसल्याने जेमतेम अर्धा टक्केच वाहनचालकांवर आतापर्यंत कारवाई झाली आहे. विशेष म्हणजे या वाहनचालकांना कोणताही दंड न आकारता अथवा त्यांच्यावर कारवाई न करता त्यांना केवळ समज देण्यात आली आहे. त्यातूनच शासकीय कार्यालयातील 'सरकारमान्य' हेल्मेटसक्ती' अक्षरश: खुंटीला टांगली गेली आहे.

# असंवेदनशीलच ! खटकले तरी ते खरेच : फडणवीसांची स्पष्टोक्ती

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** देवेंद्र फडणवीस यांनी शुक्रवारी दिनानाथ मंगेशकर हॉस्पिटलबाबत कारवाईचे आदेश देताना 'असंवेदनशील' हा शब्द वापरला होता. त्यावर नाराजी व्यक्त करत दीनानाथ मंगेशकर हॉस्पिटलचे विश्वस्त डॉ. धनंजय केळकर यांनी एक पत्रक प्रसिद्धीस दिले. त्यात त्यांनी हा 'असंवेदनशील' शब्द खटकल्याचे म्हटले होते.

याबाबत शनिवारी मुख्यमंत्री फडणवीस यांनी पुण्यात आल्यानंतर आपली भूमिका पुन्हा एकदा स्पष्ट केली. पत्रकारांनी या पत्राबाबत विचारले असता, ना. फडणवीस यांनी मंगेशकर परिवाराचे कौतुक केले, परंतु तो प्रकार असंवेदनशीलच आहे, अशी पुनरुक्ती केली.

दीनानाथ मंगेशकर हे रुग्णालय लतादीदी आणि मंगेशकर परिवाराने खूप मेहनतीने उभारले आहे. हे रुग्णालय अत्यंत नावाजलेले आहे. या रुग्णालयात अनेक शस्त्रक्रिया आणि उपचार होतात. या रुग्णालयातील सगळ्याच गोष्टी चूक आहेत, असे म्हणता येणार नाही. कालचा प्रकार हा 'असंवेदनशील' होता. जिथे चूक आहे, तिथे चूक म्हणावं लागेल, अशा शब्दांत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दीनानाथ मंगेशकर रुग्णालयाचे प्रशासन आणि विश्वस्त मंडळाचे अप्रत्यक्षपणे कान टोचले.



दीनानाथ मंगेशकर रुग्णालयाला त्यांची चूक सुधारावी लागेल. ते ही चूक सुधारण्यासाठी प्रयत्न करणार असतील तर आम्हाला मला आनंद आहे, असे देवेंद्र फडणवीस यांनी म्हटले.

जोपर्यंत मी नेमलेल्या समितीचा अहवाल येत नाही, तोपर्यंत याप्रकरणावर बोलणे योग्य ठरणार नाही. मात्र, रुग्णालयाबाहेर आंदोलन करणे योग्य नाही. सरकारने या घटनेची दखल घेतली आहे. दोषींवर कायदेशीर कारवाई केली जाईल. पण 'शो बाजी' बंद झाली पाहिजे. डॉ. घैसास यांच्या रुग्णालयाची झालेली तोडफोड समर्थनीय नाही. त्यामध्ये भाजपची महिला आघाडी सहभागी असेल तरी हे कृत्य चूक आहे, असे फडणवीस यांनी सांगितले.

तत्पूर्वी देवेंद्र फडणवीस यांनी तनिषा भिसे यांच्या कुटुंबीयांची भेट घेतली. दीनानाथ मंगेशकर रुग्णालयातील दोषींवर कठोर कारवाई केली जाईल, असे आश्वासन मुख्यमंत्र्यांनी म्हटले. या प्रकरणात कारवाई केली जाणार आहे. मात्र, भविष्यात असे प्रकार घडू नयेत, यासाठी प्रयत्न केले जाणार आहेत. यासाठी एक एसओपी तयार करण्याचे काम सुरु आहे. या घटनेनंतर धर्मादाय आयुक्तांना नव्याने काही अधिकार देण्यात आले आहेत. भविष्यात त्यादृष्टीने » पान ७ वर


## जलसंपदा मंत्र्यांनी पुन्हा महापालिकेवर डागली तोफ

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**सांगोला :** राज्यात नद्यांच्या प्रदूषणाला महापालिका जबाबदार असून ते सर्व घाण पाणी थेट नद्यात सोडतात आणि त्यामुळेच नद्याची अवस्था दिवसेंदिवस वाईट बनत चाललेली असल्याची टीका राज्याचे जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी केली. सांगोला येथे आयोजित २१ व्या महाराष्ट्र सिंचन परिषदेचे उद्घाटन जलसंपदा मंत्र्यांच्या हस्ते करण्यात आले. मागील महिन्यात त्यांनी पुणे येथे देखील याबाबत सुतवाच केले होते. पुणे महापालिका हे अतिरिक्त पाणी वापरते आणि कुठलाही ट्रीटमेंट न करता पाणी धरणात सोडून देते याबद्दल त्यांनी नाराजी व्यक्त केली होती. यावेळी त्यांनी राज्यात सुरू केलेल्या नद्याजोड » पान ७ वर

## आंदोलनाचा कहर :

राष्ट्र संचार छायाचित्र सेवा



**पुणे :** लहुजी शक्ती सेनेच्या कार्यकर्त्यांनी हॉस्पिटलच्या गच्चीवर जाऊन आंदोलन केले. देविदास कसबे यांच्या नेतृत्वाखाली शेकडो लोकांचा समुदाय यावेळी संतप्त झाला होता

» सविस्तर वृत्त पान २ वर

## दुसऱ्या दिवशीही संतापाचा उद्रेक

**पुणे :** दीनानाथ मंगेशकर रुग्णालयातील असंवेदनशीलतेमुळे झालेल्या गर्भवती महिलेच्या मृत्यूप्रकरणी शनिवारी पुण्यात दुसऱ्या दिवशी देखील जनतेच्या संतापाचा उद्रेक दिसला. जनक शोध कमी करण्यासाठी शनिवारी दिनानाथ चे विश्वस्त डॉक्टर धनंजय केळकर यांनी एक पत्रक प्रसिद्धीस देऊन त्यामध्ये आपल्या काही प्रगतीचे ठोकताळे मांडले तथापि यापुढे कुठल्याही रुग्णाला उपचारासाठी ॲडमिट करून घेत असताना डिपॉझिट घेणार नसल्याचा निर्णय जाहीर केला. परंतु हे सर्व शहाणपण एका महिलेच्या मृत्यूनंतर उमगले का ? आता उपरती आली का ? अशा प्रक्षुद्ध प्रतिक्रिया पुणेकरातून उमटल्या.

शनिवारी दिवसभर सुमारे सात ते आठ आंदोलने झाली. लहुजी शक्ती सेनेने तर थेट दीनानाथ मंगेशकरच्या गच्चीवर जाऊन आंदोलन केले. सर्वच पक्षांचा आंदोलनामध्ये सहभाग होता.

# धनंजय मुंडेंना मोठा धक्का!

## करुणा मुंडेंकडून पोटगीचा दणका

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**मुंबई :** धनंजय मुंडे यांच्या पहिल्या पत्नी असल्याचा दावा करणाऱ्या करुणा मुंडे यांच्याकडून धनंजय मुंडे यांना पोटगीचा दणका मिळाला आहे. वांद्रे कोर्टाने दिलेला निकाल माझगाव कोर्टाने कायम ठेवला आहे. या निर्णयामुळे करुणा मुंडे यांना मोठा दिलासा मिळाला आहे. धनंजय मुंडेंचे अपील कोर्टाने फेटाळून लावले आहे.



धनंजय मुंडे यांनी कायमच करुणा मुंडे यांना पत्नीचा दर्जा देण्याला नकार दिलेला आहे. आम्ही » पान ७ वर

### खळबळजनक आरोप

- करुणा शर्मा यांनी धनंजय मुंडेंवर खळबळजनक आरोप केले आहेत. मला जो प्रेमात अडकवून लग्न करेल त्याला धनंजय मुंडे २० कोटींची ऑफर दिल्याचा आरोप करुणा शर्मा यांनी केला. यात त्यांनी धनंजय मुंडेंसह घनवट, पुरुषोत्तम केंद्रे, तेजस ठक्करवर यांच्या नावांचाही उल्लेख शर्मा यांनी केला. आपल्याला मोठमोठ्या दिग्दर्शकांकडून हिरॉईनची ऑफर होती असं करुणा शर्मा म्हणाल्या. धनंजय मुंडे यांनी आपल्या बदनामीचा कट रचल्याचा दावाही करुणा शर्मा यांनी केला.

# एकनाथ शिंदेंना पुन्हा धक्का

## मुनावळेच्या ड्रीम प्रोजेक्टला स्थगिती

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**मुंबई :** उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या डीम प्रोजेक्ट असलेल्या मुनावळे येथील जल पर्यटन प्रकल्पाला राज्याच्या मुख्य वनसंरक्षकाने स्थगिती दिली. काही दिवसापूर्वी अजित पवार यांच्या फाइल्स एकनाथ शिंदे यांच्यामार्फत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे जातील असा निर्णय घेऊन त्यांना दिलासा देण्यात आला होता परंतु त्यांच्या प्रकल्पांना धडाधड स्थगिती देण्याची मोहीम मात्र तशीच सुरू असल्याचे दिसून आले.

मागील वर्षी ८ मार्चमध्ये उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे मुख्यमंत्री असताना त्यांच्या ड्रीम प्रोजेक्टचे मुनावळे येथे जलपर्यटन प्रकल्पाचे उद्घाटन करण्यात आले. ग्रामीण भागात पर्यटन व्यवसायाला चालना देण्यासाठी राज्य शासनाने मुनावळे येथे आंतरराष्ट्रीय दर्जाचा जल पर्यटन प्रकल्प विकसित करण्याचे काम सुरू केले. मुनावळे हे ठिकाण केंद्रीय वन पर्यावरण मंत्रालयाने माननीय सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशाप्रमाणे पर्यावरण व जैवविविधतेच्या संरक्षणासाठी इकोसिन्सिव्ह झोन म्हणून जाहीर केला या ठिकाणी कोणतेही पर्यटन प्रकल्प राबवताना वन पर्यावरण आणि हवामान बदल मंत्रालय भारत सरकार, केंद्रीय वन्यजीव मंडळ, राज्य वन्यजीव मंडळ, स्थानिक सल्लागार समिती सह्याद्री व्याघ्र राखीव, महाराष्ट्र » पान ७ वर

# विश्वकल्याणासाठी 'नवकार'चे सामूहिक पठण

## भारतासह १०८ देशातील नागरिकांचा सहभाग

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** सध्याच्या काळात संपूर्ण जगात अशांती, हिंसा आणि अराजक माजलेले दिसते. यातूनच सर्वत्र नकारात्मक उर्जेचा प्रभावही वाढत आहे. अशा अस्थिर काळात मनाला शांती देणारा प्रभावी महामंत्र म्हणजे नवकार मंत्र. या मंत्राच्या एकाच वेळी जगभरात होणाऱ्या स्मरण आणि पठणाने सकारात्मक उर्जेची निर्मिती होऊन प्रत्येक प्राणिमात्रात शांती, अहिंसा, सदाचाराची भावना रुजवली जाईल याकरिता नवकार महामंत्राचे सामूहिक पठणाचे आयोजन करण्यात आले आहे.

धर्म, जात, पंथ यांच्या सीमा ओलांडून भारतासह १०८ देशांमधील नागरिक विश्वशांती आणि विश्वकल्याणाठी विश्व नवकार महामंत्र दिवसानिमित्त हे

"नवकार महामंत्राच्या सामूहिक पठणाने संपूर्ण विश्वात शांतता प्रस्थापित होण्यास, सकारात्मकता आणि आध्यात्मिक उर्जा निर्माण होण्यास मदत होणार आहे. नवकार महामंत्राच्या सामूहिक पठणाने जागतिक विक्रम प्रस्थापित होईल. नवकार महामंत्र पठण कुठल्याही जाती, धर्म, व्यक्तीशी निगडित नसून याद्वारे ब्रह्मांडातील सर्वश्रेष्ठ गुणांना वंदन केले जाते"

**— लक्ष्मीकांत खाबिया**



### विश्वशांतीसाठी उपयुक्त

- ६८ अक्षरांच्या या मंत्राचे पठण शरणागत भावाने एकाचवेळी करोडोंच्या संख्येने केले गेल्यास विश्वशांती आणि विश्वकल्याण होण्यास नक्कीच मदत होईल हे लक्षात घेऊन या अद्वितिय उपक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे, असे इंद्रकुमार छाजेड यांनी सांगितले. देश-विदेशातील अनेक धार्मिक गुरू, राजकीय नेते, अभिनेते, खेळाडू, सामाजिक कार्यकर्ते, उद्योजक यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवर त्या त्या ठिकाणी उपस्थित राहून अनुष्ठान करणार आहेत.

- पुणे येथील एस. पी. कॉलेज ग्राउंड, टिळक रोड येथे विश्व नवकार महामंत्र दिवसा निमित्त नवकार महामंत्राचा जप केला जाणार आहे.
- पुण्यातील उपक्रमात सहभागी होण्यासाठी केंद्रिय मंत्री मुरलीधर मोहोळ, राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार, ना. चंद्रकांत पाटील, ना. माधुरी मिसाळ तसेच पुण्यातील लोकप्रतिनिधींना निमंत्रण देण्यात आले आहे.





सामूहिक पठण होणार आहे. करोडो लोकांचा सहभाग असणाऱ्या या कार्यक्रमाचे आयोजन बुधवार, दि. ९ एप्रिल रोजी सकाळी ७.०२ ते ९.३६ या कालावधीत करण्यात आले आहे, अशी माहिती जितोचे चेअरमन इंद्रकुमार छाजेड, चिफ सेक्रेटरी दिनेश ओसवाल, सेक्रेटरी लक्ष्मीकांत खाबिया, » पान ७ वर



## भारती विद्यापीठ फार्मसीमध्ये सहआयुक्तांचे मार्गदर्शन

**पुणे :** भारती विद्यापीठ अभिमत विश्वविद्यालयाच्या पूना कॉलेज ऑफ फार्मसी(एरंडवणे,पुणे) तर्फे अन्न व औषध प्रशासन, पुणे विभागाचे सहआयुक्त गिरीश हुकरे यांच्या 'फार्मसी व्यवसायातील महानता, भविष्याच्या संधी आणि करिअर पर्याय' या विषयावरील व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते.या कार्यक्रमासाठी अन्न व औषध प्रशासन पुणे विभागाचे सहायक आयुक्त शाम प्रतापवार, पूना कॉलेज ऑफ फार्मसीचे प्राचार्य डॉ.आत्माराम पवार,उपप्राचार्य डॉ.वर्षा पोखरकर,उपप्राचार्य डॉ.एल.सत्यनारायण उपस्थित होते. फार्मसीच्या विद्यार्थ्यांसाठी आयोजित या कार्यक्रमाचे संयोजन ज्ञानदेवी मथुरे यांनी केले.

या कार्यक्रमात श्री.हुकरे यांनी आरोग्य व्यवस्थापन आणि रुग्ण समुपदेशन यामध्ये फार्मासिस्टच्या महत्वपूर्ण भूमिकेवर प्रकाश टाकला. 'औषधनिर्माण क्षेत्र हे आरोग्यसेवेमध्ये महत्वाची भूमिका बजावत आहे आणि भविष्यात औषधविषयक कायदे अजून कडक होणार असल्यामुळे विद्यार्थ्यांसाठी असंख्य संधी उपलब्ध आहेत',असे त्यांनी सांगितले.

## किआन फौंडेशनतर्फे 'भूमी' प्रदर्शनाचे आयोजन

**पुणे :** किआन फाउंडेशनतर्फे 'भूमी' या चित्र प्रदर्शनाचे आयोजन पुण्यात करण्यात आले आहे. प्रसिद्ध चित्रकार शंपा सरकार दास यांच्या कलाकृती यानिमित्ताने पुणेकरांना पाहायला मिळणार आहेत.

हे प्रदर्शन १० एप्रिल ते १७ एप्रिल या काळात सकाळी ११ ते सायंकाळी सहा या वेळेत बाणेर रस्त्यावरील किआन फाउंडेशनच्या कलादालनात पाहायला खुले असणार आहे. या प्रदर्शनाचे संयोजन फाउंडेशनच्या संस्थापक आरती नाईक यांनी केले असून, पृथ्वी आणि मानवामधील संबंध दर्शविणारी विविध चित्रे या प्रदर्शनात पाहायला मिळतील.

## 'हिकॅथॉन १.०' स्पर्धा संपन्न

**पुणे :** सिंबायोसिस स्किल्स अॅण्ड प्रोफेशनल युनिव्हर्सिटी (एसएसपीयू) येथे 'हिकॅथॉन १.०' स्पर्धा यशस्वीपणे पार पडली. यात आठ तासांच्या 'कॅप्चर द फ्लॅग' स्पर्धेत ४००हून अधिक विद्यार्थी सहभागी झाले होते. स्पर्धेतील विजेत्यांना पारितोषिके देण्यात आली.

कार्यक्रमात अरुण माने, ऋषिका डी., आदित्य शेंडे, शिफा सायकलवाला, रोहित गौतम, यश चव्हाण, अभिषेक भास्कर आणि ओंकार माळी यांनी मार्गदर्शन केले. 'एसएसपीयू'च्या संचालक डॉ. आराधना देशमुख म्हणाल्या, "हिकॅथॉन १.० स्पर्धेच्या निमित्ताने विद्यार्थ्यांच्या कौशल्यात भर पडते. हे कार्यक्रम शिक्षण आणि सहकार्य या दोन्हींचे महत्त्व मुलांना पटवून देतात.




## मोफत महाआरोग्य व रोगनिदान शिबिराचे आयोजन

**पुणे :** चंद्रय्या मारय्या भंडारी सामाजिक व शैक्षणिक संस्था, पुणे आणि रेड स्वस्तिक सोसायटी, पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने सोमवार, दि. 14 एप्रिल 2025 रोजी मोफत महाआरोग्य व रोगनिदान महाशिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. कै. सुनिलशेठ भंडारी यांच्या स्मृतीदिनानिमित्त हे शिबिर होत आहे.

शिबिर सकाळी 9.30 ते सायंकाळी 5 या वेळात हॉटेल रचना समोर, शिवाजी नगर, नवीन मेट्रो स्टेशन समोर येथे होणार आहे. या आरोग्य शिबिरामध्ये हृदय, मेंदू, यकृत, किडणी, अर्धांगवायू, ब्रेनस्ट्रोक, स्त्रीरोग, नेत्र तसेच कृत्रिम अंग प्रत्यारोपणासंदर्भात तपासणी केली जाणार आहे. बीपी, शुगर, थायरॉइड, ईसीजी व रक्ताच्या सर्व तपासण्यादेखील विनामूल्य केल्या जाणार आहेत. तपासणीनंतर आवश्यकतेनुसार वरील सर्व आजारांवर मोफत उपचार व शस्त्रक्रियाही केल्या जाणार आहेत. अशी माहिती चंद्रय्या मारय्या भंडारी सामाजिक व शैक्षणिक संस्थेचे अध्यक्ष मारुती भंडारी, रेड स्वस्तिक सोसायटीचे राज्य सचिव अशोक शिंदे यांनी आज पत्रकार परिषदेत दिली. जिल्हाध्यक्ष संतोष बारणे, सचिव सचिन भामरे, कोषाध्यक्ष कमलेश राक्षे, डॉ. बबन डोळस, नंदू रायगडे, डॉ. उमाकांत वाबळे, डॉ. सुपे, कॅप्टन ओमप्रकाश बहिवाल या वेळी उपस्थित होते.

## आंदोलनाची 'धडक'...!



**पुणे** गर्भवती महिलेच्या मृत्यूप्रकरणी असंवेदनशीलतेचा निषेध करण्यासाठी 'लोकजनशक्ती पार्टी राम विलास' तर्फे दीनानाथ मंगेशकर हॉस्पिटल समोर 'धडक आंदोलन ' करण्यात आले. आज ५ एप्रिल २०२५ रोजी हे आंदोलन करण्यात आले.




## लोकजनशक्ती पार्टीचे मंगेशकर हॉस्पिटल समोर आंदोलन

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** गर्भवती महिलेच्या मृत्यूप्रकरणी असंवेदनशीलतेचा निषेध करण्यासाठी 'लोकजनशक्ती पार्टी राम विलास' तर्फे दीनानाथ मंगेशकर हॉस्पिटल समोर 'धडक आंदोलन ' करण्यात आले. आज ५ एप्रिल २०२५ रोजी हे आंदोलन करण्यात आले. यावेळी जोरदार घोषणाबाजी करण्यात आली. लोकजनशक्ती पार्टी राम विलासचे पुणे शहर -जिल्हाध्यक्ष संजय आल्हाट,के.सी. पवार,राहुल उभे ,नारायण भिसे, विनोद साठे ,अपर्णा साठे,अनिल निघोज ,राम आल्हाट, रुग्ण हक्क परिषदेचे संस्थापक उमेश चव्हाण आदी उपस्थित होते.

# हॉस्पिटल धर्मादाय पैशाचा बाजार




■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** पुण्यात सरकारने दिलेल्या जागेवर तसेच शासन व महानगरपालिकेच्या प्रचंड सवलती लाटून थाटण्यात आलेल्या दीनानाथ मंगेशकर धर्मादाय रुग्णालयात अक्षरशः माणुसकीला काळीमा फासणारा प्रकार घडला. केवळ पैसे भरले नाहीत म्हणून सौ. तनिषा भिसे या गर्भवती भगिनीला उपचार नाकारण्यात आले. उपचाराअभावी या भगिनीचा मृत्यू झाला आणि जुळी बाळे मातेला पोरकी झाली. त्यास पूर्णपणे दीनानाथ मंगेशकर रुग्णालयाचे मुर्दाड प्रशासन जबाबदार असून त्याविरोधात आज राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षामार्फत निषेध आंदोलन करण्यात आले.

शरदचंद्र पवार मुख्यमंत्री असताना पुणेकरांना धर्मादाय रुग्णालयामार्फत आरोग्य सेवा मिळेल या हेतूने मंगेशकर कुटुंबियांना सरकारची हजारो कोटी रुपयांची ही ६ एकर जागा मोफत दिली. परंतु, या हॉस्पिटल प्रशासनाने धर्मादाय हॉस्पिटलचे सर्व नियम धाब्यावर बसवून केवळ धनदांडग्यांसाठीच हे हॉस्पिटल असल्याचे वारंवार सिद्ध केले आहे. आर्थिक दुर्बल घटकांतील रुग्णांसाठी १० टक्के खाटा राखीव ठेवण्याची तरतूद असतानाही त्याची अंमलबजावणी केली जात नाही. या रुग्णालयाला तनिषाताईच्या मृत्यूस जबाबदार धरून मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करावा, शासनाने मोफत दिलेली जमीन परत घ्यावी, रुग्णांची लूट करून प्रचंड माया जमविलेल्या रुग्णालय प्रशासन, मंगेशकर कुटुंबिय आणि डॉक्टरांची चौकशी करण्यात यावी.

या आंदोलनास शहराध्यक्ष प्रशांत जगताप ,लक्ष्मीताई दुधाने, स्वातीताई पोकळे, किशोर कांबळे,अजिंक्य पालकर, स्वप्निल दूधाने, गिरीश गुरनानी, दीपक जगताप,दीपक कामठे, वैभव कोठुळे,पूजा काटकर,सुरेश गुजर, त्रिंबक मोकाशी, रचना ससाणे,गणेश नलावडे, मंजिरीताई घाटगे, रूपालीताई शेलार,पंडित कांबळे,आसिफ शेख, हेमंतकाका बधे आणि पक्षाचे पदाधिकारी तसेच कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## शिक्षण विभागाच्या माहितीचे एकत्रीकरण

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** शालेय शिक्षणमंत्री विभागाने याबाबतचा शासन निर्णय प्रसिद्ध केला. राज्यातील सर्व शाळांबाबतची माहिती केंद्र शासनाच्या 'यूडायस प्लस' या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. त्यात शाळा, विद्यार्थिसंख्या, शिक्षकसंख्या, शाळांमध्ये उपलब्ध भौतिक सुविधा, संगणकीय सुविधा यांबाबत माहितीचा समावेश आहे. या माहितीचा उपयोग आणि वापर शासन स्तरावर विविध धोरणे, कार्यक्रमांची आखणी, तसेच अंमलबजावणी आराखडा तयार करताना होतो. मात्र, गाव, चावड्या, वस्ती यांचे ठिकाण, लोकसंख्येची घनता, तसेच उपलब्ध जिल्हा, राज्यमार्ग, महामार्ग, राष्ट्रीय महामार्ग, दोन शाळांमधील अंतर, शाळांच्या नजीक शासनाच्या इतर विभागांद्वारे उपलब्ध सोयीसुविधा याबाबतची माहिती शालेय शिक्षण विभागाकडे सद्यःस्थितीत उपलब्ध नाही.

त्यामुळे ही कमतरता भरून काढण्यासाठी 'एमआरएसएसी'सोबत करारनामा करण्यात आला आहे. त्यामुळे 'एमआरएसएसी'कडे उपलब्ध विविध विभागांची माहिती, 'यूडायस प्लस' या संकेतस्थळावरील शालेय शिक्षण विभागाची माहिती यांचे एकत्रीकरण करून माहिती एका स्वतंत्र डॅश बोर्डवर उपलब्ध करण्यात येणार आहे.

त्यामुळे या माहितीचा उपयोग शालेय शिक्षण विभागास संबंधित विविध योजनांच्या आखणी आणि अंमलबजावणीसाठी होणार असल्याचे नमूद करण्यात आले आहे. राज्यातील सर्व शाळा, अंगणवाडी केंद्रांचे छायाचित्रांसह 'जिओ टॅगिंग' करण्यात येणार आहे. महाराष्ट्र रिमोट सेन्सिंग ॲप्लिकेशन सेंटरद्वारे (एमआरएसएसी) हे काम करण्यात येणार असून, त्यासाठी १ कोटी ४ लाख रुपये खर्च करण्यास मान्यता देण्यात आली आहे.

'एमआरएसएसी'द्वारे राज्यातील सर्व शाळा, अंगणवाडी केंद्रांचे मॅपिंग अक्षांश व रेखांशांसह करण्याची प्रक्रिया मोबाइल ॲपद्वारे करण्यात येणार आहे. त्यात राज्यातील विविध विभागांमार्फत कार्यरत सर्व शाळा, तसेच अंगणवाड्यांबाबतची माहिती संकलित करण्यात येणार आहे. या प्रकल्पासाठी १ कोटी ४ लाख रुपये खर्च केले जाणार असल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे.

## गांधर्व महाविद्यालय, आणि व्यक्ताव्यक्त तर्फे 'रामपर्व'

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** रामायणातील काही दुर्लक्षित व्यक्तिरेखांवर आधारित 'रामपर्व' या अनोख्या सांगीतिक कार्यक्रमाचे गांधर्व महाविद्यालय, पुणे आणि व्यक्ताव्यक्त, पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने बुधवार, दि. ९ एप्रिल रोजी आयोजन करण्यात आले आहे.

रामायण हा भारतीयांचा अगदी जिव्हाळ्याचा विषय आहे. प्रत्येक हिंदू माणसाच्या मनात प्रभू रामाचे अढळ स्थान आहे. अयोध्येतील राम मंदिराची उभारणी पूर्ण झाल्यानंतर समस्त भारतीयांच्या आनंदाला पारावार उरला नाही. रामायणात अशा काही व्यक्तिरेखा आणि प्रसंग आहेत ज्यावर कदाचित काव्य रचले गेलेले नाही. हाच दुवा धरून त्या व्यक्तिरेखा आणि प्रसंगावर आधारित काही काव्यरचना कवी अमित गोखले (पार्थ) यांनी रचल्या आहेत. गीतरामायणातील अविट गोडी असलेल्या रचनांप्रमाणेच 'रामपर्व' कार्यक्रमातील रचनांना संगीतकार हेमंत आठवले आणि जान्हवी गोखले यांनी संगीतबद्ध केले असून ते रचना सादर करणार आहेत. शुभदा आठवले, केदार तळणीकर, अवधूत धायगुडे, वेधा पोळ साथसंगत करणार आहेत.

रसिकांसमोर नवनिर्मितीचा आनंद 'रामपर्व'द्वारे प्रकट करण्याचा मानस आहे, असे कार्यक्रमाचे संयोजक हेमंत आठवले यांनी निवेदनाद्वारे कळविले आहे. कार्यक्रम रसिकांसाठी खुला आहे.



**पुणे** रोटरी क्लब ऑफ पुणे हेरिटेजतर्फे दिनांक ५ एप्रिल ते १९ एप्रिल या कालावधीत विश्वमराठी एकांकिका स्पर्धा आयोजित करण्यात आली असून या स्पर्धेच्या उदघाटन प्रसंगी प्रसिध्द ज्येष्ठ अभिनेते रवींद्र मंकणी यांच्याशी लीना गोगटे आणि अविनाश ओगले यांनी संवाद साधला. यावेळी व्यासपीठावर कार्यक्रमाचे अध्यक्ष रोटरी डिस्ट्रीक्ट ३१३१ च्या डिस्ट्रीक्ट गव्हर्नर शीतल शहा, सी.ए. प्रमोद जोशी, रोटरी क्लब ऑफ पुणे हेरिटेजचे अध्यक्ष सूर्यकांत वझे आदी उपस्थित होते.

# भूमिका प्रेक्षकांपर्यंत ताकदीने पोहोचविणे कलाकाराचे उद्दिष्ट : रवींद्र मंकणी




■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** कोणत्याही कलाकारास त्याची सर्वोत्तम भूमिका कोणती असे विचारल्यास त्याचे उत्तर देणे अवघड असते. कारण शेवटच्या प्रेक्षकांपर्यंत आपली भूमिका पोहोचविणे हे खऱ्या कलाकाराचे एकमेव उद्दिष्ट असते. रसिकांच्या मनात त्या कलाकाराच्या एखाद्या भूमिकेने घर केलेले असेल म्हणून त्याची ती भूमिका सर्वोत्तम म्हणून त्या कलाकारालाही आवडली असेल, असे नाही, असे मत प्रसिध्द ज्येष्ठ अभिनेते रवींद्र मंकणी यांनी व्यक्त केले.

रोटरी क्लब ऑफ पुणे हेरिटेजतर्फे दिनांक ५ एप्रिल ते १९ एप्रिल या कालावधीत विश्वमराठी एकांकिका स्पर्धा आयोजित करण्यात आली असून या स्पर्धेच्या उद्घाटन प्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून प्रसिध्द ज्येष्ठ अभिनेते रवींद्र मंकणी बोलत होते. व्यासपीठावर कार्यक्रमाचे अध्यक्ष रोटरी डिस्ट्रीक्ट ३१३१ च्या डिस्ट्रीक्ट गव्हर्नर शीतल शहा, सी.ए. प्रमोद जोशी, रोटरी क्लब ऑफ पुणे हेरिटेजचे अध्यक्ष सूर्यकांत वझे, विश्वमराठी एकांकिका स्पर्धचे संयोजक अविनाश ओगले आणि लीना गोगटे आदी मान्यवर उपस्थित होते. यावेळी नाट्य आणि चित्रपटसृष्टीतील ज्येष्ठ रंगकर्मी माधव वझे आजही कार्यरत असल्याबद्दल त्यांचा विशेष सन्मान करण्यात आला. न्यूझीलंडमधील 'खेळ' आणि सिडनीमधील 'आपला तो बाब्या' या दोन एकाकिकांच्या सादरीकरणाने या स्पर्धेचे उद्घाटन झाले. लीना गोगटे आणि अविनाश ओगले यांच्या संकल्पनेतून ही स्पर्धा आयोजित करण्यात आली आहे. यावेळी संयोजक लीना गोगटे आणि अविनाश ओगले यांनी रवींद्र मंकणी यांच्याशी प्रकट मुलाखतीद्वारे संवाद साधला. यावेळी बोलताना रोटरी डिस्ट्रीक्ट ३१३१ च्या डिस्ट्रीक्ट गव्हर्नर शीतल शहा म्हणाले की, अशा सांस्कृतिक उपक्रमातून भाषा आणि कला जागृत ठेवण्यासाठी रोटरी क्लब कायम सगळ्यांच्या मागे उभी राहील. यावेळी बोलताना सी.ए. जोशी म्हणाले की, एकांकिका आणि नाटक हा मराठी संस्कृतीचा एक भाग आहे. संगीत नाटक रंगभूमीच्या काळात वन्स मोअरचे युग होते, ती वाटचाल आता एकांकिकांपर्यंत येऊन ठेपली आहे. यावेळी सी.ए. भरत फाटक यांनी मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक रोटरी क्लब ऑफ पुणे हेरिटेजचे अध्यक्ष सूर्यकांत वझे यांनी केले. विश्वमराठी एकांकिका स्पर्धचे संयोजक अविनाश ओगले आणि लीना गोगटे यांनी स्पर्धा आयोजित करण्यामागील भूमिका विशद केली. माधुरी मराठे यांनी सूत्रसंचालन केले, तर कविता अभ्यंकर यांनी आभार मानले.



सीओईपी सारख्या नावाजलेल्या अभियांत्रिकी महाविद्यालयातून सिव्हील इंजिनिअरिंगचे शिक्षण घेतलेल्या मला अभिनयाने खेचून घेतले. यामागे शालेय जीवनात मी करीत असलेल्या भूमिकांना शिक्षकांनी दिलेले प्रोत्साहन हे एक कारण होते.

— **रविंद्र मंकणी,** ज्येष्ठ अभिनेते


# बजेटमध्ये स्टायलिश लूक

सुंदर माझं घर

गृ हसजावट म्हटली की पैसा बराच लागणार हे अगदी ठरलेलं. घराची सजावट करायची ठरवल्यावर कोणत्या इंटिरियर डिझायनरचा सल्ला घ्यावा, त्याला किती पैसे द्यावे लागतील असा प्रश्न सगळ्यांनाच पडतो. पण, आपण आपल्या बजेटमध्येही घराची चांगली सजावट करु शकतो. त्यासाठी काही वस्तू बाजारातून आणाव्या लागतील आणि त्या घरात ठेवून सुंदर गृहसजावट करता येऊ शकते.

आपल्या घराच्या भिंतींना आर्टिस्टीक लूक द्यायचा असेल तर प्लेन भिंतीवर हाताने सुंदर वेल किंवा फूल काढावं. यामुळे आपल्या घराची भिंत उठून दिसेल. त्याचप्रमाणे भिंत चांगली दिसण्यासाठी आपल्याला वॉलपेपर लावण्याचीही गरज भासणार नाही. घरातील लिव्हींग रुम आणि वर्किंग रुमच्या सजावटीत सारखेपणा असावा. त्यामध्ये एकाच रंगाच्या मॉड्यूलर फर्निचरचा उपयोग करावा. त्यामुळे वर्किंग रुम आणि लिव्हींग रुम कोठून सुरु होते हे आपल्याला कळू शकेल. घरातील पडद्यांसाठी स्ट्राईप्ड फॅब्रिक्चा वापर करावा. व्हर्टिकल स्ट्राईप्ड फॅब्रिकच्या पडद्याच्या वापरामुळे खोलीच्या सजावटीत चांगली भर पडेल.

आजकाल सोफ्यासाठी फॉर्मल फ्लोरल फॅब्रिकची चलतीत आहे. जॅकार्ड आणि वेलवेटसारखं दिसणारं फॅब्रिक सोफ्याला रिच लूक मिळवून देणारं ठरतं. प्लेन सोफ्याबरोबर फ्लोरल फॅब्रिक असणारी खुर्चीही शोभून दिसेल. लेदरच्या सोफ्यामुळे खोलीचं सौंदर्य वाढतं. आपल्याला फ्लोरल प्रिंटस आवडत नसतील तर संपूर्ण घराला नाही पण, घराच्या थोड्या भागात त्याचा वापर करुन घराला स्टायलिश लूक देऊ शकता. आपल्या खोलीचं सौंदर्य आणखी वाढवण्यासाठी तेथे कलर्ड ग्लासेस आणि स्टोनचा वापर करता येऊ शकतो. आपल्या घरात जागेचा अभाव असेल तर जापनीज स्टाईल्च्या बेडचा वापर करु शकता. ही जमिनीच्या अगदी बरोबर असतात. लिव्हींग रुमची शोभा वाढवण्यासाठी आकाशी, निळा, लेमन किंवा बेज कलर यासारख्या रंगांची निवड करु शकता. घराला नवं रूप देण्यासाठी आपल्या बजेटच्या हिशेबाने काही नवीन आणि हलक्याफुलक्या ॲक्सेसरीजची खरेदी करावी. यामुळे घराला स्टायलिश लूक मिळेल.




# सहाय्यकाची मदत हवीच

फिटनेस

दी र्घकाळ फिट ॲंड फाईन रहायचं असेल तर व्यायामाला पर्याय नाही. विशेषत: एखाद्या शस्त्रक्रियेनंतर शरीराच्या विशिष्ट भागाला व्यायाम देणं अत्यंत गरजेचं असतं. अशावेळी पर्सनल ट्रेनरची गरज भासते. हा सहाय्यक तुम्हाला व्यायामासाठी मदत करतोच त्याचबरोबर तुमचं मानसिक आरोग्य उत्तम राखण्यासाठी सहाय्यभूत ठरू शकतो. एखाद्या शस्त्रक्रियेनंतर, मोठ्या आजारानंतर व्यायामाची गरज भासते. तुमची शारीरिक अवस्था, वय, क्षमता आणि गरज लक्षात घेऊन हा सहाय्यक तुमच्याकडून व्यायाम करवून घेतो. बरेचदा डॉक्टरांनी वजन कमी करण्यासाठी निकराचे प्रयत्न करण्याविषयी सुचवलेलं असतं. तुम्हाला वाढलेलं पोट कमी करायचं असतं, वाढत्या वजनावर नियंत्रण ठेवणं गरजेचं असतं, दररोज चार-पाच किलोमीटर चालणं गरजेचं असतं. तुमच्या एकट्याच्यानं हे काम होणे नाही. अशावेळी पर्सनल ट्रेनर मित्र म्हणून जवळ येतो. बरेचदा व्यायामामध्ये मोठा खंड पडलेला असतो.

तेव्हा शास्त्रशुद्ध व्यायाम करण्यासाठी ट्रेनरची गरज भासते. अनेकांना चारचौघात घाम गाळणं आवडत नाही. त्यांना खाजगीपण जपत शरीरस्वास्थ जपायचं असतं. अशांनी पर्सनल ट्रेनरची मदत घ्यावी. पर्सनल ट्रेनर सुरक्षिततेच्या



सर्व बाबी लक्षात घेऊन तुमच्याकडून व्यायाम करुन घेतो. त्याचं वेळापत्रक शास्त्रशुद्ध असतं. कमीत कमी कष्टात जास्तीत जास्त परिणाम मिळवून देण्यासाठी त्याचा सल्ला उपयुक्त ठरतो. त्याच्या देखरेखीखाली अपघातांची शक्यता टळते. कमीत कमी वेळेत आवश्यक तो व्यायाम घडतो. म्हणूनच गरज असेल तर पर्सनल ट्रेनरची मदत घ्यायलाच हवी.

दीक्षा छाब्रा यांचं वजन एकेकाळी १०० किलो होतं यावर कोणाचाही विश्वास बसणार नाही; एवढ्या त्या आज बदलल्या आहेत. नऊ वर्षांच्या मुलाची आई असलेल्या दीक्षा 'मिसेस अर्थ २०१७' स्पर्धेत उपविजेत्या ठरल्या. त्याच वर्षी त्यांना 'मिसेस बॉडी फिट'चा किताबही मिळाला. आज त्या 'फिटनेस गुरु' आहेत. जगभरातल्या ३०० महिला आणि पुरुषांना त्यांनी फिटनेसचं प्रशिक्षण दिलं आहे.

# फ्रॉम 'फॅट टू फिट'

मानिनी

सा धारण सात-आठ वर्षांपूर्वी दीक्षा छाब्रा यांचं वजन १०० किलो होतं. हायपोथायरॉइडिझम आणि पीसीओडी अशा विकारांनी त्यांना ग्रासलं होतं. मात्र या सर्व अडचणींवर मात करत त्या फिटनेस गुरु बनल्या. जगभरातल्या ३०० महिला आणि पुरुषांना त्यांनी फिटनेसचे धडे दिले आहेत. त्या सोशल मीडियावरचं प्रभावशाली व्यक्तिमत्त्व आहेत. 'मिसेस अर्थ २०१७' या सौंदर्यस्पर्धेत त्या उपविजेत्या ठरल्या. 'मिसेस बॉडी फिट' हा किताबही त्यांना मिळाला. ५ फूट ७ इंच उंची असलेल्या दीक्षा यांचं वजन आता ६० किलो आहे. 'फॅट टू फिट' बनण्याचा त्यांचा हा प्रवास प्रेरणादायी आहेच शिवाय जिद्द, महत्त्वाकांक्षा आणि झपाटलेपण यांचं प्रतीकही आहे.

दीक्षा छाब्रा या पारंपरिक पंजाबी कुटुंबातल्या सून. शाळेत व्यवस्थापक म्हणून त्या नोकरी करायच्या. घर आणि नोकरी अशी दुहेरी कसरत करताना त्यांची पार दमछाक व्हायची. दीक्षा यांचे पती लष्करात असल्यामुळे त्यावेळी चार वर्षांच्या मुलाची जबाबदारीही त्यांच्यावरच असायची. व्यायामाला अजिबात वेळ मिळत नसल्याने त्यांचं वजन वाढू लागलं. माहेरचे सर्वजण वजनदार असल्यामुळे अनुवंशिक कारणांमुळे आपलं वजन वाढत असल्याचा विचार करून दीक्षा यांनी सुरुवातीला याकडे दुर्लक्ष केलं. जीवनशैली, ताणतणाव यांना दोष दिला पण खाण्याचं प्रमाण कमी करूनही वजनकाटा ९० च्या घरातच असायचा. मग त्यांनी आरोग्य तपासणी करून घ्यायचं ठरवलं. कॉलेजच्या पुनर्मिलन कार्यक्रमातही काही मैत्रिणींनी त्यांना टोकलं. कॉलेजमध्ये एनसीसी कॅडेट आणि ॲथलिट असणाऱ्या दीक्षा यांची ही अवस्था त्यांच्या मैत्रिणींना बघवली नाही.

वैद्यकीय चाचणीत त्यांना हायपोथायरॉइडिझम आणि पीसीओडी असल्याचं निदान झालं. त्याच वेळी त्यांच्या सासूलाही कर्करोगाचं निदान झाल्याने दीक्षा यांची खूप धावपळ व्हायची. सासूबाईंच्या निधन झाल्यानंतर त्यांनी नोकरी सोडली. मधल्या काळात त्यांचं स्वत:कडे पूर्ण दुर्लक्ष झालं. पण जानेवारी २०१६ मध्ये त्यांनी आपल्या फिटनेसकडे लक्ष द्यायचं ठरवलं. त्यांनी चालायला सुरुवात केली. फक्त दोन किलोमीटर अंतर चालल्यानेही त्यांना धाप लागायची. पण त्या थांबल्या नाहीत. 'यू ट्यूब'वरचे व्हिडिओ बघून त्यांनी इतर व्यायामप्रकारही सुरू केले. घरी ट्रेड मील आणलं. यामुळे सात महिन्यात त्यांचं वजन १८ किलोंनी कमी झालं. यश आता दृष्टिपथात येऊ लागलं होतं. त्यांनी प्रशिक्षकांची मदत घेतली, जीममध्ये गेल्या. यामुळे पुढच्या सात महिन्यात वजन आणखी १२ किलो कमी झालं. २०१७ मध्ये त्या 'मिसेस अर्थ' स्पर्धेत सहभागी झाल्या. दीड वर्षांपूर्वी त्यांनी 'दीक्षा छाब्रा फिटनेस कन्सल्टेशन'ची सुरुवात केली. त्यांना काही पुरस्कारही मिळाले आहेत.

आयुष्यातल्या अडचणींवर मात करत स्वत:ची ओळख निर्माण करणाऱ्या दीक्षा छाब्रा यांचा हा प्रवास अनेकींना प्रेरणा देईल.




स्मार्ट टिप्स

## टिकवा खोट्या पापण्या



सध्या 'आयलॅश एक्सटेंशन' म्हणजे खोट्या पापण्यांचा ट्रेंड जोरात आहे. मात्र या पापण्या डोळ्यांवर जास्त काळ टिकून रहाव्यात यासाठी काही गोष्टींकडे लक्ष द्यायला हवं. या पापण्या खऱ्या पापण्यांवर चिकटवल्या जातात. त्यामुळे डोळ्यांमधून पाणी येणार नाही आणि खोट्या पापण्यांचा गम निघणार नाही. पापण्या लावल्यानंतर डोळ्यांना वारंवार हात लावू नका. खोट्या पापण्या लावल्या असतील तर मस्कारा, आयलायनरचा वापर शक्यतो टाळा.

हेअर केअर

## लाभदायी चमेलीचं तेल

बाजारात वेगवेगळ्या प्रकारची तेलं उपलब्ध आहेत. केसांच्या वाढीत प्रत्येक तेलाचं वेगळंच महत्त्व असतं. उन्हाळ्यात तुम्ही चमेलीचं तेल लावायला हवं. घामामुळे स्कॅल्पला जंतूसंसर्ग होण्याची शक्यता असते. चमेलीच्या तेलातल्या जंतूविरोधी गुणधर्मामुळे हा त्रास कमी होतो. चमेलीचं तेल उत्तम कंडिशनरही आहे. त्वचेवरचे स्ट्रेच मार्क दूर करण्यासाठीही चमेलीचं तेल उपयुक्त ठरतं.



पॅरेंटिंग

## मुलांना सोशल बनवा

आपलं मूल सगळ्यात पुढे असावं ही प्रत्येक मातापित्याची इच्छा असते. हे साधण्यासाठी लहानपणापासूनच मुलांच्या संगोपनाकडे लक्ष द्यावं. त्यांच्या शारीरिक आणि मानसिक विकासाचा वेध घ्यावा. समाजातील एक घटक म्हणून वावरण्यास सक्षम होण्यासाठी मुलांना सोशल बनवणं ही पालकांची जबाबदारी ठरते. त्यासाठी त्यांना सामाजिक उपक्रमांमध्ये कृतीशील करावं. मुलांना प्रत्येक सोशल फंक्शनला अवश्य घेऊन जावं. प्लीज, सॉरी, थँक्यू यासारख्या शब्दांचा योग्य वापर शिकवावा. त्यांच्यामध्ये शेअरिंगचं कौशल्य वाढवावं. येणाऱ्या प्रत्येक अडचणीचा सामना करण्यास त्यांना सज्ज करावं.

# थंडगार 'फ्रुटी क्रीम'

रसगंधा

घ री पाहुणे आले किंवा बच्चेकंपनी असेल तर सर्रास आईस्क्रीम आणलं जातं. मात्र एखाद्या दिवशी वेगळं डेझर्ट खाण्याची इच्छा असेल तर 'फ्रुटी क्रीम' ट्राय करा. हे थंड 'फ्रुटी क्रीम' घरातल्या प्रत्येकाला नक्कीच आवडेल.

साहित्य: ४०० ग्रॅम क्रीम, ७० ग्रॅम पिठीसाखर, सफरचंद, आंबा, डाळिंब, केळं, किवी प्रत्येकी एक. २५० ग्रॅम द्राक्षं, अननसाचे चार ते पाच काप, ६-७ काजू, बदाम, दोन चमचे बेदाणे.

कृती: सर्वप्रथम हँड ब्लेंडरने क्रीम फेटून घ्या. क्रीम घट्ट असायला हवं. आता यात पिठीसाखर घाला. यानंतर पुन्हा क्रीम फेटून घ्या. पिठीसाखर क्रीममध्ये एकजीव व्हायला हवी. सर्व फळं धुवून त्यांचे छोटे तुकडे करा. हे तुकडे क्रीममध्ये घाला. फळं क्रीममध्ये नीट मिसळून घ्या. सुक्या मेव्याचे बारीक तुकडे करुन घ्या. बेदाण्याच्या दांड्या काढून टाका. सर्व सुका मेवा क्रीम आणि फळांच्या मिश्रणात घाला. अननस, स्ट्रॉबेरी किंवा व्हॅनिला सॉसने 'फ्रुटी क्रीम'ला ड्रेसिंग करता येईल. यामुळे चव अधिक चांगली लागेल. यानंतर हे मिश्रण दोन तासांसाठी फ्रीजमध्ये ठेवा. जास्त गार हवं असेल तर चार तास फ्रीजरमध्ये ठेवता येईल. हे 'फ्रुटी क्रीम' ग्लासमध्ये भरून खायला द्या.



# नाचू आनंदे

महिलायन

स ध्या लग्नसोहळ्याचं स्वरुप बदलत आहे. पूर्वी लग्नाच्या वेळी वधूपक्ष पाहुणचार करण्यात तर वरपक्ष कोडकौतुक पुरवून घेण्यातच मग्न असे. रुसवेफुगवे, मानपान, नसते उपचार याचाच बोलबाला असे. पण आता या सोहळ्यात दोन्हीही पक्ष अगदी मोकळेपणानं वावरतात. दोन्हीही पक्षाकडचे लोक हसतखेळत आणि तणावरहित वातावरणात या सोहळ्याचा आनंद लुटतात. यात सगळ्या वयोगटातील मंडळींचा सहभाग असतो. मग आपणच मागे का रहायचं? आपणही या आनंदसोहळ्यात सहभागी व्हायलाच हवं. पण अनेकींना चारचौघात नाचताना संकोच वाटतो. लोक काय म्हणतील, आपली चेष्टा होईल का, आपल्याला कॉमेंट्स केल्या जातील का या शंकेनं बऱ्याचजणी मागे राहतात. ही बाब विवाह सोहळ्यापुरतीच मर्यादित नाही. अलीकडे अनेक पार्टीजमध्ये कपल डान्स असतो. पार्ट्यांमध्ये डिस्को डेकवर नाचून आनंद व्यक्त केला जातो. अशा वेळी आपणही मागे रहायला नको. थोडी हिंमत केली तर सगळं शक्य आहे. तुमच्यावर अशी वेळ आल्यास पहिलं म्हणजे संगीताचा अंदाज घ्या आणि आजूबाजूच्या मंडळींचं बारीक निरीक्षण करा. पाच मिनिटांचं हे निरीक्षणही तुम्हाला परफेक्ट डान्सर बनवू शकतं. आपल्याला शास्त्रशुद्ध नाचता यायला पाहिजे हा विचार बाजूला सारा. कारण इथे कुणीच पट्टीचा नर्तक नसतो. सगळेच कच्च्या गुरुचे चेले असतात. तेव्हा चेहऱ्यावर आत्मविश्वास ठेवून आणि हालचालीत मोकळेपण ठेवून केलेलं कुठलंही नृत्य छान वाटू शकतं. लोक काय म्हणतील हा विचार मनात आणूच नका. तुम्ही स्वत: किती खुश आहात हे महत्त्वाचं. लोकांना नाचताना, स्वत:वर इतका खुश असतो की तुम्ही कसं नाचता हे पहायला त्यांना वेळच नसतो. तुमच्या



नृत्यकौशल्यावर होणारी टिकाही गुदगुल्या करून जाते. कारण ही टीका कौतुकमिश्रीत असते. तुम्हाला कोपरखळ्या मारणाऱ्या कॉम्प्लिमेंटही बराच आनंद देऊन जातात आणि त्यातही तुम्हाला नृत्यकुशल व्हायचं असेल तर थोडा सराव करा. आरशासमोर काही स्टेप्स घोटा. मग बघा, समारंभात कशी रंगत येते ते!

स ध्याच्या लग्नसोहळ्यांमध्ये मेहंदीचाही जोरदार समारंभ असतो. या दिवशी नववधू छान सजते. मेहंदीला उपस्थित राहणाऱ्या महिलाही वेगवेगळ्या प्रकारचे ट्रेंडी पेहराव करतात. या समारंभात लेहंग्याला अनेकजणींची पसंती असते. सर्वसाधारणपणे महिलावर्ग ब्राईट रंगाच्या लेहंग्यांना प्राधान्य देतो. हिरवा, पिवळा, केशरी अशा रंगांची चलती असते. यासोबतच आता पेस्टल रंगांची क्रेझही आहे. मेहंदी समारंभासाठी पेहराव शोधत असाल तर या टिप्स तुम्हाला नक्कीच उपयोगी पडतील.

* या दिवशी रंगीबेरंगी लेहंगा कॅरी करता येईल. या लेहंग्यात नवरी मुलगी शोभून दिसेल. सगळ्यांचं लक्ष तिच्याकडेच वेधलं जाईल.

* मेहंदी समारंभाला मेहंदी रंगाचा लेहंगा ट्राय करता येईल. गोल्डन वर्कवाला मेहंदी कलरचा लेहंगा शोभून दिसेल. मंगलप्रसंगी रंगसंगतीला खूप महत्त्व असतं. ब्राईट रंग शोभून दिसतात. त्यामुळे कपड्यांची निवड करताना रंगाकडे विशेष लक्ष द्या.

# परफेक्ट लूक फॉर मेहंदी

* काही तरी हटके आणि आकर्षक कॅरी करायचं असेल तर प्रिंट ऑन प्रिंट लेहंगा बेस्ट ठरेल. सध्या अशा प्रकारच्या लेहंग्याची फॅशन आहे.

* फ्लोरल प्रिंट कायमच इन असते. या प्रिंट खूप छान दिसतात. त्यामुळे साधेपणा जपायचा असेल तर फ्लोरल प्रिंट्सना प्राधान्य द्या.

* एकदमच भन्नाट दिसायचं असेल तर फ्लोरल आणि हेवी वर्कवाले लेहंगे बाजूला ठेवा. त्याऐवजी पॅटर्ड लेहंगा घ्या.

* स्टायलिश लूकसाठी तुम्ही कट आउट शोल्डरची फॅशन ट्राय करू शकता. यात लेहंग्यावरच्या चोलीला कट आउट शोल्डर असतो. नव्या जमान्याच्या वधूसाठी हा परफेक्ट पेहराव आहे.

* ऑफ शोल्डर चोली असलेला लेहंगाही ट्राय करता येईल.

* धोतीची सध्या खूप फॅशन आहे. लेहंग्यापेक्षा वेगळं ट्राय करायचं असेल तर तुम्ही पलाझो किंवा धोतीची निवड करू शकता.

* इव्हिनिंग गाउन हा नवऱ्या मुलीसाठी अगदी योग्य पेहराव ठरेल.



# स्वत:ला महत्त्व दे

समुपदेशन

आ मचं लग्न चार वर्षांपूर्वी झालं. आम्हाला एक मुलगीही आहे. पण माझे पती आणि सासू-सासरे मला कोणत्याही महत्त्वाच्या निर्णयात सहभागी करून घेत नाहीत. आम्ही सासू-सासऱ्यांसोबत रहात नाही. ते दुसऱ्या राज्यात राहतात. पण त्या तिघांची सतत फोनवर चर्चा सुरु असते. या चर्चेत थांगही मला लागत नाही. सासू-सासरे आमच्याकडे आल्यावर ते तिघं एका खोलीत बोलत बसतात. मला बाहेर जायला सांगतात. तू बाहेरची आहेस, असं सांगत मला उडवून लावतात. याबाबत मी पतीशी बोलले. पण त्यांच्याकडून काहीच प्रतिसाद मिळत नाही. मला खूप एकटं वाटू लागलं आहे. मी काय करू?

– मैत्रिणी, आपण तुझ्या पतीच्या वागणुकीबद्दल बोलू या. इतरांच्या वागणुकीत बदल घडवणं प्रत्येक वेळी शक्य होतंच असं नाही. अशा परिस्थितीत तुम्ही वेगळ्या पद्धतीने प्रतिसाद दिला तर काही गोष्टी बदलू शकतात. सर्वात आधी तू तुझ्या पतीशी झालेल्या चर्चेचा शांतपणे विचार कर. निर्णयप्रक्रियेत तुला सामील न करून घेण्याच्या कारणांचा उहापोह कर. आपल्या आई-वडिलांना महत्त्व देता येत नसल्याबद्दल त्याला वैषम्य वाटतं का? तो पालकांवर आर्थिकदृष्ट्या अवलंबून आहे का, अशा प्रश्नांची उत्तरं शोध. स्वत:ची तुलना त्याच्या आई-वडिलांशी करू नको. पती, सासू-सासरे तुझ्या आयुष्याचा भाग आहेत. तुझं आयुष्य नाहीत. त्यामुळे स्वत:ला महत्त्व दे. पतीवर अवलंबून राहू नको. आवडीच्या गोष्टी कर.



# हर्बल बाथ घ्या, रिलॅक्स व्हा

ब्युटी टॉक

रो जच्या जीवनातले ताण कमी करण्यासाठी आपण विविध पर्याय निवडतो. चित्रपट बघायला जातो, निवांत पोहतो. वाचन करण्याचा आणि गाणी ऐकण्याचा पर्यायही असतो. अनेकजणी स्पामध्ये जातात. मात्र तुम्ही घरच्या घरीही ताण घालवू शकता. हर्बल बाथ घेतल्याने तुम्हाला ताजंतवानं वाटू शकतं. हर्बल बाथच्या अनेकविध प्रकारांविषयी...

* गुलाब सौंदर्यवर्धक आहे. यासोबतच या फुलाच्या सुगंधामुळे तुम्हाला उत्साही वाटतं. गुलाबाची वाळलेली पानं, कॅमोमाईल फुलं, ग्रीन टीची पानं आणि एसेन्शियल ऑईल एकत्र करून सुगंधी मिश्रण तयार करा. मलमलच्या छोट्या पाऊचमध्ये हे मिश्रण भरा. हे पाऊच आंघोळीच्या बादलीत किंवा बाथटबमध्ये ठेवा. यात गुलाबाच्या ताज्या पाकळ्या, लवेंडर हर्ब्ज आणि नारळाचं दूधही घालता येईल. यामुळे त्वचा तजेलदार आणि तेजस्वी होते.

* कॅलेंड्युलाच्या फुलांमध्ये औषधी गुणधर्म असतात. यामुळे त्वचा उजळ दिसते. शिवाय त्वचेत्ल्या पेशींची दुरुस्ती करण्याचं कामही ही फुलं करतात. यामुळे त्वचेवरचं पुरळ कमी होतं आणि त्वचेतला ओलावाही टिकून रहातो. कॅलेंड्युला आणि गुलाबाची वाळलेली फुलं घ्या.यात लवेंडर तेलाचे काही थेंब घाला. हे सर्व मलमलच्या पाउचमध्ये भरून ते बादलीत ठेवा. यामुळे त्वचेचं छान पोषण होईल.

* कॅमोमाईलच्या फुलांना फ्रुटी सुगंध असतो. हर्बल बाथसाठी कॅमोमाईलची फुलं पाण्यात दहा मिनिटं उकळवा. यामुळे यातले गुणकारी तेल बाहेर पडेल. हे पाणी आंघोळीच्या पाण्यात घाला.

* तुळशीची पानं आंघोळीच्या पाण्यात घातल्याने तुम्हाला ताजंतवानं वाटेल.



## राष्ट्रीय शिष्यवृत्ती परीक्षेत १२ विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती



**जेजुरी :** महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद यांच्या वतीने घेण्यात आलेल्या एन.एम. एम. एस(राष्ट्रीय आर्थिक दुर्बल घटक शिष्यवृत्ती) परीक्षा २२ डिसेंबर रोजी घेण्यात आलेली होती. सदर परीक्षेची अंतिम गुणवत्ता यादी निकाल नुकताच जाहीर करण्यात आलेला आहे. या मध्ये जिजामाता हायस्कूल अँड ज्युनिअर कॉलेज जेजुरी या विद्यालयाचे १८ विद्यार्थी उत्तीर्ण झाले असून यापैकी २ विद्यार्थी केंद्र शासन व १० विद्यार्थी सारथी (राज्य शासन) शिष्यवृत्तीधारक ठरले आहेत. सदर विद्यार्थ्यांना इयत्ता ९ वी ते १२ वी पर्यंतच्या शिक्षणासाठी प्रत्येकी केंद्र शासनातर्फे ४८००० रुपये तर राज्य शासन सारथी संस्थेतर्फे ३८४०० रुपये शिष्यवृत्ती मिळणार आहे. या यशस्वी विद्यार्थ्यांना महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा मुख्याध्यापक महामंडळाचे राज्य सचिव, विद्यालयाचे प्राप्त प्राचार्य नंदकुमार सागर, पर्यवेक्षक सतिश पिसाळ ,समन्वयक प्रल्हाद गिरमे ,शिष्यवृत्ती परीक्षा विभाग प्रमुख पांडुरंग आटोळे, लीना पायगुडे , सारिका कामथे ,छाया पोटे , सागर चव्हाण, वर्षा देसाई यांचे मार्गदर्शन लाभले.

## जेजुरी पोलीस स्टेशनमधील बेवारस वाहने घेऊन जा

**जेजुरी :** जेजुरी येथील पोलिस ठाण्यात गेली काही वर्षे बेवारस अवस्थेत असलेल्या 100 विविध चारचाकी व दुचाकी वाहनांचा लिलाव केला जाणार आहे. तत्पूर्वी, संबंधित वाहनमालकांनी कागदपत्रांचे पुरावे देऊन वाहने घेऊन जावीत, असे आवाहन सहायक पोलीस निरीक्षक दीपक वाकचौरे यांनी केले आहे. जेजुरी (ता. पुरंदर) येथील पोलिसांनी बेवारस वाहने बाजूस काढली आहेत. त्याची यादी तयार केली आहे. ही वाहने सन २०१५ पासूनची आहेत. यात चारचाकी पाच वाहने, व नादुरुस्त वाहने 95 आहेत. अशा एकूण 100 वाहनांचा लिलाव करण्याबाबत प्रक्रिया पूर्ण झाली आहे. हा लिलाव उपविभागीय पोलिस अधिकारी तानाजी बरडे यांच्या मार्गदर्शनाखाली होणार आहे. ज्यांची वाहने असतील त्यांनी वाहनाची कागदपत्रे, विशेषतः त्यात स्वतःचे ओळखपत्र, गहाळ वाहनाबाबतची एफआयआर प्रत आणण्याचे आवाहन केले आहे. ही वाहने जितके दिवस पडून राहतील, तितके त्याचे नुकसान होते.

## ओतूर पोलिस ठाण्यातील बेवारस वाहनांचा लिलाव

**ओतूर :** ओतूर पोलिस ठाण्याच्या वतीने ६७ बेवारस वाहनांचा लिलाव पुढील आठवड्यात करण्यात येणार असल्याची माहिती सहाय्यक पोलिस निरीक्षक लहू थाटे यांनी दिली. ही वाहने दहा ते पंधरा वर्षांपासून पोलिस ठाण्यात पडून आहेत.सदर गाड्यांचे रजिस्ट्रेशन नंबर,चेसिस नंबर,इंजिन नंबर यापूर्वी प्रसिद्धी करून आव्हान करून देखील सदर बेवारस गाड्यांचा ताबा घेण्याकामी ओतूर पोलीस स्टेशन येथे आतापर्यंत कोणीही आलेले नाही. यामुळे सदर बेवारस गाड्यांचा स्क्रॅपमध्ये लिलाव करण्यात येणार आहे.सदर लिलाव प्रक्रियेमध्ये ज्या भंगार विक्रेते दुकानदारांना सहभागी व्हायचे आहे,त्यांनी शॉप ॲक्ट लायसन आणि आधार कार्ड या कागदपत्रांसह ओतूर पोलीस स्टेशन येथे पोलिस हवालदार विलास कोंढवळे यांच्याशी संपर्क करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

# उद्योजकांनी शैक्षणिक संस्थांना मदत केल्यास विद्यार्थ्यांचा विकास होईल : अ‍ॅड.प्रदीप वळसे पाटील

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**लोणी-धामणी :** उद्योजक क्षेत्र व विविध शैक्षणिक संस्था यांनी एकत्र मिळून काम केले तर औद्योगिक क्षेत्राच्या विकासा बरोबरच शालेय संस्थांमध्ये शिकणाऱ्या विद्यार्थ्यांचा देखील विकास होईल तसेच विद्यार्थ्यांच्या विकासासाठी कौशल्य विकास हे व्यवसाहिक शिक्षण संस्थांनी सुरू केले पाहिजेत असे मत निरगुडेश्वर शिक्षण विकास मंडळाचे अध्यक्ष अ‍ॅड.प्रदीप वळसे पाटील यांनी व्यक्त केले.

पंडित जवाहरलाल नेहरु माध्यमिक व दत्तात्रय गोविंदराव वळसे पाटील उच्च माध्यमिक विद्यालया ( ता.आंबेगाव ) येथे केल्विन इंडिया कंपनी प्रा.लि.चाकण या कंपनीने शालेय इमारतीसाठी बारा लाख रुपयांची मदत दिल्याने या कंपनीच्या अधिकाऱ्यांचा सत्कार व सन्मानाचा कार्यक्रम विद्यालयात संपन्न झाला यावेळी अ‍ॅड.प्रदीप वळसे पाटील बोलत होते.



निरगुडसर ( ता.आंबेगाव ) येथील विद्यालयातील एनएमएमएस शिष्यवृती परीक्षेत पात्र ठरलेल्या विद्यार्थांचा सत्कार करताना मान्यवर.

यावेळी केल्विन इंडिया कंपनी प्रा.लि.चे वरिष्ठ व्हाईस चेअरमन श्रीपाद खरे यांनी विद्यालयातील गुणवत्ता व विविध उपक्रमांचे कौतूक करून भविष्यात विद्यालयास मदत केली जाईल असे सांगितले.या कार्यक्रमासाठी केल्विन इंडिया कंपनीचे सिनियर मॅनेजर योगेश गाजरे पाटील,संस्थेचे उपाध्यक्ष रामदास वळसे पाटील, सचिव प्रकाश तापकीर, संचालक प्राचार्य सुनिल वळसे पाटील,माजी प्राचार्या सुनंदा गोरे, दिलीप लोखंडे, शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी, विद्यार्थी उपस्थित होते.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्राचार्य कांताराम टाव्हरे यांनी केले, सुत्रसंचालन मोहन दरेकर यांनी केले तर आभार पर्यवेक्षक संतोष वळसे यांनी मानले.


● या कार्यक्रमानिमित्त एनएमएमएस शिष्यवृत्ती परीक्षेत व सारथी शिष्यवृत्ती परीक्षेत पात्र ठरलेल्या ३२ विद्यार्थ्यांचा व त्यांना मार्गदर्शन करणार्या शिक्षकांचा मान्यवराच्या हस्ते सन्मान करण्यात आला. यावेळी संस्थेचे अध्यक्ष अ‍ॅड.प्रदिप वळसे पाटील यांनी या शिष्यवृत्ती परीक्षेत पात्र ठरलेल्या व इयत्ता दहावीमध्ये तालुक्यात बोर्डाच्या परीक्षेत पहिल्या दहामध्ये येणार्या विद्यार्थ्यांना हवाई सफरने (विमान प्रवास ) हैद्राबाद येथील रामोजी फिल्मसिटी येथे सहलीचे आयोजन करण्यात येणार आहे असे सांगितले.

# डॉ. संदेश शहा यांना डॉ. सॅम्युएल हॅनिमन जीवन गौरव पुरस्कार घोषित

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**इंदापूर :** महाराष्ट्र कौन्सिल ऑफ होमिओपॅथी च्या वतीने देण्यात येणारा, होमिओपॅथीचे जनक डॉ. सॅम्युएल हॅनिमन जीवन गौरव पुरस्कार सन २०२५ - २६ हा इंदापूर ( जिल्हा पुणे ) येथील डॉ. संदेश शरद शहा यांना घोषित झाला आहे. महाराष्ट्र कौन्सिल ऑफ होमिओपॅथीच्या वतीने या पुरस्काराची घोषणा करण्यात आली आहे.

डॉ. संदेश शहा यांनी इंदापूर शहर तसेच पंचक्रोशीत होमिओपॅथीचा प्रचार करण्यासाठी १०० हून जास्त मोफत होमिओपॅथिक शिबिरे घेऊन ५० हजार हून जास्त रुग्णांना एक महिन्याची औषधे मोफत दिली आहेत. जगद्गुरु संतश्रेष्ठ तुकाराम महाराज पालखी सोहळ्यातील हजारो वारकऱ्यांना सलग तीस वर्ष त्यांनी मोफत होमिओपॅथिक औषधदान केले आहे. ग्रामीण भागात होमिओपॅथीचा प्रचार करण्यासाठी त्यांनी ११ हून जास्त चर्चासत्राचे यशस्वी आयोजन केले आहे. कोरोना महामारीत बेड न मिळालेल्या २२० रुग्णांना त्यांच्याच घरी विलगीकरण करून त्यांनी या औषधांचा वापर करून त्यांना बरे केले आहे. एड्स झाल्यानंतर मनुष्य केवळ ५ वर्ष जगतो असा सन १९९५ च्या दशकात प्रचार सुरू



असताना त्यांनी अनेक रुग्णांचे आयुष्य होमिओपॅथिक औषध देऊन वाढविले आहे. हजारो रुग्णांची त्यांनी मूतखडा या आजारातून मुक्तता केली असून हजारो रुग्णांच्या विविध आजारांच्या शस्त्रक्रिया त्यांनी टाळल्या आहेत.

होमिओपॅथी बरोबरच योग, शाकाहार, शेती, रक्तदान, पत्रकारिता तसेच व्यसनमुक्ती साठी त्यांनी मोठे योगदान दिले आहे. देश स्वातंत्र्य झाल्यापासून पिण्याच्या पाण्याची टंचाई असलेल्या इंदापूर तालुक्यातील गोखळी, तरंगवाडी, विठ्ठलवाडी येथे ओढा खोलीकरण व रुंदीकरण करून या गावांची तीव्र पाणी टंचाई दूर करण्यास मदत केली आहे. त्यांनी १२०० शेतकऱ्यांना मोफत गट शेतीचे प्रशिक्षण दिले आहे. २२०० युवा पिढीस त्यांनी स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन उपलब्ध करून दिले आहे. विठ्ठलवाडी येथील ओढा खोलीकरण रुंदीकरण करण्यासाठी आलेले तत्कालीन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी इंदापूर रोटरी क्लब चे अध्यक्ष संदेश शहा यांचा सामाजिक डॉक्टर म्हणून आवर्जून उल्लेख करून त्यांच्या कार्याचा गौरव केला होता.

पुरस्कार वितरण जून महिन्यात होणार आहे. राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार व एकनाथ शिंदे, आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर तसेच इतर मान्यवरांच्या उपस्थितीत पुरस्कार वितरण होणार आहे.

दरम्यान राज्याचे क्रीडा व युवक कल्याण मंत्री दत्तात्रय भरणे म्हणाले, डॉ. संदेश शहा यांना हा पुरस्कार घोषित झाल्याने इंदापूर तालुक्याचा मानसन्मान उंचावला आहे. हा राज्यस्तरीय पुरस्कार मिळणारे डॉ. संदेश शहा हे तालुक्यातील एकमेव डॉक्टर असून त्यांच्या कार्याचा आम्हा सर्वांना सार्थ अभिमान आहे.

यासंदर्भात राष्ट्रीय सहकारी साखर कारखाना महासंघाचे अध्यक्ष हर्षवर्धन पाटील म्हणाले, इंदापूर तालुक्यात डॉ. संदेश शहा यांच्या मोफत होमिओपॅथिक शिबिराचा मी उद्घाटक म्हणून साक्षीदार आहे. डॉ. बाहुबली शहा तसेच इतर १० ते १५ डॉक्टरांचे शिबिरासाठी डॉ. संदेश शहा यांना सहकार्य होत होते. संपूर्ण राज्यात मंत्री म्हणून काम करत असताना अनेक ठिकाणी डॉ. संदेश शहा यांच्या कार्याचा आवर्जून उल्लेख होत होता. त्यांना घोषित झालेल्या या पुरस्काराचा आम्हा सर्वांना सार्थ अभिमान आहे.

दरम्यान राज्य लेखा समितीचे माजी अध्यक्ष, सोनाई परिवाराचे अध्यक्ष दशरथ माने, जिल्हा बँकेचे संचालक आप्पासाहेब जगदाळे, कर्मयोगी कारखान्याचे उपाध्यक्ष भरत शहा, जिल्हा परिषदेचे माजी आरोग्य व बांधकाम सभापती प्रविण माने, मावळत्या नगराध्यक्षा अंकिता शहा, शहा ग्लोबल स्कूल चे विश्वस्त मुकुंद शहा, जेष्ठ कवयित्री, साहित्यिक प्रतिभा गारटकर, तुषार रंजनकर, वसंतराव मालुंजकर आदींनी डॉ. संदेश शहा यांचे अभिनंदन केले आहे.

डॉ शहा हे अखिल भारतीय मराठी पत्रकार परिषदच्या पुणे जिल्हाअध्यक्ष आहेत. पत्रकार संघाच्या विविध संघटनाच्या पदाधिकाऱ्यांनी त्याचे अभिनंदन केले आहे

## जीसा संघटनेची उद्योजकांना दमदाटी : उद्योग बंदचा इशारा

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**जेजुरी :** जेजुरी औद्योगिक वसाहतीत जेजुरी इंडस्ट्रियल सर्व्हिसेस असोसिएशन म्हणजे जिसां ही संघटना उद्योजकांना नाहक त्रास देत आहे. जीसाच्या पदाधिकाऱ्यांवर शासनाने कारवाई करावी अन्यथा जेजुरी औद्योगिक वसाहतीतील उद्योग बंद ठेवू असा इशारा पत्रकार परिषदेत जेजुरी उद्योजक संघाचे अध्यक्ष डॉ रामदास कुटे यांनी दिला आहे.

जेजुरी उद्योजक संघाच्या वतीने पत्रकार परिषदेत घेण्यात आली .जेजुरी औद्योगिक वसाहतीत उद्योजक व त्यांना सेवा पुरविणारे ठेकेदार हे 90 टक्के असुन आजपर्यंत उद्योजक व ठेकेदार यांचे माध्यामातून उद्योगाला चालना मिळाली आहे .मात्र एक महीण्यापासून जीसा नावाच्या संघटनेच्या माध्यामातून उद्योजकांना धमकावणे, कंपन्यांच्या गेट वर दमदाटी करणे, बेकायदेशीरपणे प्रवेश करणे व व्यवस्थापनासोबत अकारण वाद घालणे असे प्रकार घडत आहेत याबाबत जीसाच्या संबंधीत पदाधिकार्यावर कारवाई करणेत यावी अन्यथा कारखाने बंद ठेवण्याचा इशारा जेजुरी उद्योजक संघाचे (जीमा ) चे अध्यक्ष डॉ रामदास कुटे यांनी पत्रकार परीषदेत दिला .

एक महीण्यापासुन जीसा नावाच्या संघटनेच्या वतीने जेजुरी औद्योगिक वसाहतीतील उद्योजकांना " आपल्या कारखान्यात बेकायदेशीर कामकाज चालते .आपण कामगारांना सुविधा देत नाहीत .महीला वर्गाची पिळवणुक केली जाते .कामगारांकडून वेळेपेक्षा जादा काम करून घेतले जाते .भविष्य निर्वाह निधी भरवा जातो का ? यासारखे कसलाही अधिकार नसताना पत्रे पाठवून माहीती मागवली जात आहे .पत्रास प्रतिसाद न देणार्या उद्योजकांना आंदोलन करण्याचा इशारा पत्रातून देण्यात येत आहेत . तसेच याबाबत उदियोगमंत्री, कामगार आयुक्त पोलिस अधिक्षक यांचेकडे तक्रार करण्यात येईल अशा प्रकारच्या धमक्या देण्यात येत आहेत .व त्यातुन ब्लकमेलींग चां प्रयत्न संबंधीत पदाधिकार्याचा स्पष्ट दिसत आहे यामुळे उद्योजकांमध्ये भितीचे वातावरण आहे.

जेजुरी औद्योगिक वसाहतीत सुमार 90 टक्के उद्योजक स्थानिक असल्याचे उद्योजकाच्या यादीवरून स्पष्ट दिसते .तसेच सेवा पुरविण्याचे काम दिलेले ठेकेदार ही 90 टक्के स्थानिक असून ते सर्व जीसा या संघटनेचे सभासद आहेत याची माहीती पुराव्यासहीत डॉ कुटे यांनी पत्रकार परीषदेत दिली . तसेच सर्व उद्योजक शासनाच्या नियमांचे पालन करणारे असून कुठलेही बेकायदेशीर काम करीत नाही.

# जागतिक आरोग्य दिनानिमित्त जेजुरीत महाआरोग्य शिबिर

**जेजुरी :** मल्हारभक्त स्व. बबनराव पांडुरंग खेडेकर व स्व.पंडित वसंतराव गाडगीळ यांच्या स्मृती प्रित्यर्थ श्री ज्ञानयोग सेवा ट्रस्ट, समर्थ युवा फाउंडेशन व जेजुरीकर श्रीराम मंदिर यांच्या वतीने जेजुरी येथे दि 6 व 7 रोजी त जेजुरीकर श्रीराम मंदिर यव महालक्ष्मी चौक जेजुरी या ठिकाणी महाआरोग्य मेळावा आयोजित करण्यात आले असल्याचे आयोजक व श्री ज्ञानयोग सेवा ट्रस्टचे प्रमुख डॉ राजेंद्र खेडेकर यांनी सांगितले.

या आरोग्य मेळाव्यामध्ये रक्तातील साखर, कोलेस्ट्रॉल इत्यादी तसेच रक्तदाब तपासणी, डोळ्यांचे तपासणी , मोफत चष्मे वाटप, दातांची तपासणी ,महिलांसाठी मॅमोग्राफी म्हणजे कर्करोग निदान तपासणी करण्यात येणार आहे. जेजुरी मध्ये पहिल्यांदाच सुमारे 13,500 रुपयांच्या तपासण्या पूर्णपणे मोफत करण्यात येणार येणार आहे.

या कार्यक्रमासाठी समर्थ युवा फाउंडेशनचे अध्यक्ष राजेश पांडे, सुनील पांडे, जगद्गुरु संत तुकाराम महाराज संस्थांचे अध्यक्ष ह. भ. प. पुरुषोत्तम महाराज देहूकर, विश्वस्त ह. भ. प. माणिक महाराज देहूकर उपस्थित राहणार असल्याचे डॉ खेडेकर यांनी सांगितले.

पान १ वरून

## एकनाथ शिंदेंना पुन्हा धक्का

रस्ते विकास महामंडळ, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, कोयना जलसंपदा विभाग, स्थानिक ग्रामपंचायत या प्राधिकरणांच्या १६ ना-हरकत परवानग्या मिळवणे गरजेचे असताना सद्य:स्थितीत कोणत्याही विभागाची परवानगी मिळाली नसल्याचे उघड झाले आहे. त्यामुळे न हरकत प्रमाणपत्र प्राप्त झाल्याशिवाय पर्यटन प्रकल्पातील कामे सुरू करू नये असे लेखी आदेश मुख्य वनरक्षक राज्य यांनी दिले आहेत यामुळे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचा ड्रीम प्रोजेक्ट थांबवण्याचे आदेश देण्यात आले आहेत.

कोयना धरणातील शिवसागर जलाशयात मुनावळे येथे जलपर्यटनाच्या प्रकल्पाचे तत्कालीन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते शुभारंभ करण्यात आला होता. गोड्या पाण्यातील हा देशातला पहिलाच जल पर्यटन प्रकल्प आहे. याच्या उदघाटनावेळी एकनाथ शिंदे यांनी या प्रकल्पामुळे स्थानिकांना कसा फायदा होईल हे सांगितलं होते. स्थानिक तरुणांना रोजगार तयार होणार असून कामासाठी शहरात गेलेला स्थानिक माणुस या प्रकल्पामुळं परत येईल असं सांगून महाबळेश्वरमध्ये येणाऱ्या पर्यटकांना आता याचा दुहेरी लाभ होईल असं ते म्हणाले होते..

## जलसंपदा मंत्र्यांनी पुन्हा महापालिकेवर डागली तोफ

प्रकल्प, धरणातील गाळ काढणे, वाढते नागरिकीकरणामुळे शेतीच्या पाण्याचा तुटवडा अशा अनेक विषयांवर शासनाच्या भूमिका मांडल्या. या सिंचन परिषदेतून तज्ञांनी सरकारला सूचना द्याव्यात अशी अपेक्षा व्यक्त करताना यानंतर आम्ही याचा रोड मॅप बनवू असे त्यांनी सांगितले.

राधाकृष्ण विखे पाटील पुढे म्हणाले की, सध्या वाढत्या नागरिकीकरणामुळे शेतीच्या पाण्याचा प्रश्न दिवसेंदिवस गंभीर बनत चालला आहे. आत्ताच ग्लोबल वार्मिंगमुळे पावसाचे वेळापत्रकही बदलू लागले आहे. अशावेळी धरणात असलेल्या पाण्याचे कमीत कमी बाष्पीभवन होण्यासाठी आता राज्यातील धरणांच्या पाण्यावर राज्य सरकार फ्लोटिंग सोलर प्रकल्प उभारण्याची तयारी करीत आहे. यासाठी एनटीपीसी सारख्या भारत सरकारच्या कंपन्यांकडे विचारणा करण्यात आली असून धरणात मुबलक जागा असल्याने या ठिकाणी पाण्यावर फ्लोटिंग सोलर पॅनल बसविल्यावर पाण्याचे बाष्पीभवन ही कमी होईल आणि निर्माण होणाऱ्या सोलर एनर्जीमधून जलसंपदा विभागाला उत्पन्नही मिळेल असे त्यांनी सांगितले.

### असंवेदनशीलच ! खटकले तरी ते खरेच..

कायद्यात बदल केला जाईल. संपूर्ण धर्मादाय व्यवस्था एका ऑनलाईन प्लॅटफॉर्मवर यावी, हा आमचा प्रयत्न आहे. रुग्णालयात किती बेड आहेत, ते दिले जात आहेत की नाही, हे सगळं कळण्यासाठी व्यवस्थेत सुधारणा केल्या जातील. ही व्यवस्था मुख्यमंत्री आरोग्य कक्षाशी जोडण्याचा प्रयत्न केला जाईल, असेही देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले. त्यामुळे आता याप्रकरणात पुढे काय कारवाई होणार, हे पाहावे लागेल.

### धनंजय मुंडेंना...

लिव्ह-इन-रिलेशनशीपमध्ये होते, अशी बाजू धनंजय मुंडे कोर्टामध्ये मांडतात. करुणा मुंडेंनी मात्र पत्नी असल्याचा दावा करीत पोटगीसाठी आणि घरगुती हिंसेप्रकरणी वांद्रे कौटुंबिक न्यायालयात धाव घेतली होती.

### विश्वकल्याणासाठी...

**प्रविण चोरबेले, अभिजित डुंगरवाल यांनी दिली. तसेच दिल्ली येथील विज्ञान भवनात आयोजित कार्यक्रमात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचाही सहभाग असणार आहे, असे त्यांनी सांगितले. उपक्रमात जास्तीत जास्त नागरिकांनी सहभाग घ्यावा आणि विश्वशांती व विश्वकल्याणासाठी प्रार्थना करावी, असे आवाहन प्रविण चोरबेले यांनी केले.**

### रसायनमुक्त पदार्थ १०० उत्पादकांची उद्योजक 'संवाद' कार्यशाळा

# राज्यस्तरीय उद्योजक 'संवाद' कार्यशाळेचे किसान उद्योग समूहाकडून आयोजन

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**ओतूर :** कॅन्सर, हार्ट अटैक, डायबेटीस, रक्तदाबा सारख्या वाढत्या मानवी आजारांची तीव्रता लक्षात घेता या आजारांचे मुख्य कारण आपली दिनचर्या व आहार असल्याने अन्न पदार्थ मध्ये बदल होणे गरजेचे आहे. आपण काय, केव्हा,कसे व कोणते अन्न खातो हे समजणे गरजेचे आहे.

जास्त नफा कमवन्याच्या शर्यतीत आपण 'केमिकल ग्रस्थ' झालो आहोत आणि त्याचे परिणाम आपल्या समोर आहेत हि खुप मोठी चिंतेची बाब आहे.

ही चिंतेची बाब लक्षात घेता किचन मधील सकाळ पासून रात्रीपर्यंत मानवासाठी नैसर्गिक परिपूर्ण पौष्टिक अन्न ची गरज आहे ती गरज 'अन्न हेच औषध' ( food as medicine) असे अन्न हवे यासाठी मालेगाव येथील गोकुळ ग्राम किसान उद्योग समूह कार्य करीत आहे.

सामाजिक आरोग्याची गरज पूर्ण होण्याकरिता महारष्ट्रातील रसायन मुक्त पदार्थ निर्मिती करणारे शंभर हून अधिक उत्पादकांची राज्यस्तरीय,उद्योजक 'संवाद' कार्यशाळा ता.५ व ६ एप्रिल २०२५ रोजी माळशेज एग्रो टुरिझम सेंटर, जुन्नर, पुणे येथे आयोजन करण्यात आले आहे.

सदर कार्यशाळेत संपूर्ण राज्यातील जे-जे शेतकरी रसायनमुक्त पदार्थ निर्मिती करतात असे उद्योजक एकत्र येवून लाकडी घाणा तेल. कोल्ड प्रेस ऑइल विक्री सोबत नैसर्गिक रसायन मुक्त गूळ,गुळ पावडर, गुळ क्यूब, सर्व प्रकारच्या चिकी, शेंधा नमक, |आटा, गावरान धान्य व डाळी, चिकि,नागली प्रोडक्ट, ड्रायफूड, मोरिंगा पावडर, टेबलेट,नैसर्गिक भाजीपाला,फळे,आयुर्वेदिक औषधे,पंचगव्य व होममेड प्रोडक्ट"एक कंपनी एक ब्रँड" या धर्तीवर मार्केटिंग फ्रेंचायशीसाठी मुंबई, पुणे व नाशिक येथील १०० हून अधिक मोठमोठे उद्योजक व फ्रेंचायशी टीम एकत्र येत आहोत.

सर्व शेतकरी उत्पादकांना टेक्निकल सपोर्ट आधुनिक मशनरी मिनी व सेमी अटो प्लान साठी सपोर्ट बाबत तज्ज्ांच्या माध्यमातून मार्गदर्शन होणार आहे. शेतकरी उत्पादनात सुधारणा करून कॉलीटी उत्पादनाचे ब्रेडिंग, पकिंग करून मुंबई, पुणे सारख्या स्मार्ट सिटी मध्ये फ्रेन्चायशी व डिजिटल मार्केटिंग च्या माध्यमातून शेतकरी माल विक्री करून शेतकरी उत्पादकाचे उत्पन्न वाढवून ग्राहकाचे आरोग्य सुधारण्याचे कार्य किसान उद्योग समूह करत आहे.

या 'उद्योजक संवाद कार्यक्रमात' ७० हून अधिक रसायन मुक्त प्रॉडक्ट चे प्रदर्शन असल्याने सर्व विक्री उद्योजकांना प्रॉडक्टची पाहणी, तपासणी, टेस्ट, चव बाबत माहिती घेता येणार आहे.

रसायनमुक्त उत्पादन क्षेत्रात कार्य करणाऱ्या उत्पादकांनी कार्यशाळेचा लाभ घ्यावा असे आव्हान किसान उद्योग समूह, मालेगाव चे सामाजिक उद्योजक गोकुळ देवरे यांच्या कडून करण्यात आले.

## शिक्रापूरच्या उपसरपंचपदी वंदना भुजबळ विजयी

**शिक्रापूर :** शिक्रापूर ता. शिरुर येथील ग्रामपंचायतच्या उपसरपंच पूजा भुजबळ यांनी उपसरपंच पदाचा राजीनामा दिल्याने रिक्त झालेल्या उपसरपंच पदासाठी घेण्यात आलेल्या निवडणुकीत उपसरपंचपदी वंदना रमेश भुजबळ यांची दोन मताने निवड झाली आहे.

शिक्रापूर ता. शिरुर ग्रामपंचायतच्या उपसरपंच पूजा भुजबळ यांनी त्यांच्या पदाचा राजीनामा दिल्याने उपसरपंचपद रिक्त झालेले असल्याने नुकतीच सरपंच रमेश गडदे यांच्या अध्यक्षतेखाली व ग्रामविकास अधिकारी शिवाजी शिंदे यांच्या देखरेखीखाली उपसरपंच पदाची निवडणूक घेण्यात आली, यावेळी सरपंच रमेश गडदे, मावळत्या उपसरपंच पूजा भुजबळ, माजी उपसरपंच तथा ग्रामपंचायत सदस्य सारिका सासवडे, मोहिनी संतोष मांढरे, मयूर करंजे, विशाल खरपुडे, सुभाष खैरे, ग्रामपंचायत सदस्य वंदना भुजबळ, कृष्णा सासवडे, शालन राऊत, त्रिनयन कळमकर, प्रकाश वाबळे, सीमा लांडे, उषा राऊत हे उपस्थित होते.

### जाहीर नोटीस

तमाम लोकांना या जाहीर नोटीसीने कळविणेत येते कि. खालील परिशिष्टात वर्णन केलेली मिळकत ही ठकुबाई चिंतामण धिवार, रा. पांगारे, ता. पुरंदर, जि. पुणे यांचे स्वतंत्र मालकीहक्क व ताबे वहिवाटीची असून सदर मिळकत त्यांनी आमचे अशिल यांना खरेदी देण्याचे निश्चित केले आहे तसेच सदर मिळकत पुर्णतः निर्वेध व निजोखमी असलेचा संपूर्ण भरवसा आमचे अशिलांना दिलेला आहे. तरी सदर मिळकतीवर कोणाचा कसल्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध, कर्ज, गहान, दान, लिज, लिन, बक्षिस, विसारपावती अगर तत्सम स्वरूपाचा बोजा असलेस ही नोटीस जाहीर झालेपासुन 10 (पंधरा) दिवसांचे आत मुळ कागदपत्रानीशी वरील पत्यावर समक्ष भेटुन लेखी हरकत दयावी अन्यथा आमचे अशिल सदरचा व्यवहार पुर्ण करतील मग कोणाचीही कसलीही तक्रार चालणार नाही. परिशिष्ट मे. दु. निं. केडगाव / दौंड यांचे हद्दीतील गाव मौजे खामगांव, ता. दौंड, जि. पुणे येथील 1) गट नंबर 812 मधील 00 हे 34 आर अधिक पो ख 00 है 00.34 आर असे एकूण 00 हे 34.33 आर क्षेत्र यासी चतुर्सिमा सरकारी रेकोर्डप्रमाणे तसेच 2) गट नंबर 836 मधील 00 है 47 आर अधिक पो ख 00 है 01 आर असे एकूण 00 हे 48 आर क्षेत्र यासी चतुर्सिमा पुर्वेस गट नं. 835 व 832, पश्चिमेस तलाव, दक्षिणेस गट नं. 825, उत्तरेस गट नं. 836 पैकी शिंदे यांची मिळकत याप्रमाणे एकूण 00 हे 82.33 आर क्षेत्र असे.

सदर मिळकती या पेपर नोटीसचा विषय असे.

दिनांक 04/04/2025

शिक्का

अ‍ॅड. अमित दत्तात्रय शिवरकर
ऑफीस पत्ता : ऑफिस क्र. 14. खरेदी विक्री संघ बिल्डींग, | बोरीपार्धी, ता. दौंड, जि.पुणे 412203
मो.नं. 9765714508 / 8208182700

SUNDAY EDGE
राष्ट्रसंचार
www.rashtrasanchar.com
@rashtrasanchar
6•4•2025

# जिवंतपणे नरकयातना देणारा वैद्यकीय सेवेचा 'रथ' आणि त्याचे 'महारथी'

हा समाज ब्रॅण्डिंग आणि विविध प्रभावाच्या मार्केटिंग क्लुप्त्या च्या प्रभावाखाली वेडा झाला आहे. ज्याची भव्य दिव्य डोळ्यांच्या कोनात मावत नाही, त्याच्या पाठीमागे हुरळून जाण्याची सार्वत्रिक मानसिकता सध्या आहे. त्यामुळे अनेक क्षेत्रात खऱ्या, विश्वासार्ह आणि प्रामाणिक विचारांना आणि संकल्पनांना व्यापक लोकाश्रय मिळत नाही आणि परिणामी त्यांना व्यावसायिक यशस्वीतेची पोचपावती मिळत नाही. अशा ३६० डिग्री ब्रँडिंग च्या भव्य दिव्यतेच्या कृष्ण छाया इतक्या काळोख्या अन् गडद असतात की त्यामध्ये हरवत चाललेली माणुसकी आणि हकनाक बळी चाललेले जीव देखील लक्षात येत नाहीत. आपण त्या भव्य दिव्यतेचा उत्सव इतक्या प्रकाशाकडे नेतो की अंधाऱ्या जगात एक वेगळीच माणुसकीशून्य प्रवृत्ती, प्रचंड नफेखोरीतील एक प्रकारची गुन्हेगारी जग आकार घेत आहे याची आपल्याला कल्पनाच नसते.

पुण्यातील दीनानाथ मंगेशकर हॉस्पिटलमध्ये झालेला प्रकार हा अशाच ब्रॅण्डिंग वेड्या समाजाच्या उदातीकरणाची देन आहे. काही दिवसांपूर्वी आदित्य बिर्ला हॉस्पिटल, त्यापूर्वी सह्याद्री हॉस्पिटल आणि आता दीनानाथ ... ! लुब्ध प्रतिष्ठितांच्या खोट्या मुखवट्याच्या ब्रँडिंग आणि मार्केटिंगच्या एका मोठ्या व्यावसायिक नफेखोरीच्या कचाटयामध्ये आपण सापडलेलो आहोत. पण अंधार गडद झाला की प्रकाश किरणाची संभाव्यता वाढते. भ्रष्ट झालेल्या वैद्यकीय दल दलीतून माणुसकीला आधार देणाऱ्या रुग्णसेवेचा सतशील प्रकाश कुठेतरी मिणमिणता केला पाहिजे ... या दिशेचा आढावा घेणारा विशेष लेख !






विश्लेषण
अनिरुद्ध बडवे
(मुख्य संपादक)
राष्ट्रसंचार

आजवर असे अनेक भिसे माणुसकीच्या शवागृहत गाडले गेले. आज पुण्यातीलच नव्हे तर पुण्याच्या आसपासच्या चारही जिल्ह्यातील डॉक्टर्स आधुनिक उपचार आणि मल्टीस्पेशालिटी सर्व्हिसेससाठी सरळ सरळ दीनानाथकडे अंगुली निर्देश करतात. या पाठीमागे हे संपूर्ण वैद्यकीय क्षेत्रात पोहोचत असलेली'कट प्रॅक्टिस 'ची एक प्रचंड मोठी दुकानदारी आहे. वास्तविक पाहता याची जाणीव प्रत्येक रुग्णाला आणि त्याच्या नातेवाईकाला आहे.'कळतंय पण वळत नाही'अशा संभ्रमात असलेला हा रुग्ण अनेकदा खोट्या प्रतिष्ठेच्या किंवा भीतीच्या सावटाखाली या सगळ्यांच्या दुकानदारीचे तुंबडी भरत आहे.

दीनानाथ मंगेशकरमध्ये झालेला हा प्रकार नवा नाही. तो फक्त एका मंत्र्याच्या पी ए च्या पत्नीसोबत झाला म्हणून त्याची चर्चा झाली. आज हा प्रकार घडल्यानंतर गेल्या तीन दिवसापासून लाखो _ लाखो रुग्ण आणि त्याचे शोषित झालेले नातेवाईक सोशल मीडियावरून आपले नाराजी आणि आपल्या वेदनेच्या कथा व्यक्त करीत आहेत. वैद्यकीय क्षेत्र, शैक्षणिक क्षेत्र हे सेवेचे माध्यम आहे ते नफा कमविण्याचे मार्ग नाहीत. परंतु या तत्त्वज्ञानाचा गैरफायदा घेत सरकारकडून, बिगर सरकारी कंपन्यांकडून, समाजातील प्रतिष्ठितांच्या अहंकाराला पोसुन अशी काही रुग्णालय कोट्यावधी रुपयांच्या देणग्या मिळवतात आणि आपला शोषणाचा धंदा सुरू ठेवतात. अशाच हॉस्पिटलच्या प्रमुखांना, संस्थापकांना आपली प्रचलित माध्यमे पुरस्कार देतात. अवार्ड _ रिवॉर्ड _ मुलाखती _ वेगवेगळी संशोधने, त्यांची तज्ञता , आधुनिक उपचार पद्धती अशा सगळा बेगडी मुलामांनी त्यांचे व्यक्तित्व इतके मोठ करतात की सर्वसामान्य जनतेला त्याची भुरळ पडते. मोठमोठ्या ट्रॉफी चे पुरस्कार आणि वर्तमानपत्राचे पाने देखील काही लाख रुपये मोजून आज विकत घेता येतात, हे दाहक वास्तव देखील सामान्यांना माहीत असते. परंतु ब्रँडिंग आणि भव्य दिव्य मार्केटिंगची भुरळ इतकी पडली आहे की, या सर्वांनाच आपण गॉडफादर मानतो आणि त्यांना नकळतपणे फॉलो करतो हे लक्षात येत नाही. मग अशी एखादी बाळंतीण आपल्या दोन जुळ्या मुलांना पोरगी करून गेली की समाजाला तात्पुरती का होईना जाग येते. वास्तविक पाहता असे अनेक भिसे या शोषणाच्या अंधकारमय शवाघरात गाडले गेले आहेत. वृत्तपत्राच्या बातमीच्या तो विषय होऊ शकले नाही.



## मंगेशकर देखील जबाबदार

संगीताच्या क्षेत्रातील मंगेशकर कुटुंबाचे योगदान निर्विवाद आहे. त्या प्रतिष्ठेचा उपयोग करून समाजामध्ये सरकारी जमिनी घ्यायचे आणि त्यावर वैद्यकीय सेवेसारखे एखादी संकल्पना उभी करायची इथपर्यंत ही ठीक आहे. परंतु रुग्णांची शोषण करून त्यावर आपले वैभवाचे इमले रचण्याची मानसिकता अत्यंत घातक आहे. आपल्या प्रतिष्ठेचा हा गैरउपयोग असल्यामुळे डॉ. केळकर, डॉ. घैसास , डॉ.जोशी , सचिन व्यवहारे हे चांडाळ चौकडी जितके जबाबदार आहेत तितकेच मंगेशकर कुटुंबीय देखील जबाबदार आहे . त्यांनी यामध्ये लक्ष दिले पाहिजे होते. यापूर्वी घडलेल्या वेदनेच्या कर्मकाहाण्या त्यांच्यावर कानावर सहजरीत्या जाव्यात इतकी संवेदना देखील त्यांनी जागृत ठेवायला हवी होती आणि तेवढी आपली मनाची कवाडे देखील उघडी ठेवायला हवी होती.

## व्यवस्थेचा चेहराच बदलण्याची गरज ....

वैद्यकीय क्षेत्राचा संपूर्ण चेहराच बदलण्याची खरी गरज आहे. केळकरांसारखे किडे हे प्रातिनिधिक वाळवी आहे. या संपूर्ण व्यवस्थेलाच अशा प्रवृत्तीच्या लोकांनी पोखरले आहे.हॉस्पिटलमध्ये येणारा प्रत्येक रुग्ण हा तातडीने बरा व्हावा यासाठी त्याला त्यासाठी तातडीचे उपचार मिळणे हे प्रथम कर्तव्य असले तरी हॉस्पिटलमधून परत जात असताना त्याच्या निरामय जीवनासाठी चे चिंतन आणि त्या दृष्टीने पुढच्या कृती असल्या पाहिजेत. सध्या आपल्याकडे नेमके याच्या विपरीत दिसते आहे . तो पुन्हा कसा येईल ? ही डॉक्टरांची आणि त्या हॉस्पिटलची मानसिकता असते. डिलिव्हरी साठी रजिस्ट्रेशन झाले की पहिल्या दिवसापासून तिथे सिझेरियन कसे होईल ? याच मानसिकतेमध्ये त्या स्त्रीवर पुढील उपचार चालतात. डायबिटीस , हायपर टन्शन , हृदयरोग , संधिवात इतक्या रोगांवर इतकी मोठमोठे संशोधने, औषध निर्मिती झाली तरी देखील याचे प्रमाण कमी का होत नाही ? कारण या सर्वांचा समूळ नायनाट व्हावा यासाठी हे वैद्यकीय क्षेत्र राबत नाही. तर या सगळ्याचा एक व्यवसाय कसा करता येईल ? भय वाढवून ग्राहकाचे वारंवारिता कशी टिकवता येईल ? ती वृद्धिंग कशी करता येईल ? यासाठी हॉस्पिटल्स आणि डॉक्टर्स यांच्या प्रवृत्तीची वाटचाल निश्चित झालेली आहे.

काही प्रमाणात आयुर्वेदिक आणि होमिओपॅथिक शास्त्र या आजार संपूर्ण बरा करणारा प्रवृत्तीची पाठरखण करतात . परंतु इन्स्टंट हेल्थ रिकवरी पाहिजे असलेला समाज फारसा या मार्गाने जात नाही. आजकाल दीर्घ काळापर्यंत आणि शरीर शास्त्रावर अभ्यास करून उपचार घेण्याची मानसिकता नाही. परंतु खरी निरामयता याच विचारांमध्ये आहे. म्हणून 'तातडीने ऍलोपॅथीचे उपचार परंतु दीर्घकाळासाठी शरीरशास्त्र निरामय ठेवण्याचे मार्गदर्शन आणि त्याचे जीवनशैली संबंधी दिशा निर्देश' करणारे वैद्यकीय उपचार व्यवस्था उभी राहण्याची गरज आहे. यासाठी नैसर्गिक उपचार, नैसर्गिक जीवनशैली, नैसर्गिक आहार विहार, व्यायाम आणि आवश्यक हा देखील महत्त्वाचा भाग बनवला गेला पाहिजे.

आहार तज्ञ, व्यायाम तज्ञ हे केवळ एका उच्चभ्रू समाजाची गरज नाही, ती सर्वसामान्य समाजाची देखील गरज आहे. परंतु हे सर्व मध्यम उत्पन्नाच्या समाजापर्यंत सहज सुलभ आणि स्वस्त दरात मिळण्याची व्यवस्था हवी.

आजारपणातून त्याची मुक्तता झाली पण पुढे काय केले पाहिजे ? याची एक लाइफलाँग प्लॅनिंग त्याला देण्याची आवश्यकता आहे. हॉस्पिटलमध्ये वारंवार न येण्यासाठी हॉस्पिटलची निर्मिती अशा पद्धतीची एक वैद्यकीय समाज रचना नव्याने उभारण्याची गरज आहे.

## सरकारी व्यवस्थेचा नुसता डोलारा .....

खरंतर हे वैद्यकीय लोककल्याणकाराचे काम आहे आणि त्याची जबाबदारी सरकारची आहे. परंतु सरकारी रुग्णालय आणि त्यांच्या व्यवस्था हे तर या दीनानाथ पेक्षाही अत्यंत हीन दर्जाच्या आहेत. त्यामुळे लोकांचा आता सरकार व्यवस्थेवरती विश्वास राहिला नाही. मोफत उपचार, फिरता दवाखाना, मोहल्ला क्लिनिक, वैद्यकीय कक्ष.. या सगळ्या संकल्पना सरकारी घोषणांचा भाग आहेत. त्याचा फायदा दहा टक्के सुद्धा समाजाला होत नाही ..ज्याला अगदी खायचीच भ्रांत आहे आणि इलाजच नाही असाच वर्ग त्या सरकारी यंत्रणेचे शोषण सहन करत करत आजचे मरण उद्यावर ढकलण्यासाठी सरकारी व्यवस्थेच्या मागे जातो आहे.

लोकांनी लोकांसाठी सुरू केलेले आणि कायमस्वरूपी आजारापासून मुक्तता देणारी वैद्यकीय सक्षमतेची एक स्वतंत्र यंत्रणा ही या काळाची गरज आहे. वैद्यकीय आरोग्य मंत्रीपद ही केवळ राजकीय सोय आहे. त्या पदावर बसणाऱ्याला कुठलही गांभीर्य नसते. वैद्यकीय क्षेत्रात येणारा पैसा हाच त्याच्या कारभाराचे केंद्र असतो. रुग्णांची संवेदना ही केवळ जाहिरातीपूर्ती असते मागील काळात तानाजी सावंत सारख्या व्यक्तीला हे मंत्रीपद देण्यात आले होते. त्यांना औषध निर्मिती आणि हाफकिन याच्याबद्दलची देखील आकलन नव्हते. तो त्यांचा तमाशा संपूर्ण महाराष्ट्राने पाहिला आहे.

anirudhabadave@gmail.com

## फेऱ्यातून वाचाल, कलंक कसा पुसाल ?

- दिनानाथ हॉस्पिटलच्या प्रकरणी सरकारने चौकशी समिती नेमली. कदाचित त्यातील काहीतरी आडवे तिडवे मार्ग काढून दिनानाथ मंगेशकर यांचे सर्वेसर्वा वैद्यकीय संचालक डॉक्टर धनंजय केळकर, डॉक्टर वैद्यकीय सुप्रिटेंडट अनुजा जोशी, डॉक्टर घैसास, अतिदक्षता विभाग प्रमुख डॉ समीर जोग आणि प्रशासन अधिकारी सचिन व्यवहारे हे वाचतील देखील. महिन्या दोन महिन्याने त्यांचे दुकानदारी आहे तशी सुरू देखील राहिल. परंतु ज्या ओल्या बाळंतीणच्या मृत्यूने तिची जुळी मुले आईविना पोरकी झाली, त्यांचं वात्सल्य हरवलं गेलं त्या दोन निष्पापी बालकांचे आयुष्यभराचे तळतळाट या चौघांनाही लागल्याशिवाय राहणार नाहीत.

पुण्याच्या वैद्यकीय क्षेत्रातील हे कलंकित चौघे आणि त्यांच्या पिढ्यां देखील कायमस्वरूपी आपल्या या संवेदनशुन्य वारसाची शिक्षा भोगतील . या चौघांची बदनामी मंगेशकर कुटुंबीयांच्या कपाळावर कायमस्वरूपी लागलेला कलंक आहे आणि पुढच्या पिढ्यांच्या कपाळावर ठेवलेली भळभळती जखम आहे.

**संगणक क्षेत्रात अनेक लाटा येत असतात. सध्याची लाट आहे "घिबली". आपले छायाचित्र घिबली वापरून ॲनिमेटेड रूपांतर करण्याचा धुमाकूळ सर्वत्र सुरु आहे . घिबली-शैलीतील (Ghibli) प्रतिमा निर्मितीच्या परिचयाने जगभरातील वापरकर्त्यांना मोहित केले आहे. ज्यामुळे त्यांना सामान्य फोटोंचे रूपांतर प्रतिष्ठित जपानी ॲनिमेशन स्टुडिओपासून प्रेरित होऊन मोहक दृश्यांमध्ये करता आले आहे.**

# 'घिबली' चे तुफान

इंस्टाग्राम, फेसबुक, व्हाट्सअपवर स्टुडिओ घिबलीने वर्चस्व निर्माण केलं आहे. पंतप्रधान मोदी, सचिन तेंडूलकर, राजपाल यादलसह अनेक सेलिब्रिटींजच्या फोटोंनी इस्टाग्रामवर धुमाकूळ घातला आहे. तसंच इतर लोकही आपल्या जुन्या आठवणींना घिबली टच देत सोशल मिडियावर फोटो शेअर करत आहेत. या नवीन ट्रेंडनं एआयच्या मदतीनं जगभरातील लोकांना आपल्या जादुई शैलीत गुंगवलं आहे. चॅटजीपीटीवर यूजर त्यांचा आवडता फोटो अपलोड करून कनव्हर्ट दिस इमेज इन टू घिबली असे लिहिताच काही क्षणांतच घिबली शैलीतील छायाचित्रे मिळवता येतात. 'एआय'द्वारे त्याचे रूपांतर जपानी ॲनिमेशनच्या क्लासिक घटकांत रूपांतरित केले जाते. त्यामुळे आठवणी या कलाकृतीचे रूप घेतात. हा ट्रेंड केवळ ओपन-एआयपुरता मर्यादित नाही, तर ग्रोक आणि जेमिनी या एआय प्लॅटफॉर्मनीही ही सुविधा उपलब्ध करून दिली आहे.

जपानमधील 'स्टुडिओ 'घिबली' हा केवळ एक स्टुडिओच नाही, तर ती एक संकल्पना आहे, एक अनुभव आहे. 'स्टुडिओ घिबली'च्या चित्रपटांमध्ये प्रामुख्याने जपानी संस्कृती, समृद्ध निसर्ग, मानवी भावना आणि कल्पनारम्य कथांचे अनोखे मिश्रण पाहायला मिळते. हा बदल करण्यासाठी नेमकं काय करावं लागतं? तर 'एआय' तंत्रज्ञानाच्या मदतीने हे आता अगदी सोपं झालं आहे. 'ड्रीम बाय वोमबो' (Dream by Wombo), 'डीप आर्ट' (DeepArt), 'टूनमी' (ToonMe) यांसारख्या ॲप्सचा वापर करून काही सेकंदांतच तुमचा फोटो 'घिबली' ॲनिमेशनसारखा दिसू शकतो. यासाठी वापरकर्त्यांना आपला फोटो अपलोड करून 'स्टुडिओ घिबली' किंवा 'ॲनिमे स्टाईल' फिल्टर निवडावा लागतो. अधिक ओरिजिनल लूक हवा असल्यास, 'ॲडोब फॉटोशॉप' (Adobe Photoshop), 'प्रो क्रियेट' (Procreate) 'किंवा क्रीटा' (Krita) यांसारख्या सॉफ्टवेअरमध्ये डिजिटल पेंटिंग करून फोटोला हळूवार 'घिबली' टच देता येतो. काहीजण यासाठी 'ब्लेंडर' (Blender) किंवा 'आफ्टर इफेक्ट' (After Effects) सारख्या ॲनिमेशन सॉफ्टवेअरचा देखील वापर करून हलत्या प्रतिमा (animated images) तयार करतात.

ॲनिमेशन ही केवळ मनोरंजनाची कला नाही, तर ते एक सशक्त अभिव्यक्तीचं साधन आहे. जगभरातील अनेक देशांनी आपल्या संस्कृतीनुसार ॲनिमेशनचे तंत्र विकसित केले. अमेरिकेत 'वॉल्ट डिझ्नी', युरोपमध्ये 'ॲस्टेरिक्स' आणि 'टिनटिन', तर जपानमध्ये ॲनिमेशनच्या दुनियेत सर्वांत प्रभावशाली नाव म्हणजे 'स्टुडिओ घिबली.' हा स्टुडिओ फक्त जपानी ॲनिमेशनचं प्रतिनिधित्व करत नाही, तर त्याने जागतिक स्तरावर एका अनोख्या कथाकथन शैलीला जन्म दिला आहे. 'घिबली'हा जपानमधील सुप्रसिद्ध ॲनिमेशन स्टुडिओंपैकी एक आहे.. हा स्टुडिओ त्यांच्या सुंदर हाताने रेखाटलेल्या ॲनिमेशनसाठी आणि मनाला भिडणाऱ्या कथाकथनासाठी ओळखला जातो. घिबली स्टुडिओ (Studio Ghibli) एक प्रसिद्ध जपानी ॲनिमेशन स्टुडिओ आहे, ज्याची स्थापना 1985 मध्ये दोन दिग्दर्शक, हयाओ मियाझाकी आणि इसाओ ताकाहाता यांनी केली. या स्टुडिओने काही अत्यंत प्रभावशाली आणि कला सृष्टीतील सर्वोत्कृष्ट ॲनिमेटेड चित्रपट तयार केले आहेत.






## घिबली स्टुडिओचा इतिहास:

- स्थापना: घिबली स्टुडिओची स्थापना १९८५ मध्ये झाली. हयाओ मियाझाकी आणि इसाओ ताकाहाताने मिळून या स्टुडिओचा प्रारंभ केला. ह्याचा उद्देश असा होता की जपानी ॲनिमेशनच्या माध्यमातून एक नवीन आणि कॅलिटेटिव्ह कथा सांगण्याची संधी मिळावी. "घिबली" हा शब्द इटालियन विमानप्रकार "घिबली" मधून आलेला आहे, जो म्हणजे "उत्साही वारा".
- प्रथम चित्रपट: घिबलीच्या पहिल्या चित्रपटाची नाव "कास्टल इन द स्काय" (१९८६) आहे. हा चित्रपट जपानमध्ये मोठ्या प्रमाणात लोकप्रिय झाला आणि घिबलीला एक प्रमुख ॲनिमेशन स्टुडिओ म्हणून ओळख मिळवून दिली.

## प्रसिद्ध चित्रपट:

- नाओवाशी" (१९८८): एक अत्यंत लोकप्रिय चित्रपट, ज्यात एक छोट्या मुलीच्या साहसांची कथा आहे.
- "स्पिरिटेड अवे" (२००१): हया मियाझाकी दिग्दर्शित, हा चित्रपट विशेषतः पश्चिमी देशांमध्ये मोठ्या प्रमाणात प्रशंसा मिळवला आणि त्याला ऑस्कर पुरस्कार मिळाला.
- "प्रिन्सेस मोनोनोके" (१९९७): हा चित्रपट पर्यावरणवाद आणि मानवतेच्या संघर्षावर आधारित आहे.
- "हाऊल्स मूव्हिंग कॅसल" (२००४): हा चित्रपट लांबल्या वयाच्या पुरुष आणि महिलांच्या संबंधावर आधारित आहे.

## घिबली आणि सुरक्षा


- वापरकर्त्यांनी एकदा त्यांचे फोटो सबमिट केले की ते त्या फोटोंच्या वापरावरील नियंत्रण गमावतात. तर OpenAI चे गोपनीयता धोरण असं सांगतं की वापरकर्ता इनपुट मॉडेल प्रशिक्षणासाठी वापरलं जाऊ शकतं. हे भविष्यासाठी धोक्याची घंटा आहे... असं देखील पोस्टमध्ये सांगण्यात आलं आहे.
- 1. गोपनीयतेचं उल्लंघन – फोटो अपलोड केल्यानंतर त्यावर तुमचा अधिकार राहत नाही. म्हणून तुमचा फोटो अन्य कामांसाठी देखील वापरला जावू शकतो.
- 2. ओळख चोरी: तुम्ही अपलोड केलेल्या फोटोंचा गैरवापर करून एखाद्याची ओळख चोरली जाऊ शकते.
- 3. सुरक्षित डेटा : यामुळे तुमची खासगी माहिती सुरक्षित राहू शकत नाही आणि तुम्ही हॅकिंगचे बळी होऊ शकतात.
- 4. चुकीचा वापर : तुमच्या फोटोंचा चुकीच्या कामासाठी उपयोग केला जाऊ शकतो. जसं की, खोटे प्रोफाईल बनवणे, इत्यादी...
- 5. कायदेशीर मुद्दे : वापरकर्त्यांच्या फोटोंचा अनधिकृत वापर कायदेशीर समस्या निर्माण करू शकतो. हे धोके लक्षात घेऊन, वापरकर्त्यांनी त्यांचे फोटो शेअर करण्यापूर्वी सावधगिरी बाळगली पाहिजे.



तंत्रज्ञान
डॉ. दीपक शिकारपूर
राष्ट्रसंचार
deepak@deepakshikarpur.com
संगणक तज्ज्ञ







# अवयवदान हेच खरे जीवनदान

**"मरणानंतरही आपण कोणाला जीवन देऊ शकतो. त्याहून मोठे दान दुसरे कोणतेही असू शकत नाही." अवयवदान ही एक महान आणि समाजोपयोगी संकल्पना आहे. एका व्यक्तीच्या अवयवदानामुळे ८ ते १० जणांचे प्राण वाचू शकतात. मात्र, भारतात अद्याप अवयवदानाचे प्रमाण तुलनेने कमी आहे. कारण अनेक लोक याबद्दल अनभिज्ञ आहेत किंवा त्यांच्यात गैरसमज आहेत. या लेखात अवयवदान का करावे, कोणते अवयव दान करता येतात, संपूर्ण प्रक्रिया कशी असते आणि नोंदणीसाठी फॉर्म कुठे मिळतो याविषयी सविस्तर माहिती दिली आहे.**



सामाजिक
किरण काळे, ग्रंथपाल पुणे
राष्ट्रसंचार

## अवयवदान का करावे?

- 1. मृत्यूनंतरही जीवनदान: आपल्या एका निर्णयामुळे अनेक लोकांना जीवन मिळू शकते.
- 2. अवयव तुटवड्यामुळे मृत्यू टाळता येतात: भारतात हजारो लोक प्रत्यारोपणाच्या प्रतीक्षेत असतात.
- 3. माणुसकीचा सर्वोच्च आदर्श: हे एक अनमोल दान आहे, जे मरणोत्तरही अजरामर ठेवते.
- 4. वैज्ञानिक आणि वैद्यकीय प्रगतीस मदत: काही अवयव संशोधनासाठी वापरले जातात, जे भविष्यात आरोग्यसेवेसाठी उपयोगी ठरते.

## कोणते अवयव दान करता येतात?

1. जिवंतपणी

- मूत्रपिंड : एखादी व्यक्ती दोन मूत्रपिंडांपैकी एक दान करू शकते.
- यकृताचा काही भाग: यकृत पुनर्जन्म घेऊ शकतो, त्यामुळे त्याचा काही भाग दान करता येतो.
- हाडांचा मज्जा : ल्युकेमियासारख्या आजारांवरील उपचारासाठी दान करता येते.

2. मृत्यूनंतर

हृदय, फुफ्फुसे, यकृत, मूत्रपिंडे, अग्न्याशय, डोळे, त्वचा, हाडे आणि हृदयाच्या झडपा

## अवयवदानाची प्रक्रिया

- राष्ट्रीय अवयव व ऊतक प्रत्यारोपण संस्था (NOTTO) वर नोंदणी करा.
- नोंदणीसाठी MOHAN फाउंडेशन किंवा इतर अधिकृत संस्थांची मदत घ्या.
- ऑनलाइन फॉर्म भरून किंवा प्रतिज्ञापत्र (Pledge) स्वाक्षरी करून नोंदणी पूर्ण करता येते.

## 2. मृत्यूनंतर अवयवदान प्रक्रिया

- रुग्णालयात मृत्यू झाल्यास: जर मृत्यू ICU किंवा हॉस्पिटलमध्ये झाला असेल, तर डॉक्टर्स संबंधित संस्थेशी संपर्क साधतात आणि अवयवदान प्रक्रिया सुरू होते.
- ब्रेन डेड व्यक्तीचे अवयवदान: ब्रेन डेड व्यक्तीच्या कुटुंबाच्या संमतीने अवयवदान शक्य होते. हा निर्णय लवकर घ्यावा लागतो, कारण अवयव मरायच्या आधी मिळवले गेले पाहिजेत.
- मृत्यूनंतर डोळे आणि ऊतकदान: नैसर्गिक मृत्यू झाल्यास, डोळे, त्वचा आणि हाडांसारखे ऊतक दान करता येतात.

## 3. वैद्यकीय चाचणी प्रक्रिया

- अवयव घेण्याआधी वैद्यकीय चाचण्या घेतल्या जातात.
- डॉक्टर्स तपासणी करून दानासाठी योग्य अवयव निश्चित करतात.
- गरजू रुग्णाला अवयव प्रत्यारोपण करण्यात येते.
- अवयवदानासाठी नोंदणी फॉर्म कुठे मिळेल आणि कुठे भरावा?

## 1. ऑनलाईन नोंदणीसाठी अधिकृत वेबसाइट्स:

- NOTTO (राष्ट्रीय अवयव व ऊतक प्रत्यारोपण संस्था): https://notto.gov.in
- MOHAN Foundation: https://mohanfoundation.org
- ROTTO (Regional Organ & Tissue Transplant Organization) आणि SOTTO (State Organ & Tissue Transplant Organization) च्या अधिकृत वेबसाइट्सवरही नोंदणी करता येते.

## 2. प्रत्यक्ष फॉर्म कुठे भरावा?

- हॉस्पिटलमध्ये भेट देऊन: अनेक रुग्णालये अवयवदानासाठी नोंदणी करतात.
- NGO आणि सामाजिक संस्थांमार्फत: अनेक स्वयंसेवी संस्था अवयवदान शिबिरे घेतात.
- ड्रायव्हिंग लायसन्स नोंदणीदरम्यान: काही राज्यांमध्ये ड्रायव्हिंग लायसन्स काढताना अवयवदाता होण्याचा पर्याय दिला जातो.

**उन्हाळ्यात सूर्याच्या अतिनील किरणांच्या दीर्घकाळ संपर्कात राहिल्याने, त्वचेला तीव्र उन्हाची जळजळ होते. कडक उन्हामुळे सनबर्न ही एक सामान्य समस्या आहे. हे घरगुती उपाय ते कमी करण्यासाठी खूप प्रभावी आहेत.**

# 'सनबर्न' : घरगुती उपाय

**१) कोरफड :** त्वचेला थंड ठेवण्यासाठी कोरफड हा एक अतिशय प्रभावी उपाय आहे. कोरफडीमध्ये दाहक-विरोधी गुणधर्म असतात, जे सनबर्न कमी करण्यास प्रभावी असतात. ते वापरण्यासाठी, ताज्या कोरफडीचे पान मध्यभागी कापून त्याचे जेल काढा. आता ते प्रभावित भागावर लावा आणि काही वेळ तसेच राहू द्या. यानंतर, ते साध्या पाण्याने स्वच्छ करा. हे जळलेल्या त्वचेला आराम देण्यास मदत करू शकते.





**२) नारळाच्या तेल :** उन्हामुळे जळजळ झाल्यास तुम्ही नारळाचे तेल वापरू शकता. नारळाच्या तेलात असलेले फॅटी ॲसिड आणि अँटीऑक्सिडंट्स त्वचेला मऊ करण्यासाठी प्रभावी असतात. तुम्ही ते लैव्हेंडर तेलात मिसळून त्वचेवर लावू शकता.

**३) ग्रीन टी :** ग्रीन टीमध्ये नैसर्गिकरित्या त्वचेची जळजळ कमी करण्याचा गुणधर्म आहे. याशिवाय, ते अँटिऑक्सिडंट गुणधर्मांचे भांडार आहे, जे त्वचेला नुकसान होण्यापासून रोखू शकते.




# युनूस यांची नसती उठाठेव

**बांगलादेशच्या पंतप्रधान शेख हसीना यांना पदच्युत केल्यानंतर नोबेल पारितोषिक विजेते मोहंमद युनूस यांची बांगलादेशच्या अंतरिम सरकारच्या मुख्य सल्लागारपदी निवड करण्यात आली. मोहंमद युनूस यांची बांगलादेश सरकारच्या मुख्य सल्लागारपदी निवड झाल्यावर भारताने त्याचे स्वागतच केले. त्यांच्या कारकिर्दीत भारत आणि बांगलादेश यांच्यात मैत्रीचे संबंध प्रस्थापित होतील असे भारताला वाटले होते पण त्यांनी भारताशी मैत्रीचे संबंध प्रस्थापित करण्याचे सोडाच उलट भारताशी पंगा घेण्याचेच त्यांनी ठरवले आहे.**

आंतरराष्ट्रीय
श्याम ठाणेदार, पुणे
राष्ट्रसंचार

मोहंमद युनूस हे पाकिस्तान आणि चीनच्या कच्छपी लागले असून भारताला पाण्यात पाहत आहे. त्यांच्या कारकिर्दीत भारत बांगलादेश संबंध सुधारण्याऐवजी बिघडतच चालले आहे. मोहंमद युनूस हे सत्तेवर आल्यापासून काही ना काही कारणाने भारताची कुरापत काढून भारताशी पंगा घेत आहेत याआधी त्यांनी जमाते इस्लामी या कट्टरपंथीय संघटनेवर घातलेली बंदी उठवली. याच संघटनेने बंदी उठल्यानंतर बांग्लादेशात अल्पसंख्यांक असलेल्या हिंदू धर्मीय नागरिकांवर हल्ले केले. भारताने हे हिंदूंवर होणारे हल्ले रोखवेत अशी विनंती त्यांच्याकडे केली पण त्यांनी त्याकडे सोईस्कर दुर्लक्ष केले त्यामुळे दोन्ही देशातील संबंध बिघडले हे संबंध पूर्ववत करण्या ऐवजी ते हे संबंध कसे बिघडतील हेच पाहत राहिले. भारताला डिवचण्यासाठी त्यांनी पाकिस्तान आणि चीनला जवळ केले. काही दिवसापूर्वी पाकिस्तानच्या गुप्तहेर संघटनेचे म्हणजे आय एस आय चे चार अधिकारी बांगलादेश दौऱ्यावर गेले होते. या अधिकाऱ्यांचे बांग्लादेशात जंगी स्वागत करण्यात आले. या अधिकाऱ्यांनी मोहंमद युनूस यांच्याशी चर्चा केली या चर्चेचा अजेंडा काय होता हे समोर आले नसले तरी यात काय चर्चा झाली असेल हे सांगायला तज्ज्ञांची गरज नाही. या चर्चेनंतर मोहंमद युनूस यांनी पाकिस्तानचे तोंडभरून कौतुक केले. भारताने यावर थेट मतप्रदर्शन केले नसले तरी त्यांनी पाकला जवळ करून भारताला खिजवले हे मात्र नक्की. पाकला जवळ करत भारताशी पंगा घेऊन मोहंमद युनूस शांत बसले नाही आता तर त्यांनी थेट भारताच्या सार्वभौमत्वालाच आव्हान दिले आहे. मोहंमद युनूस हे चार दिवसीय चीनच्या दौऱ्यावर गेले होते. या दौऱ्यात त्यांनी चीनचे अध्यक्ष क्षी जिनपिंग यांच्यासोबत ९ करार केले. जे करताना त्यांनी चीनला खुश करण्याचा नादात थेट भारताच्या सार्वभौमत्वालाच आव्हान दिले. या दौऱ्यात त्यांनी म्हंटले आहे की भारताच्या पूर्वोत्तर राज्यांना समुद्र लागून नाही. ही राज्ये पूर्णपणे जमिनीनी वेढलेली असल्याने चीनने या संधीचा फायदा घेऊन आपला प्रभाव वाढवावा. हे वक्तव्य करून त्यांनी एकप्रकारे चीनला भारताच्या ईशान्येकडील राज्यावर आक्रमण करावे असे चिथावले आहे. इतके करून ते थांबले नाही तर ते पुढे म्हणतात भारताच्या ईशान्येकडील राज्यांना केवळ जमीन आहे त्यांना समुद्र नाही. समुद्र फक्त बांगलादेशला आहे. समुद्राचे स्वामित्व फक्त बांगलादेश कडेच आहे आणि बांगलादेश हाच समुद्राचा रक्षक आहे. मोहंमद युनूस यांचे हे वक्तव्य अतिशय आक्षेपार्ह आणि निषेधार्ह आहे. त्यांचे हे वक्तव्य म्हणजे भारताला घेराव घालण्यासाठी चीनला आव्हान करणारे आहे. मोहंमद युनूस यांचे हे चिथावणीखोर वक्तव्य भारताच्या सार्वभौमत्वाला



आव्हान देणारेच आहे. ईशान्य भारताच्या सुरक्षिततेसाठी बांगलादेश सरकारचा हा दृष्टिकोन अत्यंत धोकादायक आहे. भारत सरकारने मोहंमद युनूस यांच्या या वक्तव्याची कडक शब्दात निंदा करायला हवी. ज्या बांगलादेशसारखा देश ज्याच्या स्वातंत्र्याला भारताने मदत केली तोच देश आता भारताच्या विरोधात जात आहे इतकेच नाही तर थेट भारताच्या सार्वभौमत्वाला आव्हान देत आहे हे दुर्दैवी आहे याला आळा बसायला हवा त्यासाठी बांगलादेशला त्यांची जागा दाखवून द्यायला हवी. बांगलादेशने त्यांची ही नसती उठाठेव बंद केली नाही तर भारत त्यांना त्यांची जागा दाखवून देईल असा इशाराच भारताने बांगलादेशला द्यायला हवा.

# "स्मार्ट सिटी मिशन" अपयशातून धडा घेण्याची गरज !

**२०१५ मध्ये सुरू झालेल्या "स्मार्ट सिटी मिशन" योजनेची दहा वर्षाची मुदत ३१ मार्च २०२५ रोजी संपली. देशपातळीवरील या योजनेचा आढावा घेतला तर प्रशासकीय अकार्यक्षमता, राजकीय नेत्यांचे आर्थिक हितसंबंध आणि चुकीच्या पद्धतीचे नियोजन व ढिसाळ अंमलबजावणी यामुळे आजच्या घडीला तरी या चांगल्या योजनेचा बोजवारा उडालेला दिसतो. या पार्श्वभूमीवर दहा वर्षात झालेल्या चुकांमधून राज्य व केंद्र शासन काही धडा घेणार का हा महत्त्वाचा प्रश्न निर्माण होतो. गेल्या दहा वर्षातील चुका सुधारल्या तरच हे मिशन यशस्वी होईल अन्यथा या 'स्मार्ट' शहरांची आणखी "माती" व्हायला आणखी वेळ लागणार नाही. या योजनेचा घेतलेला आढावा.**

- १) एखाद्या शहराला स्मार्ट सिटी म्हणून ओळख मिळवायचे असेल तर त्या शहरात उत्तम दर्जाची व कार्यक्षम आरोग्यसेवा, शिक्षणाच्या सुविधा, गृहनिर्माण व अन्य सर्व पायाभूत सुविधा निर्माण करण्याची योजना होती.
- २) स्मार्ट शहरातील सर्व नागरिकांना मूल्यवर्धित सेवा अत्यंत विश्वासार्हतेने व किफायतशीरपणे देण्याची कल्पना या मिशनमध्ये होती.
- ३) एवढेच नाही तर प्रत्येक शहरांमध्ये उत्तम गृहनिर्माण प्रकल्प हाती घेणे, कोण समाजाची आर्थिक वाढ चांगल्या प्रकारे करणे व सर्व उपलब्ध संसाधनांचे अत्यंत कार्यक्षम व प्रभारी व्यवस्थापन करण्याची जबाबदारी या मिशनवर टाकण्यात आली होती.
- ४) गेल्या काही वर्षातील बेरोजगारीचा प्रश्न सोडवण्याच्या उद्देशाने रोजगाराच्या नवनवीन संधी निर्माण करण्याची जबाबदारी ही या मिशनमध्ये नमूद करण्यात आलेली होती.
- ५) स्थानिक पातळीवरील अर्थव्यवस्थेला चालना मिळावी व त्याचबरोबर शहरीकरण होत असताना पर्यावरणाचे रक्षण करणे तसेच हवामान बदलाच्या संदर्भात त्याचा मुकाबला करणे, शहरातील सर्व वाहतूक सुव्यवस्थित करणे व शहरी समाजाच्या विविध गरजा पुरवण्यासाठी अद्ययावत म्हणजे स्मार्ट तंत्रज्ञानाचा जास्तीत जास्त कार्यक्षमपणे वापर करणे हीच या शहराची वैशिष्ट्ये निर्माण केली जावीत असे अत्यंत चांगले उद्दिष्ट ठेवण्यात आले होते.

सरकारने बरोबर दहा वर्षांपूर्वी "स्मार्ट सिटीज मिशन" (एससीएम) हा अत्यंत महत्त्वाकांक्षी प्रकल्प हाती घेतला. देशातील शंभर शहरांचे पुनर्नवीकरण व त्यांच्यात सुधारणा करण्याची ही योजना आहे. या सर्व शहरांमधील पायाभूत सुविधांमध्ये सुधारणा करणे व आर्थिक विकासाला चालना देणे हे या योजनेचे प्रमुख उद्दिष्ट होते. त्याचप्रमाणे या १०० शहरांवर आधारित त्याची नक्कल करून त्याचे एक आदर्श मॉडेल तयार करणे हे सुद्धा या योजनेचे उद्दिष्ट होते.

२०१६ मध्ये देशातील पहिल्या वीस शहरांची यादी जाहीर करण्यात आली. त्यात महाराष्ट्रातील पुणे व सोलापूर या दोन शहरांचा समावेश करण्यात आला होता. याशिवाय देशातील सर्व प्रमुख राज्यांमध्ये राज्यांमधील प्रमुख शहरांमध्ये स्मार्ट सिटी मिशन राबवण्याचे जाहीर करण्यात आले होते.

सर्वसामान्यांना स्मार्ट सिटी मिशन हे काय आहे हे समजायचे झाले तर त्या शहरातील नागरिकांना विविध प्रकारच्या सेवा देण्यासाठी अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर केला जातो. तसेच विविध प्रकारचा 'डेटा' म्हणजे माहिती संकलित करण्यासाठी विविध इलेक्ट्रॉनिक पद्धती व यंत्रणांचा वापर केला जातो. या माहितीद्वारे शहरातील कचऱ्याचे संकलन, उपयुक्त गोष्टींचा व्यवस्थित पुरवठा, शहरातील सर्व रस्त्यांवरील रहदारीची हालचाल व त्याचे योग्य नियंत्रण, पर्यावरणाचे व्यवस्थापन व सामाजिक सेवा आणखी कार्यक्षम करण्यासाठी सर्व प्रकारच्या उपाययोजना हाती घेण्याचे काम या स्मार्ट सिटी मिशन तर्फे केले जाते. माहिती व दळणवळण



तंत्रज्ञानाचा चांगला वापर करून सर्व शहरांच्या प्राधिकरणांना अध्यायावत निरीक्षण आणि नियंत्रण करण्याची यामध्ये कल्पना असून जनसमुदायाशी सहजगत्या संवाद साधत त्यांच्या अडीअडचणी दूर करण्याचे काम या मिशनमध्ये प्रामुख्याने आखण्यात आले होते.



**आर्थिक**
**प्रा. नंदकुमार काकिर्डे**
**राष्ट्रसंचार**

प्रत्यक्ष शहराचे एक गुणपत्रक म्हणजे स्कोअर कार्ड तयार करण्याची यात कल्पना होती. प्रत्येक शहरातील दरवर्षी होणारी प्रगती, हाती घेतलेल्या प्रत्येक मोहिमेचे परिणाम, विविध संसाधनांचे एकत्रीकरण आणि या सर्वांची प्रत्यक्ष अंमलबजावणी अशा निकषांवर पाहणी करून त्या आधारे गुण देण्याची चांगली संकल्पना होती यात शंका नाही. प्रत्येक स्मार्ट शहरांमध्ये चांगली आधुनिक आरोग्य केंद्र, विविध शैक्षणिक संस्था, शहरभर स्वच्छतेचा प्रसार, कार्यक्षम पाणीपुरवठा, कचऱ्याचे व्यवस्थापन व नागरिकांचे जीवन अधिक सुखकर करण्यासाठी अधिक सुविधा देण्याची ही स्मार्ट सिटी मिशनची कल्पना होती.

केंद्र सरकारने दहा वर्षात एकूण ११० शहरांमध्ये हे मिशन राबवण्यास प्रारंभ केला. मात्र त्यापैकी केवळ १८ शहरांमध्ये विविध स्मार्ट सिटी प्रकल्प वेळेवर पूर्ण करण्यात आले. म्हणजे ९२ शहरांमध्ये आजही हे सर्व काम अपूर्ण राहिले आहे. विशेष म्हणजे या १८ शहरांपैकी नऊ शहरे उत्तर प्रदेश व तामिळनाडू या दोन राज्यातील आहेत.

आज दहा वर्षानंतर या सर्व योजनांचा आढावा घ्यायचा प्रयत्न केला तर बहुतेक सर्व ठिकाणी त्याची झालेली प्रगती आणि त्याला मिळालेला निधी हा अत्यंत अपुरा असल्याचे आढळले.

११० शहरांमध्ये 'स्मार्ट सिटी मिशन "अंतर्गत ५१५१ प्रकल्प किंवा योजना हाती घेण्यात आल्या. त्यापैकी फक्त ३३ टक्के योजना पूर्णत्वास गेल्या व त्यांनी फक्त २५ टक्के निधीचा वापर केला.उदाहरण द्यायचे झाले तर २०१५ ते २०१९ या कालावधीत ४८ हजार कोटी रुपयांचे अंदाजपत्रक तयार केले होते व त्यापैकी ५० टक्के रक्कमही या काळात वापरण्यात आली नाही. शहरी विकासाची सर्वंकष चौकट तयार करण्यामध्ये या मिशनला अपयश आलेले दिसते. त्याचप्रमाणे इतक्या महत्त्वाकांक्षी प्रकल्पांमध्ये शाश्वत प्रकारचा गव्हर्नन्स अद्यापही निर्माण झालेला नाही. ही शहरे निर्माण करण्यासाठी तेथील स्थानिक स्वराज्य संस्था यांची भूमिका अत्यंत महत्त्वाची होती परंतु प्रत्यक्षात संबंधित सर्व संस्थांमध्ये समन्वयाचा अभाव हा प्रामुख्याने जाणवला आहे. या योजनेच्या योजनेची उद्दिष्ट गाठण्यासाठी सर्वत्र संपूर्ण शहराचा विचारच करण्यात आला नाही. मात्र त्या त्या शहरातील काही विशिष्ट भागांमध्येच स्मार्ट सिटीचे प्रकल्प राबवण्यात आले. असा दृष्टिकोन घेऊन केलेला विकास हा ओबडधोबड विकास झालेला आढळतो. पुणे शहर हे त्याचे उत्तम उदाहरण आहे.

जागतिक बँकेने स्मार्ट सिटी मिशनसाठी पुढील पंधरा वर्षात भारताने ७० ट्रिलियन रुपये खर्च करावेत असे सुचवले होते. मात्र जानेवारी २०२५ पर्यंत केवळ १.५ ट्रिलियन रुपये खर्च केले गेले. यावरून निधीची मोठी कमतरता असल्याचे स्पष्ट झाले. रिझर्व बँक ऑफ इंडिया ने याबाबत तयार केलेल्या एका अहवालामध्ये स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये अशा प्रकारचे मोठे प्रकल्प राबवण्याची क्षमता नसल्याचे नमूद केले होते. अनेक महानगरपालिका त्यांचे वाजवी उत्पन्न किंवा महसूल निर्माण करण्यात कमी पडल्याचे या अहवालात नमूद केले आहे. मराठीतील म्हणी प्रमाणे "एक ना धड व भाराभर चिंध्या" अशा स्वरूपात हा प्रकल्प बहुतेक सर्व शहरांमध्ये राबवण्यात आला. अकार्यक्षम अधिकारी, अयोग्य व अविचारी नियोजन, भ्रष्टाचारी कंत्राटदार आणि राजकीय नेत्यांचा अनावश्यक हस्तक्षेप अशा विविध कारणांमुळे या चांगल्या मिशनचे दहा वर्षात 'बारा' वाजलेले दिसतात. शहरी विकासाची आव्हाने व कार्यक्षम व्यवस्थापन याबाबतीत ही योजना अपेक्षा पूर्ण करू शकली नाही अशी वस्तुस्थिती आहे. खुद्द पुणे शहरातील एकूण वाहतूक, रस्ते, हवामान, अनियमित वीज व अपुरा पाणीपुरवठा, वाढत्या झोपडपट्ट्या, सर्वत्र निर्माण होणारे कचऱ्यांचे ढीग, नागरी सुविधांची अकार्यक्षमता, आपत्कालीन सेवा सुविधा आणि पदोपदी पैसे खाण्याची सर्व स्तरांवरील प्रवृत्ती यामुळे स्मार्ट सिटी तर सोडाच पण आपण शहरी अधोगतीकडे जात आहोत याचे दर्शन प्रत्येक पुणेकराला दररोज होत आहे.




पुण्यात ११४८ कोटी रुपयांचे ४५ प्रकल्प पूर्ण झाले आहेत असा प्रशासनाचा दावा आहे. प्रत्यक्षात वस्तुस्थिती माहित नाही. पुण्यातील स्मार्ट ट्रान्सपोर्टेशन सिस्टीम,स्मार्ट स्ट्रीट लाइटिंग,डिजिटल एक्सपिरीयन्स सेंटर, ई बसेस, विमानतळापासून शहराच्या विविध भागांमध्ये कार्यक्षम वाहतूक सेवा असे प्रकल्प हाती घेतले आहेत पण अद्याप ते सर्व अपूर्ण आहेत. या योजनेतील मोठा दोष म्हणजे प्रत्येक शहरामध्ये स्मार्ट सिटी मिशन राबवण्यासाठी स्वतंत्र विशिष्ट उद्देश कंपनी (ज्याला स्पेशल परपज व्हेईकल- एसपीव्ही) म्हणतात ती निर्माण करण्यात येऊन त्यांना काही अधिकार देण्यात आले. मात्र प्रत्येक शहरातील महानगरपालिका किंवा संबंधित स्थानिक स्वराज्य संस्था व या संस्था यांच्यात समन्वयाचा अभाव राहिला. त्याचप्रमाणे या मिशनमध्ये स्थानिक स्वराज्य संस्थांचे महत्त्व नगण्य किंवा कमी झाल्याने त्यांना याच्यात काही रस निर्माण झाला नाही. या मिशनचे उद्दिष्ट खूप चांगले असूनही त्यातील मानवी हक्कांवर आधारित दर्जा किंवा योजनांचे मुल्यांकन करण्याची योग्य यंत्रणा नसल्यामुळे या मिशनचे काम किती टक्के पूर्ण झाले, एकूण कामाचा दर्जा काय होता याबाबत फारशी आकडेवारी हाती लागली नाही.

### भीक नको पण कुत्रा आवरा

पुणे शहरच नाही तर आसपासच्या सर्व उपनगरांमध्ये अत्यंत बकालपणा वाढत आहे. "स्मार्ट सिटीची भीक नको परंतु भ्रष्टाचार व अकार्यक्षमतेचे कुत्रे आवरा "असे म्हणण्याची पाळी आली आहे. केंद्र व राज्य या दोघांनी दहा वर्षाच्या निमित्ताने या सर्वच प्रकल्पांचा गंभीरपणे आढावा घेऊन कृत्रिम बुद्धिमत्तेचा( एआय) चा वापर करून योग्य प्रगती व दिशा राखली तरच हा महत्त्वाकांक्षी प्रकल्प यशस्वी होईल. अन्यथा या शहरांची आणखी "माती " होईल हे सांगण्यासाठी कोणत्याही भविष्य वेत्त्याची गरज लागणार नाही.



# "योगा पँटपासून कॅफे लुकपर्यंत



**फॅशन**
**ज्योती हांडगे, पुणे**
**राष्ट्रसंचार**

कालपर्यंत स्पोर्ट्सवेअर फक्त वर्कआउटपुरतं मर्यादित होतं. पण आज? It's a whole vibe!

पुण्याच्या जॉगिंग पार्कपासून ते मुंबईच्या कॅफे पर्यंत, आणि नाशिकच्या फिटनेस स्टुडिओपासून कोल्हापूरच्या कॉलेज कँपसपर्यंत – महाराष्ट्रातल्या तरुणींची स्पोर्टी स्टाइल ही नव्या फॅशन चाप्टरची सुरुवातच आहे.

स्पोर्ट्सवेअर म्हणजे आता फक्त जिम गियर नाही – तो स्टेटमेंट बनला आहे. कंफर्ट, कूलनेस आणि कॉन्फिडन्स यांचं हे परफेक्ट कॉम्बो आहे.

### 1. योगा पँट्सची यंग क्रेझ

- आधी योगा पँट्स फक्त क्लासमध्ये घालायच्या होत्या. पण आता त्या स्टायलिश टी-शर्ट, क्रॉप टॉप्स किंवा हिप जैकेट्ससोबत मॅच करून स्ट्रीट लुक तयार केला जातो.

"वर्कआउट नसलं तरी स्टाइल आउट जरूर असते!" असं म्हणणाऱ्या गर्ल्ससाठी हा लुक परफेक्ट!

### 2. स्पोर्टी ब्रा विथ ॲटीट्यूड

- हाय-वेस्ट ट्रॅकपँट्ससोबत कलरफुल स्पोर्ट्स ब्रा ही आता कॉलेज गर्ल्समध्ये एक फॅशन स्टेटमेंट आहे. त्या Bold पण Graceful लुकसाठी ही पेअरिंग परफेक्ट ठरते. यावर लूज श्रग किंवा जॅकेट टाकलं की "फॅशन ऑन फ्लीक!"

### 3. स्नीकर्स – फक्त बूट नाही, मूड आहे!

- व्हाईट स्नीकर्स, निऑन शूज, कॅनवास विथ ॲटीट्यूड – तरुणींच्या बूट स्टाईलमधून त्यांचा मूड ओळखायला येतो. "पायात काय आहे?" यावरून आजकाल 'काय स्टायलिश आहे' हे ठरतं!

### 4. हुडीज विथ हायप – कूल गर्ल्सचा हिवाळी फॅशन

- स्पोर्टी हुडीज आता वर्कआउटनंतर कॅफेमध्येही सहज मॅच होतात. स्टेटमेंट प्रिंट्स, ब्रँडेड लोगो किंवा सॉफ्ट पेस्टल्स – प्रत्येक हुडी एक मूड ठरतो.

### 5. ॲथलीजर : जब जिम मिटस ट्रेंडी स्ट्रीट

- Athleisure म्हणजे ॲथलेटिक + लेजरवेअर – म्हणजे जिमवेअर इतकंच नाही, तर ते कॅज्युअल डेट, ब्रंच किंवा मॉलमध्ये फिरण्यासाठीही परफेक्ट. आजच्या तरुणी फक्त फिटनेस फ्रिक नाहीत, त्या फॅशन फॉरवर्ड आहेत.

### 6. ब्रँड्स आणि बडाज – कोण काय घालतोय याचं वेड!

- Nike, Adidas, Puma ते H&M आणि Decathlon – स्पोर्ट्सवेअर आता हाय फॅशनमध्ये गणला जातो. तरुणी ब्रँड्सपेक्षा फिट आणि लुकला जास्त प्राधान्य देतात, पण वो लोगो तो चाहिए! असा अट्टहासही आहे.

### 7. सोशल मीडियावरचा स्पोर्टी इफेक्ट

- Instagram रील्स, यूट्यूब व्लॉग्स, आणि Pinterest लुकबुक्स – यामुळे स्पोर्ट्सवेअरचा ट्रेंड तरुणींच्या लाइफस्टाईलचा भाग झाला आहे. फॅशन इन्फ्लुएन्सरच्या लुक्सना फॉलो करताना मुली स्वतःची स्टाइल डेवलप करत आहेत – आणि हेच आहे खऱ्या अर्थाने फॅशन डेफिनिशन.

### 8. फिटनेस + फॅशन = आत्मविश्वास

- स्पोर्ट्सवेअरमध्ये फक्त बाह्य सौंदर्य नसतं, तर आतली एनर्जीही असते.

"जेव्हा मी माझ्या स्पोर्ट्सवेअरमध्ये आरशात बघते, तेव्हा मला वाटतं – I'm ready to win the day!" – असं अनेक तरुणी म्हणतात.





# पत्नी स्वतःहून पतीपासून विभक्त झाल्यास पोटगी मिळणार नाही...!



**कायदेशीर बाबींची पूर्तता होणे आवश्यक असते. केवळ जुजबी आरोप करून पती किंवा पत्नी घटस्फोटाचा दावा दाखल करू शकत नाही. तसेच पोटगी मिळण्यासाठी देखील काही नियम आखून देण्यात आले आहेत. त्याचा देखील न्यायनिवाडा करताना विचार केला जातो. असेच एक प्रकरण उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठासमोर आले होते. त्यात पत्नीने स्वतःहून पतीपासून फारकत घेतल्याने याचिका फेटाळण्यात आली आहे. - ॲड. गायत्री कांबळे**



**कायदा**
**ॲड. गायत्री कांबळे**
**राष्ट्रसंचार**

न्यायालयात साक्षी आणि सादर केलेले पुरावे महत्वाचे असतात. त्यातही ठोस कारण आणि पुरावे असतील तरच निकाल आपल्या बाजूने लागण्याची शक्यता असते. आपल्याकडे पोटगीबाबत नियम ठरवण्यात आले आहेत. हिंदू विवाह कायदा, 1955 आणि इतर कायद्यांवर आधारित ते नियम आहेत. त्यानुसार प्रकरण

घटस्फोटाच्या प्रक्रियेत असताना, पती-पत्नीपैकी एकाला भरणपोषण मिळू शकते. घटस्फोटानंतर कायमस्वरूपी पोटगी देण्याची तरतूद आहे. परस्पर संमतीने घटस्फोट घेताना, दोन्ही पती-पत्नी पोटगी देण्यावर सहमत होऊ शकतात. घटस्फोटाच्या वेळी जर पोटगीची मागणी करणाऱ्या जोडीदाराला आधीच सबळ आधार असेल तर त्याला पोटगी दिली जात नाही. नागपूर खंडपीठात दाखल झालेल्या अशाच एका प्रकरणात पत्नीने स्वतःहून पतीपासून फारकत घेतल्याने तिला पोटगी देता येणार नाही असा निर्णय न्यायालयाने दिला आहे.

पतीची कोणतीही चूक अथवा इतर ठोस कारण नसताना स्वतःच्या मर्जीने वेगळी झालेली आणि पतीने सोबत नांदण्याकरिता बोलावल्यानंतरही परत जाण्यास नकार देणारी पत्नी पोटगी मिळण्यासाठी पात्र नाही, असा निर्णय मुंबई उच्च न्यायालयाच्यानागपूर खंडपीठाने दिला आहे.

या प्रकरणातील पत्नी अकोला तर, पती यवतमाळ जिल्ह्यातील आहे. त्यांचे २०१५ मध्ये लग्न झाले होते. त्यानंतर पत्नी केवळ दहा महिने पतीसोबत राहून माहेरी निघून गेली. दरम्यान, तिने पोटगीसाठी उच्च न्यायालयात याचिका दाखल करून पतीवर आरोप केले होते. लग्न जोडताना पती महाविद्यालयात व्याख्याता आहे. त्याला भरपूर वेतन मिळते. तो शिकवणी वर्गही चालवितो. त्याच्याकडे स्वतःचे घर व शेती आहे, अशी माहिती देण्यात आली होती. परंतु, ही माहिती खोटी होती. पती विनाअनुदानित महाविद्यालयात कार्यरत असून, त्याला केवळ नऊ हजार रुपये मासिक वेतन मिळते. तो यवतमाळ येथे केवळ एकाच खोलीत राहतो. पती व सासरची मंडळी वाईट वागणूकही देतात, असे पत्नीचे म्हणणे होते. परंतु, ती यापैकी एकही आरोप सिद्ध करू शकली नाही. त्यामुळे तिचे पतीपासून वेगळे होणे आधारहीन ठरले. उच्च न्यायालयाने ही बाब लक्षात घेता पत्नीची याचिका फेटाळून लावली आहे.

**पती पत्नीला सांभाळण्यास तयार**

पतीने पत्नीच्या देखभालीकडे दुर्लक्ष केले किंवा नकार दिला, याबाबत कोणतेही ठोस पुरावे न्यायालयाला आढळून आले नाही. उलट, पतीने पत्नीला समजावण्याचा प्रयत्न केला. तिला सोबत राहण्यासाठी परत बोलावले. तो तिला सांभाळण्यास तयार होता. परंतु, पत्नी तयार झाली नाही, हे रेकॉर्डवरून स्पष्ट झाले.

**आधी कुटुंब न्यायालयात अर्ज**

पत्नीने सुरुवातीला फौजदारी प्रक्रिया संहितेमधील कलम १२५ अंतर्गत कुटुंब न्यायालयात अर्ज दाखल करून पोटगी मागितली होती. २०२२ मध्ये कुटुंब न्यायालयाने तो अर्ज फेटाळून लावला. त्या निर्णयाविरुद्ध तिने उच्च न्यायालयात धाव घेतली होती. उच्च न्यायालयाने कुटुंब न्यायालयाचा निर्णय कायम ठेवला आहे.



# 'थामा'साठी थोडं थांबा



'स्त्री', 'भेडिया' आणि 'मुंज्या' नंतर निर्माता दिनेश विजन त्याच्या हॉरर कॉमेडी विश्वातील पुढचा चित्रपट म्हणजेच 'थामा' अभिनेता आयुष्मान खुरानाबरोबर बनवत आहे. या चित्रपटात आयुष्मान एका व्हॅम्पायरची भूमिका साकारणार आहे. 'स्त्री' ने वरुण धवनच्या हॉरर-कॉमेडी 'भेडिया' त प्रवेश केला होता आणि 'स्त्री २' मध्ये वरुण धवन लांडग्याच्या भूमिकेत आला होता. त्याचप्रमाणे दिनेश विजन 'थामा'ला त्याच्या मागील हॉरर-कॉमेडी चित्रपटाशी जोडणार आहे.

'थामा' मध्ये दिनेश विजनच्या भयपट विश्वात भर घालणारे पात्र म्हणजे लांडगा. चित्रपट वर्तुळातील वृत्तानुसार, 'थामा' चित्रपटात थामा आणि भेडिया यांच्यातील संघर्षाचा एक जबरदस्त सीन असेल. अलीकडेच, वरुण धवन आणि आयुष्मान यांनी मुंबईतील एका स्टुडिओमध्ये यातील काही महत्त्वपूर्ण दृश्यांचे चित्रीकरण पूर्ण केले. 'मुंज्या'चे दिग्दर्शक आदित्य सरपोतदार यांच्याच दिग्दर्शनाखाली बनवण्यात येणाऱ्या 'थामा' मधील हा सीन भव्यदिव्य करण्यासाठी आंतरराष्ट्रीय तंत्रज्ञांची मदत घेण्यात आल्याचे बोलले जाते. हे दृश्य 'थामा'साठी महत्वाचे असेल. दिनेश विजन यांनी गेल्या वर्षी ऑक्टोबर महिन्यात 'थामा'ची घोषणा केली होती. हा चित्रपट रोमॅंटिक असण्यासोबतच हॉरर-कॉमेडीही असेल. चित्रपटाची कथा एका अपूर्ण प्रेमकथेभोवती फिरणारी आहे. आयुष्मान खुराना व्यतिरिक्त 'सिकंदर' अभिनेत्री रश्मिका मंदाना यात मुख्य भूमिकेत दिसेल. या चित्रपटात नवाजुद्दीन सिद्दीकी आणि परेश रावल हे देखील महत्त्वाच्या भूमिकेत दिसणार आहेत. हा चित्रपट यावर्षीच्या दिवाळीला थिएटरमध्ये प्रदर्शित होणार आहे.

'थामा' व्यतिरिक्त दिनेश विजन त्याच्या हॉरर आणि कॉमेडी विश्वात चित्रपटाचे सिक्वेल देखील बनवणार आहे. तो 'स्त्री ३' आणि 'भेडिया २' वरही काम करत आहे. 'मुंज्या'चा क्लायमॅक्स पाहून त्याचा सिक्वेल येऊ शकतो, असे मानले जात आहे.



# जान्हवीने जिंकली अनेकांची मने

बॉलिवूड अभिनेत्री जान्हवी कपूर कायम चर्चेत असते. कधी बोल्ड लूकमुळे तर कधी सिनेमांमुळे ती आकर्षणाचा केंद्रबिंदू ठरते. अलिकडेच जान्हवी कपूर एका कार्यक्रमात दिसली. यासाठी तिने अतिशय ग्लॅमरस लूक केला होता. या कार्यक्रमातील जान्हवीचे फोटो आणि व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल होत आहेत. दरम्यान, एका व्हिडीओने सर्वांचे लक्ष वेधले आहे. या व्हिडीओमध्ये जान्हवीने जॅकेटचा बंद सोडला असून फोटोसाठी पोझ दिली आहे.

ही चर्चा कोणत्या कार्यक्रमाची आहे, हे एव्हाना वाचकांना समजलेच असेल. होय, जान्हवी कपूरने नुकतीच 'लॅक्मे फॅशन विक'ला हजेरी लावली होती. यावेळी तिने रॅम्प वॉक केला. तिने डिझायनर राहुल मिश्राने डिझाइन केलेला ड्रेस घातला होता. या काळ्या रंगाच्या बॉडीकॉर्न ड्रेसवर छोटी फुले आहेत. ड्रेसला स्ट्रॅपलेस ठेवण्यात आले आहे तर थाय हाय स्लिट कटदेखील देण्यात आला आहे. या काळ्या रंगाच्या बॉडीकॉर्न ड्रेसवर जान्हवीने न्यूड मेकअप केला तर केस मोकळे सोडले. या लूकमध्ये जान्हवी अतिशय हॉट दिसली आहे.

सोशल मीडियावर 'लॅक्मे फॅशन विक'मधील अन्य काही व्हिडीओ व्हायरल झाले असले तरी जान्हवीच्या लूकनेच सर्वांचे लक्ष वेधले. जान्हवीने काळ्या बॉडीकॉर्न ड्रेसवर काळ्या रंगाचे जॅकेट घातले होते. रॅम्पवर वॉक करत असताना ती फोटोग्राफर्सला पोज देत होती. पोज देत असताना तिने जॅकेटचा बंद सोडला आणि बाजूला काढून टाकला. त्यानंतर काळ्या बॉडीकॉर्न ड्रेसमध्ये जान्हवी अतिशय हॉट दिसली. तिच्या या लूकचे चाहते कौतुक करत आहेत. कोणीतरी तिला बॉलिवुडची 'फॅशन दिवा' म्हटले तर कोणी ती मोठी सुपरस्टार बनण्याच्या मार्गावर असल्याचे म्हटले. एकूणच जान्हवी कपूरचा हा आतापर्यंतचा सर्वोत्तम लूक असल्याची चर्चा तिचे मनोधैर्य वाढवेल, हे नक्की.

# 'सिकंदर'ची दमदार चाल

सलमान खानचा बहुप्रतिक्षित चित्रपट 'सिकंदर' प्रदर्शित झाला आणि त्याने प्रेक्षकांची मने जिंकलेली दिसली. 'गजनी' चित्रपटातून हिंदी चित्रपटसृष्टीत धुमाकूळ घालणारे एआर मुरुगदास तब्बल १७ वर्षांनी 'सिकंदर' द्वारे बॉलिवूडमध्ये परतले आहेत. हा चित्रपट बॉक्स ऑफिसवर जबरदस्त कलेक्शन करत असून पहिल्याच दिवशी त्याने बोलबाला असणाऱ्या म ल्याळम चित्रपटाला मागे टाकल्याचे समजले आहे.



चित्रपटाचा व्यवसाय आता गगनाला भिडत असून याच स्पर्धेत आता 'सिकंदर'नेही एन्ट्री घेतली आहे. अर्थातच त्याचा परिणाम मल्याळम चित्रपट 'एलरएम्पूरन'वर स्पष्टपणे झाला. पहिल्याच दिवशी 'सिकंदर'मुळे 'एलरएम्पुरन'ला देशांतर्गतच नव्हे तर जगभरातील बरेच कलेक्शन गमवावे लागले.

सलमान खान स्टारर 'सिकंदर' ने पहिल्या दिवशी देशांतर्गत बॉक्स ऑफिसवर जबरदस्त कमाई केली. या चित्रपटाने बॉक्स ऑफिसवर केवळ भारतात ३०.६ कोटी रुपये तर परदेशात १० कोटी रुपयांची कमाई केल्याचे आकडेवारी सांगते. त्यामुळे 'सिकंदर'चे एकूण बॉक्स ऑफिस कलेक्शन ३५ कोटींच्या बरेच पुढे गेले आहे.

२७ मार्च रोजी थिएटरमध्ये प्रदर्शित झालेला 'एलरएम्पूरन' पहिल्या दिवसापासूनच देशांतर्गत बॉक्स ऑफिसवर तसेच जगभरात मोठी कमाई करत होता. पण सिकंदर येताच त्याच्या कमाईत घट झाली. मोहनलाल स्टारर चित्रपटाने चौथ्या दिवशी देशांतर्गत बॉक्स ऑफिसवर १४ कोटी रुपये कमावले. 'एलरएम्पुरन'चे जगभरातील एकूण कलेक्शन ३८ कोटी रुपये आहे. मात्र आता या बाबतीत 'सिकंदर'ने पुढे चाल घेतली आहे.

मात्र इथे लक्षात घ्यायला हवे की, 'एलरएम्पुरन' ने अवघ्या ४८ तासांमध्ये जगभरात १०० कोटी रुपयांचा गल्ला जमवल्यामुळे २०२५ च्या सर्वाधिक कमाई करणाऱ्या चित्रपटांच्या यादीत स्थान मिळवले आहे. पृथ्वीराज सुकुमारन दिग्दर्शित 'एलरएम्पुरन' ने पहिल्या चार दिवसांमध्येच जगभरात एकूण १७४.३५ कोटी रुपयांचा व्यवसाय केला तर भारतातही प्रेक्षकांची मने जिंकली. मात्र आता त्याची जागा सिकंदर घेताना दिसतो आहे.



# नवा सवंगडी मिळाला?

वैयक्तिक आयुष्यामुळे ग्लॅमरस मलाइका अरोरा नेहमीच चर्चेत असते. मात्र तिच्यासाठी अलिकडचे काही दिवस खूप कठीण होते. सुरुवातीला तिने बॉयफ्रेंड अर्जुन कपूरशी ब्रेकअप केले. काही महिन्यांपूर्वी तिच्या वडिलांचेही निधन झाले. मात्र या कठीण काळातून बाहेर पडल्यानंतर मलाइका आता पुढे चालली आहे.

अलिकडेच ती चेन्नई सुपर किंग्ज आणि राजस्थान रॉयल्स यांच्यातील आयपीएल २०२५ चा सामना पाहण्यासाठी स्टेडियममध्ये गेली होती. या काळात ती एका दिग्गज क्रिकेटपटूसोबत दिसली आणि अर्थातच त्यानंतर तिला पुन्हा एकदा प्रेम मिळाल्याची चर्चा सुरू झाली. राजस्थान रॉयल्सला पाठिंबा देण्यासाठी मलाइका अरोरा पोहोचली तेव्हा तिने आरआर जर्सीदेखील घातली होती आणि आयपीएल संघाचे माजी मुख्य प्रशिक्षक आणि श्रीलंकेचा माजी क्रिकेटपटू कुमार संगकारा यांच्यासोबत ती बसली होती. सोशल मीडियावर व्हायरल होणाऱ्या फोटोमध्ये दोघेही एकत्र बसलेले दिसल्यामुळे चर्चेला तोंड फुटले.

हा फोटो व्हायरल झाल्यानंतर, 'छैया छैया गर्ल' आणि श्रीलंकेचा लोकप्रिय क्रिकेटपटू कुमार संगकारा यांच्या डेटिंगबद्दल अटकळ बांधली जाऊ लागली आहे. एका वापरकर्त्याने विचारले, 'ते डेटिंग करत आहेत का?' तर एक म्हणाला, 'शहरात आणखी एक जोडपे आहे.' एकाने म्हटले, 'अरोरा मॅडम संगासोबत इथे काय करत आहे, काही गोंधळ चालू आहे का?' तर एकाने म्हटले 'त्यांच्यात काही शिजते आहे का?' एका व्यक्तीने या दोघांचे कौतुकही केले. त्यांपैकी एकाने तर असेही म्हटले की, संगा लवकरच तिच्याशी लग्न करेल. एकंदरच सध्या सोशल मीडियावर अशा असंख्य प्रतिक्रियांचा पाऊस पडताना दिसतो आहे.

यापूर्वी मलाइका अरोरा डेटिंग करत असल्याच्या चर्चा होत्याच. तिचे नाव स्टायलिस्ट राहुल विजयशीही जोडले जात होते.



# कपिल पुन्हा येतोय

नुकतीच देशभरात ईद साजरी झाली. दरम्यान प्रसिद्ध कॉमेडियन कपिल शर्माच्या एका पोस्टने सर्वांनाच आश्चर्यचकित करुन टाकले. त्याने ईद मुबारकच्या शुभेच्छा देणारी एक पोस्ट शेअर केली ज्यामध्ये तो पत्नीबरोबर मुस्लिम वराच्या वेशात दिसला. म्हणजेच त्याने एका मुस्लिम मुलीशी लग्न केले आहे. अर्थातच खऱ्या आयुष्यात नाही तर रील लाईफमध्ये...!

कपिल शर्मा लवकरच मोठ्या पडद्यावर विनोदाचे रंग भरण्यासाठी येत आहे. तब्बल १० वर्षांनंतर त्याच्या 'किस किस को प्यार करूं' या चित्रपटाचा सिक्वेल येत आहे. ताज्या पोस्टमध्ये 'किस किसको प्यार करूं २' मधील या अभिनेत्याचा पहिला लूक समोर आला आहे.

**कपिल शर्मा वर बनला**

या पोस्टरमध्ये कपिल ऑफ व्हाइट शेरवानी आणि सेहरा घातलेल्या वराच्या भूमिकेत दिसत आहे. तसेच त्याचा चेहरा फिकट दिसत आहे. कपिलच्या शेजारी त्याची पत्नी असून तिने निळा लेहेंगा आणि बुरखा घातला आहे. पोस्टरमध्ये कपिलच्या ऑन-स्क्रीन पत्नीचा चेहरा दिसत नाही. पोस्ट शेअर करताना कपिल शर्माने कॅप्शनमध्ये 'ईद मुबारक' असेही लिहिल्याचे दिसले. कपिल शर्माचा हा लूक पाहून चाहत्यांना आशा आहे की, हा चित्रपट 'किस किस को प्यार करूं' या पहिल्या चित्रपटाप्रमाणेच मजेदार असेल. अर्थातच सोशल मीडियावर काहींनी त्याला चिडवलेही आहे. २०१५ मध्ये प्रदर्शित झालेल्या 'किस किस को प्यार करूं' या चित्रपटात कपिलने चार लग्ने केली होती, हे वाचकांना ज्ञात असेलच.

यापूर्वी कपिल शर्माचा एक व्हिडिओ 'किस किस को प्यार करूं २' च्या सेटवरून लीक झाला होता. त्यामध्ये तो एका वेगळ्याच लूकमध्ये दिसला होता. तेव्हा तो भोपाळमध्ये चित्रपटाचे चित्रीकरण करत होता. लीक झालेल्या व्हिडिओमध्ये कपिल सरदाराच्या वेशात दिसत होता. एका ठिकाणी तो विंटेज कार चालवतानाही दिसला.

कलाकारांबद्दल बोलायचे झाले तर, या चित्रपटात त्याच्याबरोबर अभिनेत्री पारुल गुलाटी, 'आश्रम' फेम बबिता भाभी म्हणजेच त्रिधा चौधरी आणि 'बिग बॉस' फेम अभिनेत्री आयेशा असेल. यांच्यासोबत मनजोत सिंग, आणि कॉमेडियन जेमी लिव्हर देखील या चित्रपटात दिसणार आहेत. रिलीजची तारीख अद्याप जाहीर झालेली नाही.



# कशी असेल '...जमवा जमवी?'

चित्रपट आणि प्रेमकथा यांचं एक वेगळंच नातं असतं. अनेक चित्रपटांमधून ते बघायला मिळतं. एखादी चिरपरिचित कथा कसलेल्या कलाकारांच्या माध्यमातून पडद्यावर उलगडते तेव्हा प्रेक्षक भरभरून दाद देतात. प्रेमाची अशीच एक व्याख्या लवकरच आपल्याला अनुभवायला मिळणार आहे. राजकमल एंटरटेनमेंट प्रस्तुत, लोकेश गुप्ते लिखित आणि दिग्दर्शित, अशोक सराफ आणि वंदना गुप्ते यांच्या प्रमुख भूमिका असणारा 'अशी ही जमवा जमवी' नामक नवा मराठी चित्रपट लवकरच प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. काही दिवसांपूर्वीच या चित्रपटाची घोषणा करण्यात आली होती आणि नुकतेच त्याचे पहिले पोस्टरही प्रदर्शित करण्यात आले. या चित्रपटात प्रेक्षकांना नव्या-जुन्या कलाकारांचा सुंदर मेळ पाहायला मिळणार आहे. पोस्टर पाहून प्रेक्षकांमध्ये उत्सुकता निर्माण झाली आहे. या चित्रपटात अनेक वर्षांनी अशोक सराफ आणि वंदना गुप्ते ही जोडी पडद्यावर एकत्र दिसणार आहे. याशिवाय ओमकार कुलकर्णी आणि तनिष्का विशे ही नवी जोडीही झळकणार आहे. यांच्या बरोबर चित्रपटात सुनील बर्वे, चैत्राली गुप्ते, मिलिंद फाटक, सुलेखा तळवलकर, पुष्कराज चिरपुटकर असे लोकप्रिय कलाकारही महत्त्वाच्या भूमिकेत बघायला मिळतील. लोकेश गुप्ते यांनी या चित्रपटाचे लेखन आणि दिग्दर्शन केले आहे. तेव्हा मराठी रसिकांना हा चित्रपट आनंद देईल, अशी आशा आहे.

# हम साथ-साथ है!



घटस्फोटाच्या बातम्यांमुळे अभिषेक बच्चन आणि ऐश्वर्या राय काही काळापूर्वी चर्चेत होते. अर्थात या जोडप्याने अफवांवर कोणतेही विधान केले नाही. पण त्यानंतर दोघेही अनेक वेळा एकत्र दिसले. अलिकडेच अभिषेक-ऐश्वर्या मुलगी आराध्यासह एका लग्नाला उपस्थित होते. अभिनेत्रीची चुलत बहीण श्लोका शेट्टीच्या भावाच्या लग्नाला अभिषेक-ऐश्वर्या उपस्थित होते. फोटोंमध्ये आराध्या पांढऱ्या लेहेंग्यामध्ये सुंदर दिसत आहे. आराध्याने तिचा देसी लूक कमीत कमी मेकअपसह सांभाळला आहे. या सोहळ्यात ऐश्वर्या हिरव्या रंगाच्या अनारकली सूटमध्ये दिसली तर अभिषेक पीच रंगाचा इंडो-वेस्टर्न सूट परिधान करताना दिसला.

त्याआधी मुंबईत दिग्दर्शक आशुतोष गोवारीकर यांचा मुलगा कोनार्कच्या लग्नालाही ऐश्वर्या आणि अभिषेक बच्चन उपस्थित होते. ऐश्वर्याने आशुतोष गोवारीकर दिग्दर्शित जोधा अकबर (२००८) चित्रपटात काम केले होते. डिसेंबरच्या सुरुवातीलाही दोघे एका हाय-प्रोफाइल पार्टीत एकत्र दिसले होते.

त्यांच्या घटस्फोटाच्या अफवा पसरू लागल्या तेव्हा दोघांनीही अनंत-राधिकाच्या लग्नात वेगवेगळा प्रवेश केल्यामुळे आणखी हवा मिळाली. इतकेच नव्हे तर संपूर्ण लग्नात ते एकत्र दिसले नव्हते. यानंतर ऐश्वर्या मुलीबरोबर सुट्टीवर गेली. अर्थातच तेव्हाही अभिषेक त्यांच्याबरोबर नव्हता.

# सासरी सुखात आहे



बॉलिवूड अभिनेत्री सोनाक्षी सिन्हा आणि झहीर इक्बाल हे जोडपं नेहमीच चर्चेत असतं. नुकतीच या दोघांनी लग्नानंतरची पहिली ईद साजरी केली. फोटोंमध्ये ते एकमेकांसोबत मस्ती करताना दिसतात. या अभिनेत्रीने कुटुंबवर लाइव्ह सेशन दरम्यान वैवाहिक आयुष्याविषयी भाष्य केले आहे. सध्या त्याची बरीच चर्चा आहे.

सोनाक्षी सिन्हानं यावेळी माहेर आणि सासरच्या लोकांमध्ये असणाऱ्या अंतराविषयी सांगितलं आहे. एका चाहत्यानं तिला माहेर आणि सासरमध्ये काय फरक आहे? असा प्रश्न केला होता. त्यावर उत्तर देत सोनाक्षीनं सांगितलं की, तिच्यावर घरातील सगळेच खूप प्रेम करतात. पण सासरचे लोक तिला मुलीसारखी वागणूक देतात आणि खूप प्रेम करतात. त्यामुळे आधीपासूनच त्यांच्या कुटुंबाचा एक भाग असल्यासारखे वाटत असल्याचे ही अभिनेत्री सांगते.

सोनाक्षी सिन्हानं चाहत्याला उत्तर देत सांगितलं की, 'एक मुलगी म्हणून माझ्या घरात अगदी आनंदानं, प्रेमानं, राहत होते. पण सासरच्या घरी ते मला मुलीपेक्षा जास्त प्रेम देतात. मी खरंच भाग्यवान आहे की असं सासरं मिळालं आहे. कोणाची तरी मुलगी आपल्या घरी आहे, याचे सासरच्या लोकांना भान आहे. त्यामुळे ते प्रत्येकवेळी थोडं जास्तच प्रेम करतात आणि मी कायम याच कुटुंबाचा भाग होते अशी जाणीव करून देतात. त्यामुळे जणू मी आधीपासूनच या घरात राहत असल्यासारखे वाटते... या दोघांनी जून २०२४ मध्ये लग्न केलं. पण तिचे भाऊ या लग्नात सहभागी झाले नव्हते. शत्रुघ्न सिन्हा आणि पूनम सिन्हा हे दोघेच लेकीला आशीर्वाद देण्यासाठी आले होते. तेव्हा आता बहीण सासरी आनंदात असल्याचे समजल्यानंतर तरी तिचे भाऊ त्यांच्या आनंदात सहभागी होतील, अशी आशा करू या.



## घरफोडी करणारा जेरबंद

**पुणे :** विद्यार्थी वसतिगृहात राहून घरफोडी करणाऱ्या परप्रांतीय चोरट्याला आंबेगाव पोलिसांनी अटक केली. त्याच्याकडून दोन लाख २७ हजार रुपयांचा ऐवज जप्त करण्यात आला आहे. चोरट्याने आंबेगाव, बावधन, लोणीकंद परिसरात घरफोडीचे गुन्हे केल्याचे तपासात उघडकीस आले आहे.व्यंकटेश रमेश (वय २२ वर्षे, रा. पी.जी. बिल्डिंग, एमआयटी महाविद्यालयाजवळ, कोथरूड, मूळ रा. बंगळुरू, कर्नाटक) असे अटक करण्यात आलेल्याचे नाव आहे. १७ मार्च रोजी कात्रज भागातील आंबेगाव बुद्रुक परिसरात भरदिवसा एका सदनिकेचे कुलूप तोडून सोन्याचे दागिने आणि रोकड चोरून नेण्यात आली होती. याप्रकरणी आंबेगाव पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. पोलिसांनी याप्रकरणाचा तपास सुरू केला. परिसरातील सीसीटीव्ही कॅमेऱ्यांनी केलेले चित्रीकरण तपासले. चित्रीकरणावरुन तपास करुन पोलिसांनी रमेश याला ताब्यात घेतले. चौकशीत त्याने आंबेगाव, लोणीकंद आणि बावधन भागात घरफोडी केल्याची कबुली दिली.

## मोटारीची काच फोडून रोकड लांबविली

**पुणे :** मोटारीची काच फोडून पाच लाखांची रोकड चोरून नेण्यात आल्याची घटना पर्वती भागातील मित्र मंडळ चौकात घडली. याप्रकरणी चोरट्यांविरुद्ध पर्वती पोलिसांनी गुन्हा दाखल केला. मार्केट यार्ड भागात दुचाकीची डिकी उचकटून चोरट्यांनी एक लाखांची रोकड चोरून नेल्याचा प्रकार उघडकीस आला.

याबाबत एका व्यावसायिक तरुणाने पर्वती पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, तक्रारदार तरुण मार्केट यार्डात भागात राहायला आहे. तक्रारदार तरुणाच्या कुटुंबीयांचा व्यवसाय आहे. व्यवसायासाठी लागणारी रोकड काढण्यासाठी तरुण मोटारीतून एका बँकेत गेला होता. तेथून रोकड काढून तो शुक्रवारी (४ एप्रिल) मित्र मंडळ चौकात आला. मित्र मंडळ चौक परिसरात त्याने मोटार लावली होती. दुपारी साडेचारच्या सुमारास चोरट्यांनी मोटारीची काच फोडून खोक्यात ठेवलेली पाच लाख रुपयांची रोकड चोरुन नेली. पोलीस कर्मचारी मरगजे तपास करत आहेत.

## कंपनी मालकाला खंडणी मागणारा जेरबंद

**पुणे :** बुलेट, तसेच मोटार विक्री करणाऱ्या कंपनीविरुद्ध केंद्रीय प्रदुषण नियंत्रण मंडळ, तसेच महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाकडे तक्रार देण्याची धमकी देऊन २० लाखांची खंडणी मागणाऱ्या दोघांविरुद्ध वारजे पोलिसांनी गुन्हा दाखल केला. याप्रकरणी विजय म्हस्के आणि अविनाश रमेश रोकडे यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत एका वाहन विक्री करणाऱ्या कंपनीतील वरिष्ठ व्यवस्थापकांनी वारजे पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, तक्रारदार तरुण वाहन विक्री करणाऱ्या कंपनीत वरिष्ठ व्यवस्थापक असून, ते सासवड परिसरातील एका गावात राहायला आहेत. संबंधित कंपनी त्यांच्या मावसभावाची आहे. त्यांच्या कंपनीचे मोटार विक्री करण्याचे दालन वारजे भागात आहे. या दालनातील सर्व जबाबदारी पाहण्याचे काम त्यांच्याकडे आहे. आरोपी विजय म्हस्के २०१७ मध्ये संबंधित कंपनीत कामाला होता. सहा महिने काम केल्यानंतर त्याने काम सोडून दिले होते.

## फर्ग्युसनतर्फे मोफत पायाभूत अभ्यासक्रम

**पुणे :** शैक्षणिक वर्ष २०२५-२६मध्ये अकरावीला विज्ञान शाखेत प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी ४५ दिवसांचा मोफत पायाभूत अभ्यासक्रम राबवण्यासाठी फर्ग्युसन कनिष्ठ महाविद्यालयाने पुढाकार घेतला आहे. हा अभ्यासक्रम १० एप्रिलपासून सुरू करण्यात येणार असून, त्यात स्पर्धा परीक्षांच्या दृष्टीने भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र, गणित (पीसीएम), भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र, जीवशास्त्र (पीसीबी) या गटांतील मूलभूत संकल्पना शिकवल्या जाणार आहेत.

फर्ग्युसन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विजय तडके, उपप्राचार्य डॉ. डी. डी. कुंभार यांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे ही माहिती दिली. अभियांत्रिकी, वैद्यकीय अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठी संयुक्त प्रवेश परीक्षा (जेईई), राष्ट्रीय प्रवेश पात्रता परीक्षा (नीट), एमएचटी-सीईटी अशा परीक्षांची विद्यार्थी तयारी करतात. या विद्यार्थ्यांचे भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र, गणित आणि जीवशास्त्र या विषयांचे पायाभूत ज्ञान पक्के करून घेण्यासाठी पायाभूत अभ्यासक्रम राबवला जाणार आहे.

# फडणवीसांनी लुटला गीतरामायणाचा आनंद

## गीतरामायणाचे आणि राम-सीता स्वयंवराचे भव्य नाट्य सादरीकरण

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** ग्रॅव्हिटी ग्रुपचे अध्यक्ष डॉ. मिहीर कुलकर्णी यांच्या नेतृत्वाखाली राम नवमीच्या पूर्वसंध्येला "सखी गीतरामायण आणि राम-सीता स्वयंवर" या भव्य आणि ऐतिहासिक कार्यक्रमाचे आयोजन पुण्यातील गणेश कला क्रीडा मंच, स्वारगेट येथे अत्यंत भक्ती-भावात पार पडले. या आध्यात्मिक कार्यक्रमात हजारो रामभक्तांनी सहभाग घेतला आणि भक्तीमय अनुभवाचा लाभ घेतला.

या कार्यक्रमात महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहिले आणि त्यांनी कार्यक्रमाची शोभा वाढवली. त्यांच्यासोबत खासदार मेधा कुलकर्णी, आमदार हेमंत रासणे, आमदार भीमराव तापकीर यांच्या सोबत अनेक मान्यवर व सांस्कृतिक क्षेत्रातील प्रतिष्ठित व्यक्तिमत्त्वांनीही सहभाग नोंदवला.

मुख्यमंत्री श्री देवेंद्र फडणवीस यांनी आपल्या भाषणात सांगितले, की "भगवान श्रीराम हे केवळ धर्म आणि मर्यादेचे प्रतीक नसून, भारताच्या सांस्कृतिक आणि नैतिक मूल्यांचे मूळ आहेत. आज या अद्वितीय कार्यक्रमाला उपस्थित राहून मी स्वतःला भाग्यवान समजतो. गीतरामायणाची सादरीकरण आणि राम-सीता स्वयंवराचे नाट्य सादरीकरण इतके भव्य आणि सुंदर झाले की प्रत्येक प्रेक्षक भावविव्हल झाला. ही एक अशी सांस्कृतिक गोष्ट आहे जी आपल्या परंपरेला जिवंत ठेवते, आणि यासाठी मी ग्रॅव्हिटी ग्रुपचे डॉ. मिहीर कुलकर्णी यांचे मन:पूर्वक अभिनंदन करतो."

या कार्यक्रमाचे प्रमुख आयोजक डॉ. मिहीर कुलकर्णी (अध्यक्ष, ग्रॅव्हिटी ग्रुप, पुणे) यांनी सांगितले, "या ऐतिहासिक कार्यक्रमाचा भाग होणे आमच्यासाठी अभिमानास्पद आहे. आपली संस्कृती आणि परंपरा हीच आपली खरी ओळख आहे. गीतरामायण आणि राम-सीता स्वयंवर यांसारख्या सादरीकरणांमुळे आपण आपल्या मूळांशी जोडलेले राहतो. प्रेक्षकांचा भरघोस प्रतिसाद आणि सकारात्मक अभिप्राय यामुळे सिद्ध होते की आजही प्रभू श्रीरामांविषयी आपल्यामध्ये अढळ श्रद्धा आणि प्रेम आहे. आम्ही भविष्यातही असे कार्यक्रम आयोजित करत राहू, जेणेकरून आपल्या पुढच्या पिढ्यांनाही या गौरवशाली परंपरेची प्रेरणा मिळेल."




कार्यक्रमात सुप्रसिद्ध संगीतकार स्व. श्री सुधीर फडके यांनी स्वरबद्ध केलेल्या आणि ग. दि. माडगूळकर यांनी रचित "सखी गीतरामायण" ची अद्वितीय सादरीकरण झाले. या संगीतमय अनुभवाने संपूर्ण वातावरण भक्तिमय आणि आनंदमय केले. त्यानंतर झालेल्या "राम-सीता स्वयंवर" च्या नाट्य सादरीकरणात भगवान श्रीरामांचे गुणगान आणि जनकपुरात झालेल्या स्वयंवराची भव्य झलक सादर करण्यात आली. देखणा मंच, संगीतमय सादरीकरण आणि भक्तिपूर्ण वातावरण यामुळे उपस्थित प्रत्येक प्रेक्षक





श्रीरामभक्तीमध्ये रंगून गेला.

या कार्यक्रमात पुणे तसेच परिसरातील हजारो भक्तांनी सहभाग घेतला. भक्तांनी अत्यंत श्रद्धेने गीतरामायणाचा आस्वाद घेतला आणि राम-सीता स्वयंवराचे मंचन मंत्रमुग्ध होऊन पाहिले. कार्यक्रमाच्या समाप्तीनंतर उपस्थित सर्वांनी प्रभू श्रीराम व माता सीता यांना वंदन करत "जय श्रीराम!" चा गजर केला.

हा भव्य कार्यक्रम पुण्याच्या सांस्कृतिक इतिहासात एक सुवर्णाक्षरांनी लिहिला गेलेला अध्याय ठरला आहे.

# पिंपरी पालिका उभारणार 'क्लायम्बिंग वॉल'

## पिंपळे सौदागरला प्रस्तावित; पाच कोटी रुपये खर्च अपेक्षित



**नेहरूनगर येथील कृत्रिम प्रस्तरारोहण भिंत धूळखात**

● महापालिकेच्या वतीने नेहरूनगर येथील अण्णासाहेब मगर स्टेडिअमच्या आवारात कृत्रिम प्रस्तरारोहण भिंतीची उभारणी करण्यात आली होती. त्यासाठी कोट्यवधी रुपयांचा खर्च करून साहित्यही खरेदी करण्यात आले. त्या ठिकाणी काही स्पर्धांचे आयोजन करण्यात आले. मात्र, काही वर्षांतच भिंतीचा वापर बंद करण्यात आला.



■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पिंपरी :** पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या वतीने पिंपळे सौदागर येथे योगा पार्कमध्ये पाच कोटी रुपये खर्च करून कृत्रिम प्रस्तरारोहण भिंत (क्लायम्बिंग वॉल) उभारण्यात येत आहे. त्या भिंतीचे परिचालन खासगी संस्थेकडे विनामूल्य २० वर्षे देण्यात आले आहे. त्यामुळे स्पर्धा आयोजन, प्रशिक्षण व इतर कामकाज संस्था पाहणार आहे.

पिंपळे सौदागर येथील योगा पार्कमध्ये कृत्रिम प्रस्तरारोहण भिंत बांधण्यात येत आहे. या संदर्भात महापालिका आयुक्त शेखर सिंह यांची भारतीय पर्वतारोहण या स्पोर्ट्स क्लायम्बिंग संस्थेचे सचिव कीर्ती पैस यांच्याबरोबर बैठक झाली. बैठकीतील चर्चेनुसार महाराष्ट्र स्पोर्ट्स असोसिएशनने कृत्रिम प्रस्तरारोहण भिंत परिचालनासाठी महापालिकेस प्रस्ताव दिला आहे. त्यास आयुक्त सिंह यांनी स्थायी समितीची मान्यता दिली आहे.

महापालिका संबंधित संस्थेबरोबर करारनामा करणार असून, तो २० वर्षांसाठी असणार आहे. संबंधित संस्था स्पोर्ट्स क्लायम्बिंगचे प्रशिक्षण देण्यासाठी प्रशिक्षक नेमणार आहे. सभागृह, स्टोअर रूम, स्वच्छतागृह व स्नानगृह, पिण्याच्या पाण्याची व्यवस्था, आवार आणि प्रतीक्षा कक्ष आदी ठिकाणचे विजेचे शुल्क संस्था भरणार आहे. शहरातील खेळाडूंना प्रशिक्षण देणे, शहरात या खेळाचा प्रसार व प्रचार करणे, पालिका शाळेतील कमीत कमी ५० आणि जास्तीत जास्त ८० विद्यार्थी-खेळाडूंना या ठिकाणी मोफत प्रशिक्षण देणे संस्थेवर बंधनकारक आहे. संस्थेला या ठिकाणी राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्पर्धांचे आयोजन करावे लागणार आहे. भिंतीच्या परिसरातील फ्लड लाइट व दिव्यांच्या खांबांसाठी लागणारी वीज, तसेच भिंतीसाठी पाणी व सुरक्षा महापालिका मोफत पुरविणार आहे. त्या ठिकाणी नव्याने काही गोष्टी आवश्यक असल्यास महापालिका विकसित करून देणार आहे. राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्पर्धा आयोजनासाठी महापालिका निधीही देणार आहे.

### मराठे विद्यालयाच्या शिरपेचात 'सुंदर' तुरा

## एन.एम.एम.एस शिष्यवृत्ती परीक्षेत 'प्रसन्न' यश!


■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** खराडी येथील गेनबा सोपानराव मोझे संस्थेच्या सुंदरबाई मराठे विद्यालयाने केंद्र शासनाच्या आर्थिक दृष्ट्या दुर्बल घटकातील इयत्ता आठवी तील विद्यार्थ्यांसाठी घेण्यात आलेल्या एन.एन.एम.एस शिष्यवृत्ती परीक्षेत घवघवीत यश संपादन केले.प्रविष्ट

परीक्षार्थी विद्यार्थ्यांमधून दहा विद्यार्थी गुणवत्ता यादी मध्ये आले असून त्यांना दरमहा एक हजार रुपये शिष्यवृत्ती मिळणार असून पुढील चार वर्षांकरिता ही शिष्यवृत्ती असणार आहे

.या परीक्षेतील एकूण वीस विद्यार्थी सारथी शिष्यवृत्तीस पात्र झाले असून त्यांना दरमहा आठशे रुपये सारथी ची शिष्यवृत्ती मिळणार आहे.

शाळेतील प्रसन्न प्रदीप चिंचणीकर या विद्यार्थ्याने १६० गुण मिळून राज्यात प्रथम पाच मध्ये येण्याचा मान मिळविला. तो पुणे जिल्ह्यात सर्वसाधारण गटातून पहिला आलेला आहे. त्याच्या यशामुळे पालक शिक्षक आणि संस्था पदाधिकारी यांनी त्याचे मनापासून कौतुक केले. ही. स्पर्धा परीक्षा आर्थिक दृष्ट्या दुर्बल गटातील मुलांसाठी असल्याने मुलांना मिळणाऱ्या



शिष्यवृत्तीचा लाभ त्यांच्या पुढील शिक्षणासाठी होईल .मुलांनी मिळविलेल्या यशामुळे पालक खूप भावूक झालेले दिसले.

वर्ग शिक्षिका बिना साळुंखे यांनी या वर्गाला नियमित मार्गदर्शन केले होते शिष्यवृत्ती धारक विद्यार्थी व त्या विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करणाऱ्या सुनील वळसे, रोहित डामरे, संजय हुंबे, विद्या कव्हेकर,भागवत घाटूळे ,नाज अत्तार, ज्योत्स्ना कोटलवार या शिक्षकांचे संस्थेचे अध्यक्ष रामभाऊ मोझे,उपाध्यक्ष ज्ञानेश्वर मोझे,शाळा समिती अध्यक्षा अलका पाटील विद्यालयाचे मुख्याध्यापक संजय सोमवंशी यांनी अभिनंदन केले.

## एआयच्या माध्यमातून प्रगती करणे शक्य : डॉ. सावंत

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** आर्टिफिशीयल इंटेलिजन्स (एआय) अर्थात कृत्रिम बुद्धिमत्ता म्हणजे कोणतीही स्पर्धा नाही, उलट त्या माध्यमातून चांगल्या प्रकारची प्रगती साध्य होऊ शकते, त्यामुळे आताच्या परिस्थितीत त्याचा योग्य लाभ घेण्यासाठी मानसिकतेमध्ये बदल करण्याची गरज असल्याचे मत महाराष्ट्र नॉलेज कॉर्पोरेशनचे प्रमुख डॉ. विवेक सावंत यांनी व्यक्त केले.

पुण्यातील महाराष्ट्रीय मंडळाचे चंद्रशेखर आगाशे शारीरिक शिक्षण महाविद्यालय (सीएसीपीई)आणि महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीचे आबासाहेब गरवारे कॉलेज ऑफ कॉमर्स यांच्यातर्फे आयोजित करण्यात आलेल्या 'बीसी टू एडी' अर्थात बिफोर चॅटजीपीटी टू एआय डिसरप्शन' या दोन दिवसीय आंतरराष्ट्रीय परिषदेप्रसंगी बीजभाषण करताना डॉ. सावंत बोलत होते. एआय अर्थात कृत्रिम बुद्धीमत्तेचे वाढते प्रमाण, त्याद्वारे होत असलेले मूलभूत बदल व नजीकच्या भविष्यातील संभाव्य धोके या पार्श्वभूमीवर नवीन तंत्रज्ञान, नवकल्पना यामध्ये एआय कसे प्रभावीपणे काम करू शकते, हे समजून घेण्याच्या उद्देशाने कोथरूड, मयूर कॉलनी येथील एमईएस शाळेच्या सभागृहात या दोन दिवसीय परिषदेचे आयोजन करण्यात आले होते.



**पुणे** विद्यार्थ्यांना पाण्यासाठी टाहो फोडावा लागत आहे. महापालिका प्रशासनाच्या या कारभाराच्या निषेधार्थ आखिल भारतीय मांजराईनगर कृती समितीचे अध्यक्ष आणि विद्यालयाचे शिक्षक राजेंद्र साळवे यांच्या मार्गदर्शनाखाली नागरिक धरणे आंदोलनाला बसले असून त्यामध्ये महिलांची संख्या लक्षणीय आहे.

# बदल ही एकमेव गोष्ट आहे जी स्थिर राहते - डॉ. सी.जयकुमार




■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

## निकमार विद्यापीठात 'एचआर सामिट-२०२५' चे उद्घाटन

**पुणे :** बांधकाम क्षेत्र भारताच्या आर्थिक विकासाचा एक महत्वाचा आधारस्तंभ म्हणून उदयास येत असून जीडीपी आणि रोजगारात महत्वपूर्ण योगदान देत आहे. आजच्या काळात बदल ही एकमेव गोष्ट आहे जी कायम स्थिर आहे." असे विचार लार्सन अँड टुब्रोचे कार्यकारी उपाध्यक्ष आणि कॉर्पोरेट एचआर प्रमुख डॉ.सी. जयकुमार यांनी व्यक्त केले.

निकमार विद्यापीठाने आयोजित केलेल्या एक दिवसीय 'एचआर समिट २०२५' च्या उद्घाटन प्रसंगी ते प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. या प्रसंगी एचआर इन्फ्लुएंसर साहिल नायर हे सन्माननीय पाहुणे म्हणून उपस्थित होते.

यावेळी निकमार विद्यापीठाचे अध्यक्ष व कुलपति डॉ. अनिल कश्यप, कुलगुरू डॉ. सुषमा एस. कुलकर्णी आणि निकमार विद्यापीठाच्या सीएसआयएआरचे अधिष्ठाता डॉ. जर्नादन कोनेर उपस्थित होते.

साहिल नायर म्हणाले," निकमार विद्यापीठाचा खरा अर्थ पाहिला तर एन म्हणजे (नॅविगेटिंग चेंज ) बदलाची दिशा, आय म्हणजे ( इंटेललॅकंचुअल क्युरियॅासिटी ) बौद्धिक कुतुहलता , सी म्हणजे ( करेज )धैर्य, एम म्हणजे (मास्टरींग अजिलिटी अडॅप्टबिलिटी) वर्चस्व, ए म्हणजे (ऑथेंटिसिटी) प्रामाणिकपणा आणि आर म्हणजे ( रेझिलिअन्स ) लवचिकता. हे येथील विद्यार्थ्यांमध्ये रूजविले जाते.

डॉ. अनिल कश्यप म्हणाले," देशाच्या जीडीपीमध्ये बांधकाम क्षेत्राचा वाटा ९ ते १० टक्के आहे. हे देशातील दुसऱ्या क्रमांकाचे सर्वात मोठे रोजगार देणार क्षेत्र आहे. म्हणूनच राष्ट्र उभारणीसाठी हे क्षेत्र सर्वात महत्वाचे असल्याने, त्यात निकमार ची भूमिका महत्वाची ठरेल. डॉ. सुषमा एस कुलकर्णी म्हणाल्या," बांधकाम क्षेत्रातील आव्हानांना तोंड देण्यासाठी उच्चशिक्षित तरूणांची गरज आहे. भविष्यातील गरजा लक्षात घेऊन, निकमार विद्यापीठ जागतिक स्तरावरील बांधकामासाठी वचनबद्ध आहे. येत्या काळात ऊर्जा, पर्यावरण, नागरी, वास्तुकला आणि सामान्य व्यवस्थापन यासारख्या विषयांमध्ये नवीन अभ्यासक्रम सुरू करण्याचा मानस आहे." या दिवसभराच्या समिटमध्ये चार महत्वाच्या पॅनेलवर चर्चा झाली. ज्यामध्ये कार्यबल परिवर्तन, कौशल्य विकासात शिक्षणाची भूमिका, नोकरीवर एआयचा परिणाम आणि करिअरमध्ये यशासाठी आवश्यक कौशल्ये या विषयांवर चर्चा झाली.

> "या क्षेत्रातील आव्हानात्मक काम लक्षात घेता प्रगतीसाठी नव्या संधी मोठ्या प्रमाणात उपलब्ध होत आहेत. त्यामुळेच सतत शिकण्याच्या संधी असतील. नेतृत्व विकास आणि उत्तराधिकार नियोजन देखील येथे समाविष्ट आहे. तसेच विविधता, समानता आणि समावेशकता महत्वपूर्ण आहे."
>
> — **डॉ. सी. जयकुमार,** कार्यकारी उपाध्यक्ष आणि कॉर्पोरेट एचआर प्रमुख, लार्सन अॅन्ड टुब्रो

## पालखी मैदानाची आळंदी देवसंस्थानकडून पाहणी



**जेजुरी :** महाराष्ट्राचे कुलदैवत असणाऱ्या खंडोबा देवाच्या जेजुरी नगरीत दरवर्षी संत ज्ञानेश्वर महाराज पालखी सोहळ्याचां मुक्काम असतो. या सोहळ्यात वारकरी बांधवांना सोयी सुविधा उपलब्ध व्हावेत यासाठी आळंदी देवसंस्थान कमिटीच्या वतीने जेजुरी येथील पालखी तळाची पाहणी करण्यात आली. संत ज्ञानेश्वर महाराज पालखी सोहळ्यासाठी जेजुरी गडाच्या पायथ्याशी असणाऱ्या ऐतिहासिक होळकर तलावाकाठी सुमारे नऊ एकर जागेत पालखी तळ विकसित करण्यात आला आहे. या सोहळ्यातील वारकरी बांधवांना सोयी सुविधा उपलब्ध व्हावेत या साठी आळंदी देवसंस्थान कमिटीच्या वतीने आज जेजुरी येथील पालखी तळाची पाहणी करण्यात आली. यावेळी आळंदी देवसंस्थान कमिटीचे प्रमुख योगी निरंजन नाथ,विश्वस्त भावार्थ देखणे, पालखी सोहळ्याचे मालक बाळासाहेब आरफळकर,बाळासाहेब चोपदार,रामभाऊ चोपदार, तहसीलदार विक्रम राजपूत ,नायब तहसीलदार सोनाली वाघ, जेजुरी नगरपरिषदेचे मुख्याधिकारी चारुदत्त इंगुले, सहायक पोलीस निरीक्षक दीपक वाकचौरे, यावेळी उपस्थित होते.

# म्हाळसाकांत योजनेचा सुधारित आराखडा लवकरच - आढळराव पाटील

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**लोणी-धामणी :** पहाडधरा (ता. आंबेगाव )येथील ग्रामदैवत श्री अंबिकामाता उत्सवाच्या निमित्ताने माजी सहकार मंत्री दिलीप वळसे पाटील यांच्या स्थानिक विकास (आमदार) निधीतून मंजूर झालेल्या दोन महत्त्वपूर्ण कामांचे भूमिपूजन उत्साहात संपन्न झाले. ग्रामदैवत अंबिका माता मंदिर सभामंडपसाठी येथे रुपये २५ लक्ष, तसेच ठाकरवाडी (पहाडदरा) येथील श्री भैरवनाथ मंदिर सभामंडपसाठी रुपये २० लक्ष या विकास कामांचे भूमिपूजन करण्यात आले.ही कामे फक्त मंदिरांचे नव्हे,तर गावाच्या सामाजिक आणि सांस्कृतिक जीवनाची गती वाढवणारी ठरणार आहेत.आंबेगाव तालुक्याचे जिल्ह्यात नव्हे तर संपूर्ण महाराष्ट्रात नावलौकिक करणारे अभ्यासू नेतृत्व म्हणजे दिलीप वळसे पाटील यांच्या माध्यमातून शिरुर,आंबेगावच्या



मातीचा कायापालट झाला ही वस्तुस्थिती आहे.डिंभे धरण तयार झाले तेव्हा पाणी वाटपाचे धोरण तयार झाले कोणत्या गावांना किती पाणी वाटप करायचे हेही निश्चित झाले.आंबेगाव मधील पूर्वेकडील आठ गावे,सातगाव पठार तसेच शिरुर मधील पाबळ व परिसरातील गावांचा त्या वेळी समावेश झाला नसल्याने ती गावे पाण्यापासून वंचीत राहिली.वळसे पाटलांनी आणि मी त्या गावांचा कुकडी प्रकल्पात समावेश करण्यासाठी अतोनात प्रयत्न केले. नुकतीच मुंबई येथे राज्याचे जलसंपदा मंत्री नामदार राधाकृष्ण विखे पाटील यांच्या बरोबर झालेल्या बैठकीत आदिवासी भागातील फुलवडे,बोरघर,कळमजाई या पाणी उपसा सिंचन योजनांबरोबर आंबेगाव तालुक्यातील पुर्व भागातील गावांसाठी महत्वाची असणारी म्हाळसाकांत योजनेची सुधारित प्रशासकीय मान्यता सुधारित आराखडा लवकर करणार असल्याचे माजी खासदार शिवाजीराव आढळराव पाटील यांनी सांगितले. यावेळी पुणे जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष विवेक वळसे पाटील,अरुण गिरे,मंचर कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती निलेश स्वामी थोरात,उपसभापती सचिन पानसरे, मंचर शहर राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष सुहास बाणखेले, आंबेगाव तालुका खरेदी विक्री संघाचे माजी अध्यक्ष भगवान वाघ, तालुका पंचायत समितीचे सदस्य रविंद्र करंजखेले, भीमाशंकर कारखाना संचालक शांताराम हिंगे, प्रमोद वळसे पाटील,बाळासाहेब मेंगडे,सागर जाधव,सरपंच मच्छिन्द्र वाघ,कैलास वाघ,गुलाब वाघ,अनिल हिंगे,मयूर सरडे, अक्षय विधाटे,आनंदा जाधव शाखा अभियंता प्रशांत लोंढे,प्रमोद वाघ, दिनेश खेडकर तसेच ग्रामस्थ उपस्थित होते.

> "राज्याचे माजी सहकार मंत्री दिलीप वळसे पाटील यांनी ग्रामस्थांनी केलेल्या मागणीनुसार ग्रामदैवत श्री अंबिका माता मंदिर,ठाकरवाडी येथील श्री भैरवनाथ मंदिर येथे सभामंडप बांधकामासाठी मोठ्या प्रमाणात निधी उपलब्ध झाला आहे. ठाकर समाजाचे जातीचे दाखले,शिक्षण सुविधा, धामणी-पहाडदरा रस्ता,अवसरी-पहाडदरा रस्ता, गावची शाळा वर्गखोल्या, कुरकुटदरा येथील पाझर तलाव,अंतर्गत रस्ते,खेळाचे साहित्य तसेच इतर विविध विकास कामांना देखील वळसे पाटील यांच्या माध्यमातून भरीव निधी उपलब्ध होऊन कामे पुर्णत्वास आहेत."
> **— विवेक वळसे पाटील,** माजी उपाध्यक्ष,जिल्हा परिषद पुणे

## न्यू इंग्लिश स्कूलचे आठ विद्यार्थी शिष्यवृत्तीसाठी पात्र



**पारगांव :** राष्ट्रीय आर्थिक दुर्बल घटक विद्यार्थ्यांसाठी घेतलेल्या शिष्यवृत्ती योजना (N.M.M.S.) परीक्षेमध्ये पारगाव तालुका दौंड येथील न्यू इंग्लिश स्कूलचे आठ विद्यार्थी शिष्यवृत्तीस पात्र झाली असल्याची माहिती शाळेचे मुख्याध्यापक कृष्णा जगदाळे यांनी दिली. केतकी योगेश काळे अदिती अतुल ताकवणे या विद्यार्थ्यांना पाच वर्षात प्रतिवर्षी १२००० प्रमाणे ६०००० शिष्यवृत्ती मिळणार आहे .तर आर्या अशोक बोत्रे, क्षितीजा हरिदास ताकवणे, अन्वेषा अभय निंबाळकर ,ईशांत शरद ताकवले ज्ञानेश्वरी राजेंद्र जगदाळे, प्रतीक्षा गणेश जगताप या विद्यार्थ्यांना प्रतिवर्षी ९६०० प्रमाणे चार वर्ष ३८ हजार ४०० रुपये शिष्यवृत्ती मिळणार आहे .याप्रसंगी स्कूल कमिटीचे सदस्य, ग्रामस्थ व विद्यालयाच्या वतीने यशस्वी विद्यार्थी व त्यांच्या पालकांचा सत्कार करण्यात आला .या विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करणारे विभागप्रमुख सुनील शिंदे ,समाजशास्त्र व बुद्धिमत्ता विषय शिक्षक संतोष भालेराव, गणित विषय शिक्षक ज्ञानदेव झगडे, विज्ञान शिक्षिका मंजुश्री देशमुख व गुरुकुल प्रमुख गोरख जाधव यांचा सन्मान करण्यात आला .विद्यालयाचे मुख्याध्यापक कृष्णा जगदाळे व पर्यवेक्षिका नूतन पठारे यांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

# उरुळी कांचन ते स्वारगेट पीएमपीएमएल बस सेवेचा शुभारंभ

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**उरुळी कांचन :** भविष्यात उरुळी कांचन येथून पुणे स्टेशन व पुणे महानगरपालिका भवन या दोन्ही मार्गावर पीएमपीएमएल बस सेवा सुरू करण्याचा आमचा प्रयत्न राहील असे प्रतिपादन पी एम पी एम एलचे हडपसर आगारप्रमुख संतोष किरवे यांनी केले, ते उरुळी कांचन ते स्वारगेट या पी एम पी एम एल बस सेवेचा शुभारंभ करताना प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. तत्कालीन महापौर शिवाजीराव भोसले यांच्या प्रयत्नातून सर्वप्रथम १९७६ साली पीएमटी बस सेवा उरुळी कांचन साठी सुरू करण्यात आली होती. हा मार्ग अतिशय फायद्यामध्ये चालत असताना देखील, त्यानंतर तीन वेळा बंद चालू च्या फेऱ्यात अडकवून सर्वसामान्य जनतेची गैरसोय केली होती. प्रवासी संघटना सातत्याने पाठपुरावा करत असताना, अधिकारी वर्ग सहकार्य करत नव्हता, मात्र पालकमंत्री अजितदादा पवार यांच्या आदेशाने कालपासून या बस सेवेचा पुन्हा चौथ्यांदा शुभारंभ करण्यात आला.

उरुळी कांचन प्रवासी संघटनेचे अध्यक्ष प्रकाश जगताप,राष्ट्रवादी काँग्रेसचे (अजित पवार) जिल्हा उपाध्यक्ष आणि यशवंत सहकारी साखर कारखान्याचे संचालक संतोष आबासाहेब कांचन व ग्रामपंचायत



उरुळी कांचन यांच्या पाठपुराव्यामुळे आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या सहकार्याने ही बस सेवा सुरू करण्यात आली आहे.

या बस सेवेमुळे उरुळी कांचन ते स्वारगेट असा थेट प्रवास करणाऱ्या विद्यार्थी, विद्यार्थिनी, व्यापारी,शेतकरी, कामगार अशा सर्वसामान्य जनतेला सोय उपलब्ध झाली आहे.ही बस सेवा स्वारगेट एसटी स्टँड समोरील पी एम पी एम एल च्या बस स्टॉप वरून प्रत्येक ४० मिनिटाला सुटणार आहे.

यशवंत सहकारी साखर कारखान्याचे अध्यक्ष सुभाष जगताप, उपाध्यक्ष किशोर उंद्रे,संचालक सुनील कांचन,हवेली तालुका राष्ट्रवादी काँग्रेसचे (अजित पवार) अध्यक्ष दिलीप वाल्हेकर,महाराष्ट्र प्रदेश सरचिटणीस गुलाब चौधरी,कदम वाकवस्ती ग्रामपंचायतचे माजी सरपंच नंदू काळभोर, जि.प.माजी सदस्य अशोक कसबे,उपसरपंच सीमा कांचन,माजी सरपंच संतोष ह.कांचन,भाऊसाहेब ल.कांचन,राजेंद्र ब.कांचन,दत्तात्रय शां.कांचन,माजी उपसरपंच संचिता कांचन,युवराज कांचन,भाऊसाहेब तुपे,रामभाऊ तुपे,सुर्यकांत थोरात आदी मान्यवरांसह ग्रामस्थ व प्रवासी बहुसंख्येने उपस्थित होते.

स्वारगेट उरुळी कांचन बस सेवा सुरू झाल्या प्रित्यर्थ सर्व मान्यवरांनी तिकीट काढून बसमधून उरुळी कांचन गावातून प्रवास करीत आनंद व्यक्त केला.

## शिक्रापुरात रंगणार बैलगाड्यांचा भव्य थरार



शिक्रापूर ता. शिरुर येथे नव्याने तयार करण्यात आलेला बैलगाडा घाट व पाहणी करताना पदाधिकारी.

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**शिक्रापूर :** शिक्रापूर ता. शिरुर येथे हनुमान देवाच्या यात्रेचा उत्सव साजरा होत असताना सध्या यात्रेमध्ये जास्त महत्व असलेल्या आणि शेतकऱ्यांच्या आवडत्या बैलगाडा शर्यतीचे आयोजन करण्यात आले असल्याने शिक्रापुरात बैलगाड्यांचा भव्य थरार रंगणार असल्याने शेतकरी व ग्रामस्थ समाधान व्यक्त करत आहेत.

शिक्रापूर ता. शिरुर येथील श्री घनोबा देवाचा उत्सव संपन्न होणार असून सदर यात्रेचे दरम्यान शेतकऱ्यांचा आवडीचा खेळ बैलगाडा शर्यतीचे आयोजन करण्यात आलेले असताना प्रथमच शिक्रापूर येथे बैलगाडा शर्यतीच्या पहिल्या क्रमांकाला दुचाकी सह अन्य बक्षिसे ठेवण्यात आलेले असल्याने यावर्षी बैलगाडा शर्यतीचा थरार चांगलाच रंगणार आहे, या वर्षी यात्रा कमिटीच्या वतीने बैलगाडा घाटाचे नव्याने बांधकाम करत बैलगाडा प्रेमींसह बैलांच्या सुरक्षिततेच्या उपाययोजना करण्यात आल्याचे यात्रा कमिटीचे संयोजक माजी तंटामुक्ती अध्यक्ष गोरक्ष सासवडे यांनी सांगितले, बैलगाडा शर्यतीसाठी अडीच लाख रुपयांच्या रोख बक्षिसह फ्रीज, जुंपता बैलगाडा, एलसिसि टीव्ही, सायकल, कुलर तसेच वेगवेगळे चषक बक्षीस म्हणून ठेवण्यात आले असून काही नामांकित बैलाचा विशेष चषक देऊन सन्मान करण्यात येणार असल्याने यात्रेतील बैलगाडा शर्यतीला विशेष रंगत येणार असल्याचे सांगत पुढील काळात बैलगाड्याची परंपरा कायम करणार असल्याचे देखील यात्रा कमिटीचे संयोजक माजी तंटामुक्ती अध्यक्ष गोरक्ष सासवडे यांनी सांगितले.

## शासकीय कर्मचाऱ्याला केली मारहाण

**शिक्रापूर :** शिरुर ग्रामीण ग्रामपंचायतचे ग्रामपंचायत पाणीपुरवठा कर्मचारी जेसीबीच्या सहाय्याने पाणीपुरवठ्यासाठी चारी खोदत असताना, सदर कर्मचारी व जेसीबी चालकाला मारहाण करुन शासकीय कामात अडथळा आणून सदर कर्मचाऱ्याला सोसायटीच्या प्रत्येक घरासमोर उठाबशा काढायला लावल्याचा खळबळजनक प्रकार घडल्याने शिरुर पोलीस स्टेशन येथे अमित जयंत डोंगरे याच्या विरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. शिरुर ग्रामीण ग्रामपंचायतचे पाणीपुरवठा कर्मचारी अंकुश कुऱ्हाडे हे श्रीनिवास सोसायटी समोर जेसीबीच्या सहाय्याने पाणीपुरवठ्यासाठी चारी खोदत असताना, अनीत डोंगरे तेथे आला. त्याने कुऱ्हाडे यांना माझ्या घराच्या पार्किंगच्या समोरचे पाईपचे काम का केले नाही असे म्हणून दमदाटी करत जेसीबी चालक नाथा शिंदे व अंकुश कुऱ्हाडे यांना दगडाने मारहाण करत जखमी केले. यावेळी अमित याने कुऱ्हाडे यांच्या ताब्यातील दुचाकीचे देखील नुकसान करत शासकीय कामात अडथळा आणला. त्याने ग्रामपंचायत कर्मचारी कुऱ्हाडे यांना दमदाटी करत सोसायटीतील प्रत्येक घरासमोर उठाबशा काढायला लावल्या. या प्रकाराबाबत शिरुर ग्रामीणचे ग्रामपंचायत पाणीपुरवठा कर्मचारी अंकुश माणिक कुऱ्हाडे यांनी शिरुर पोलिसांत फिर्याद दिल्याने पोलिसांनी अमित जयंत डोंगरे याच्या विरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

## निमगावात यात्रेनिमित्त रंगला कुस्त्यांचा जंगी आखाडा

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**कारेगाव :** निमगाव भोगी, ता.शिरुर येथील पिरसाहेब महाराजांच्या यात्रेनिमित्त आयोजित कुस्त्यांच्या जंगी आखाड्यात नामवंत पहिलवानांनी सहभाग घेत उत्सवात रंगत आणली. रविवारी, दि.३० मार्च रोजी गुढी पाडव्याच्या दिवशी शेरणी वाटपाने यात्रेस सुरुवात झाली. मंगळवारी, दि. १ रोजी रात्री ९ वाजता संदल तर ११ वाजता पिरसाहेबांची महापूजा संपन्न झाली.यात्रेच्या मुख्य दिवशी बुधवारी, दि.२ दुपारी १ वाजता शाहीर विजय शिंदे बेल्हे, ता. जुन्नर आणि शाहीर शिवाजी कवडे पाबळ, ता.पारनेर यांचा कलगीतुऱ्याचा कार्यक्रम झाला. यावेळी महिला भगिनींसह भाविक मोठया संख्येने उपस्थित होते.रात्री ८ वाजता छबिना फटाक्यांच्या आतषबाजीत काढण्यात आला. यावेळी शोभेचे दारुकाम करण्यात आले.त्यानंतर महाराष्ट्रातील नामवंत कै. तुकाराम खेडकरसह पांडुरंग मुळे (मांजरवाडी) यांचा लोकनाट्य तमाशाचा कार्यक्रम झाला. उत्सवानिमित्त मंदिर आणि मंदिर परिसराची आकर्षक विद्युत रोषणाई,विविध रंगी फुलांची सजावट करण्यात आली होती.

यात्रेची कुस्त्यांच्या जंगी आखाड्याने मोठया उत्साहात सांगता झाली.जुन्नर, आंबेगाव, शिरुर,हवेली,खेड, दौड, श्रीगोंदा व पारनेर तालुक्यातील नामवंत पहिलवानांनी उपस्थित राहून कुस्तीचे कसब दाखविले. यावेळी शंभर रुपयांपासून एकतीसशे रुपयांपर्यंत कुस्त्या लावण्यात आल्या,कुस्त्या पाहण्यासाठी पंचक्रोशीतील कुस्ती शौकीनांनी मोठी गर्दी केली होती अशी माहिती यात्रा कमिटी व ग्रामस्थांनी दिली.



**निमगाव भोगी, ता. शिरुर :** येथील पिरसाहेबांच्या यात्रेनिमित्त कुस्त्यांचा जंगी आखाडा झाला. छायाचित्र-पोपट पाचंगे,कारेगाव.

# रक्तदान वृक्षदान करीत जेजुरीनगरीत रामनवमी उत्सव सुरू

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**जेजुरी :** अखिल जेजुरी गाव श्रीराम उत्सव मंडळाचे रक्तदान शिबीर तर खंडागळे राम मंदिराचा वृक्षदान उपक्रम. पुरंदर(प्रतिनिधी)जेजुरीनगरीत सध्या रामनवमीची जय्यत तयारी असून पंचक्रोशीतील सर्वच श्रीराम मंदिरातून धार्मिक सामाजिक सांस्कृतिक उपक्रम राबविले जात आहेत अखिल जेजुरीगांव रामनवमीउत्सव मंडळाच्या वतीने जेजुरीच्या मध्यभागी असलेल्या श्री जानाईदेवीच्या प्रांगणात भव्य आशा रक्तदान शिबीर घेण्यात आले यास ग्रामस्थांने उत्तम प्रतिसाद दिला



दोनशेहून अधिक नागरिकांनी रक्तदान केले या करिता पुण्यातील अक्षय रक्तपेढीच्या वीस डॉक्टर आणि नर्स सहभागी होत्या. मंडळाच्या वतीने श्रीराम प्रतिमा देऊन सर्वांना सन्मानित करण्यात आले तर शहरातील सर्वात जुने





350 वर्षा पूर्वीच्या सरदार खंडागळे श्रीराम मंदिरात भजन कीर्तन व्यख्यान निरूपम असा विविध विषय कार्यक्रम सुरु असून दरवर्षी प्रमाणे यंदाही खंडागळे अध्यासन तर्फे उपस्तिथ शेकडो महिलांना रामतुळस वृक्ष दान करण्यात येत आहे यापूर्वी मंदिरात ह.भ.प. नारायण महाराज गोसावी यांचे प्रवचन आणि नारदिय कीर्तन सादर करण्यात आल्याची माहिती डॉ प्रसाद खंडागळे यांनी दिली. याच बरोबर जेजुरीकर श्री राम मंदिरात रामधून कार्यक्रमात नामवंत आशा शास्त्रीय गायन माध्यमातून श्रीराम चरित्र प्रस्तुत करण्यात आले.

# मोदींचे कोलंबोत पारंपरिक स्वागत





■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**श्रीलंका :** पंतप्रधान नरेंद्र मोदी थायलंड दौऱ्यानंतर तीन दिवसांच्या श्रीलंका दौऱ्यावर पोहोचले आहेत. श्रीलंकेची राजधानी कोलंबोत दाखल झाल्यानंतर तिथे त्यांचे भव्य स्वागत करण्यात आले आणि त्यांना गार्ड ऑफ ऑनर देण्यात आला. इंडिपेंडन्स स्क्वेअरवर ऐतिहासिक औपचारिक स्वागत झाल्यानंतर पीएम मोदी यांनी शनिवारी कोलंबो येथील सचिवालयात राष्ट्राध्यक्ष अनुरा कुमारा दिसानायके यांची भेट घेतली.

"सामायिक भविष्यासाठी भागीदारी वाढवणे" या दृष्टिकोनातून द्विपक्षीय संबंध मजबूत करणे, हा पीएम मोदींच्या तीन दिवसांच्या श्रीलंका दौऱ्याचा उद्देश आहे. राष्ट्राध्यक्ष दिसानायके यांच्या नेतृत्वाखाली झालेल्या औपचारिक स्वागतातून भारत-श्रीलंका द्विपक्षीय संबंधाचे महत्व प्रतिबिंबित होते. पीएम मोदी यांचा हा २०१९ नंतरचा पहिलाच श्रीलंका दौरा आहे. तर दिसानायके गेल्या डिसेंबरमध्ये भारत भेटीवर आले होते.

पीएम मोदींचा हा दौरा अशावेळी होत आहे जेव्हा तामिळनाडूने श्रीलंकेकडून कच्चाथीवू बेट परत मिळवण्याचा ठराव मंजूर केला आहे. २८५ एकर बेटाभोवती मासेमारीच्या अधिकारांबाबत दीर्घकाळ चाललेल्या वादामुळे राज्यातील मच्छिमारांसाठी हा एक भावनिक मुद्दा बनला आहे.

" गेल्या ६ महिन्यांत, आम्ही सुमारे १०० दशलक्ष डॉलर्स कर्जाचे अनुदानात रूपांतर केले आहे. आमचा द्विपक्षीय कर्ज पुनर्रचना करार श्रीलंकेच्या लोकांच्या तात्काळ मदतीसाठी आहे. आज, आम्ही व्याजदरही कमी करण्याचा निर्णय घेतला आहे. यावरून असे दिसून येते की आजही भारत श्रीलंकेतील लोकांच्या पाठीशी खंबीरपणे उभा आहे. पूर्वेकडील राज्यांच्या विकासासाठी सुमारे २.४ अब्ज श्रीलंकन रुपये अर्थसाह्य पुरविले जाईल."

**- नरेंद्र मोदी,** पीएम



### मित्र विभूषण पुरस्काराने सन्मान

- दौऱ्यात मोदींचा खास सन्मान करण्यात आला आहे. मोदींना श्रीलंकन सरकारने मित्र विभूषण पुरस्कार देऊन गौरवले आहे. एखाद्या विदेशी देशाकडून मोदींना देण्यात आलेला हा २२ वा आंतरराष्ट्रीय पुरस्कार आहे. द्विपक्षीय संबंध मजबूत करने आमि दोन देशातील संस्कृती आणि वारसाला बळकटी देण्यासाठी केलेल्या अथक प्रयत्नांसाठी मोदींना हा पुरस्कार देण्यात आला आहे.

## लेकरांदेखत आईवर सामूहिक अत्याचार



**कर्नाटक :** कर्नाटकातून एक संतापजनक बातमी समोर येत आहे. आपल्या मुलांसमोरच खाजगी बसमध्ये एका आईवर सामूहिक बलात्कार झाला आहे. बस चालक, कंडक्टर आणि हेल्परने चन्नपुरा गावाजवळ महिलेवर जबरदस्तीने लैंगिक अत्याचार केला आहे. या प्रकरणाची माहिती पोलिसांना मिळाल्यानंतर त्यांनी तपास करत तिन्ही आरोपींना बेड्या ठोकल्या आहेत. या घटनेनंतर पुन्हा एकदा महिला सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. ३१ मार्चला पीडित महिला आपल्या २ मुलांसह उच्चंगीदुर्गा मंदिरात गेली होती. दर्शन घेतल्यानंतर महिला आपल्या मुलांसोबत तेथून निघाली. सायंकाळी तेथून निघाल्यानंतर महिलेने दावणगेरे येथे परत येण्यासाठी शेवटची बस पकडली. बसमध्ये तेव्हा ७ ते ८ प्रवासी होते. सर्व प्रवासी उतरले. महिलेचा शेवटचा स्टॉप होता. नंतर बस चालकाने बस एका निर्जनस्थळी नेली. नंतर मुलांच्या तोंडात कापडाचा गोळा कोंबला. तसेच त्यांचे हातही बांधले. नंतर बस चालक, बस कंडक्टर आणि एका व्यक्तीने महिलेवर जबरदस्तीने सामूहिक बलात्कार केला. मुलांसमोरच नराधमांनी महिलेवर लैंगिक अत्याचार केला.चालक प्रकाश माडीवालारा, कंडक्टर सुरेश, हेल्पर राजशेखर यांना पकडून अरसिकरे पोलिसांच्या ताब्यात दिले. सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, एका आरोपीवर यापूर्वी सात गुन्हे दाखल आहेत.

## पंचगंगा कारखान्याचे संचालक मंडळ बरखास्त



**कोल्हापूर :** पंचगंगा सहकारी कारखान्याचे संचालक मंडळ केंद्रीय निवडणूक आयोगाने बरखास्त केले असून, नव्याने निवडणूक घ्यायचे आदेश देण्यात आले आहेत. नव्याने होणाऱ्या निवडणूक प्रक्रियेकडे लक्ष वेधले आहे.हातकणंगले तालुक्यातील पंचगंगा सहकारी बहुराज्य साखर कारखाना १८ वर्षांसाठी रेणुका शुगर्सला भाडेतत्वावर चालवण्यास दिला होता. आता तो विल्मर या कंपनीकडून चालवला जात आहे. कारखाना भाडेतत्वावर दिला असला तरी सत्तारूढ विरोधकांत राजकीय स्पर्धा गेली १५ वर्षे सुरूच आहे. या कारखान्याची निवडणूक तीन महिन्यांपूर्वी झाली होती. अनेक उमेदवारांचे अर्ज चुकीच्या पद्धतीने अवैध ठरवण्यात आले, असा तक्रार अर्ज विरोधी गटाच्या नेत्या रजनी मगदूम यांनी केंद्रीय निवडणूक आयोगाकडे केला होता. त्याआधारे कारखान्याचे संचालक मंडळ बरखास्त करून नव्याने निवडणूक घ्यायचे आदेश दिले आहेत. या निर्णयामुळे कारखान्याचे संस्थापक रत्नाप्पाण्णा कुंभार यांच्या कन्या, माजी अध्यक्षा रजनी मगदूम यांना दिलासा मिळाला असून, अध्यक्ष पी. एम. पाटील गटाला धक्का बसला आहे.

## मुंबई-सिंधुदुर्ग विमानसेवा १८ एप्रिलपासून सुरू होणार



**कणकवली :** परुळे-चिपी येथील सिंधुदुर्ग विमानतळावर येत्या 18 एप्रिलपासून एअर अलायन्सची मुंबई-सिंधुदुर्ग-मुंबई सेवा सुरू होणार आहे. एअर अलायन्सबरोबरच इंडिगो कंपनीची विमानसेवाही सिंधुदुर्गसाठी सुरू करण्याबाबत युद्धपातळीवर प्रयत्न सुरू आहेत, अशी माहिती खा. नारायण राणे यांनी पत्रकाद्वारे दिली. अलीकडेच नागरी विमान वाहतूकमंत्री के. राम मोहन नायडू यांनी याबाबत विशेष योजना अंमलात आणण्यात येईल, असे माजी केंद्रीय मंत्री, खा. नारायण राणे यांना आश्वासीत केले होते. गेल्याच आठवड्यापासून याच विमानतळावरून सिंधुदुर्ग-पुणे ही 'प्लाय-91'ची विमान सेवा सुरू झाली आहे.

## राज ठाकरेंची मनसैनिकांना राजआज्ञा



**मुंबई :** महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या दसरा मेळाव्यात मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी आपल्या मनसे सैनिकांना आदेश देत पुन्हा एकदा मराठीचा आग्रह बोलून दाखवला. आणि राज्यभरातील मनसैनिकांनी बँकांमध्ये जाऊन गोंधळ घातला. मात्र, राज ठाकरे यांनी आपली राजआज्ञा मागे घेत मराठीच्या मुद्द्यावरील आंदोलन मागे घेण्याचे आदेश दिले आहेत. राज ठाकरे यांनी या संदर्भात एक पत्र काढून हे आंदोलन थांबण्याच्या सूचना दिल्या आहेत. सरकारने बँकांना मराठीचा सन्मान करायला लावायला हवा. कायदा हातात घेण्याची आमचीही इच्छा नाही. तुम्ही बँकांना आणि इतर आस्थापनांना मराठीचा सन्मान करायला लावा, मग आम्ही कायदा हातात घेणार नाही हे नक्की. असेही मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी या पत्रातून म्हटले आहे.

# शोभायात्रेत जगदंबा संस्थानचा चित्ररथ आकर्षण

आई जगदंबा नागपूरकरांना आशेचा आणि सकारात्मकतेचा संदेश देण्यासाठी येत आहे, ही भावना श्रद्धावानाच्या मनात एक नवा प्रकाश फुलवणारी ठरेल. या निमित्ताने सर्व नागपूरकर भाविकांनी या भक्तीमय पर्वात सहभागी व्हावे, शोभायात्रेत देवीच्या दर्शनाचा लाभ घ्यावा आणि या पावन प्रसंगाचे साक्षीदार व्हावे, असे आवाहन करण्यात आले आहे.



■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नागपूर :** नागपूरच्या समृद्ध परंपरेचा भाग असलेली आणि हजारो नागरिकांच्या मनामनात श्रद्धेचे स्थान असलेली पोद्दारेश्वर राममंदिराची ५९ वी भव्य शोभायात्रा आज ६ एप्रिल रोजी मोठ्या भक्तिभावाने निघणार आहे.

या शोभायात्रेचे यंदाचे खास वैशिष्ट्य म्हणजे, या वर्षी प्रथमच महालक्ष्मी जगदंबा संस्थान, कोराडी यांच्या चित्ररथाचा समावेश करण्यात आला आहे.कोराडी येथील महालक्ष्मी जगदंबा हे विदर्भातील एक जागृत शक्तिपीठ मानले जाते. देवीची मूर्ती अत्यंत तेजस्वी, प्रसन्न आणि मनोहर असून, नवरात्रोत्सव, विजयादशमी आणि विविध सणांमध्ये हजारो भाविक येथे दर्शनासाठी येतात. श्रद्धा, शक्ती आणि समृद्धीचे प्रतीक असलेल्या या देवीच्या चित्ररथ नागपूरच्या सर्वात मोठ्या शोभायात्रेत समावेश होत आहे.

अनेक वर्षाची आणि नागपूरची ओळख ठरलेल्या श्रीराम शोभायात्रा सर्वधर्म समभावाची प्रतीक मानली जाते. मुस्लिम धर्मीय या यात्रेच्या स्वागताला येतात. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस शोभायात्रेला सुरूवात करणार आहेत.

# उबेर-ओला सेवेला विरोध

### नाशिक रोडला रिक्षामालक, चालक रस्त्यावर

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नाशिक रोड :** 'उबेर, ओला' सेवेविरोधात येथील बस व रेल्वेस्थानकातील रिक्षाचालक-मालक संघटनेने एल्गार पुकारला आहे. व्यवसाय ठप्प झालेले असून ओला, उबेर रिक्षाचालकांमुळे आमचा रोजगार निम्म्याहून कमी झाला आहे. त्यामुळे उपासमारीची वेळ आली असल्याने आंदोलन करून 'ओला, उबेर' रिक्षाचालकांना नाशिक रोडमध्ये फिरू देणार नाही, अशी प्रतिक्रिया येथील रिक्षामालकांनी नोंदवली आहे.

नाशिक रोड रेल्वे स्टेशन आणि बस स्टेशन येथे किमान ४०० रिक्षाचालक रोज व्यवसाय करतात. यामध्ये रिक्षाचालकांची दुसरी तिसरी पिढी कार्यरत आहे. येथे ओला, उबेर सेवेला आरटीओने परवानगी दिलेली नाही. तरी अवैध पद्धतीने व्यवसाय करत आहेत. त्यामुळे प्रशासनाने यावर बंदी घालावी, अशी मागणी नाशिक रोड येथील रिक्षाचालक-मालक संघटनेने केली आहे.

यासंदर्भात आरटीओ आणि प्रशासनाची भेट घेऊन निवेदन देणार असल्याचे विनोद भदाणे, सनी वाघ, मोहम्मद सय्यद, रशीद शेख, इम्तियाज खान, सुधा जाधव, किशोर खडताळे, चंद्रकांत गायकवाड, पोपट सोनकांबळे, बंडू गोसावी यांच्यासह रिक्षाचालकांनी सांगितले आहे.

" नाशिक रोडला उबेर, ओलाची एकही रिक्षा फिरू देणार नाही. आमची दुसरी-तिसरी पिढी रिक्षा व्यवसायावर पोट भरते आहे. त्यामुळे प्रशासनाने गंभीर दखल घेत कार्यवाही करावी. अन्यथा, आंदोलन करू.

**- विनोद भदाणे,** रिक्षाचालक, नाशिक रोड

# गोंदिया-बल्लारशहा मार्गाचे दुहेरीकरण

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** गोंदिया, भंडारा, गडचिरोली आणि चंद्रपूर जिल्ह्यांसह मराठवाडा व तेलंगणमधील अनेक जिल्ह्यांमधील आर्थिक उलाढालींना चालना देणाऱ्या २४० किमी लांबीच्या आणि चार हजार ८१९ कोटी रुपयांच्या गोंदिया-बल्लारशहा रेल्वेमार्ग दुहेरीकरणाच्या प्रकल्पाला केंद्रीय मंत्रिमंडळाने मंजुरी दिली. प्रस्तावित गोंदिया-बल्लारशहा दुहेरीकरण प्रकल्पाच्या मार्गावर २९ स्थानके, ३६ पूल, ३३८ लहान-मोठे पूल आणि ६७ अंडरपासचा समावेश असेल. या रेल्वेमार्गाची एकूण लांबी २६८ किमी इतकी असेल.

"या प्रकल्पामुळे गडचिरोली, वडसा बल्लारशहा भागातील आर्थिक उलाढालींना चालना मिळेल. नागझिरा अभयारण्य आणि नवेगाव राष्ट्रीय उद्यानासारख्या पर्यटनस्थळांपर्यंत सहज पोचता येईल तसेच विदर्भ आणि मराठवाड्यासह तेलंगणमधील अनेक जिल्ह्यांतील आर्थिक उलाढालींना चालना मिळेल. जबलपूर ते अयोध्या पुढच्या भागाचा विस्तृत प्रकल्प अहवाल केला जाईल.

भारताच्या सीमावर्ती गावांच्या विकासासाठी हाती घेण्यात आलेल्या 'व्हायब्रंट व्हिलेज' कार्यक्रमाच्या दुसऱ्या टप्प्यात सहा हजार ८३९ कोटी रुपये खर्चून दोन हजार गावांचा धोरणात्मक विकास होणार आहे.



**पुणे** राज्याचे उद्योग, मराठी भाषा मंत्री उदय सामंत यांनी कॉलेज ऑफ इंजीनिअरिंग मैदानात डिपेक्स राज्यस्तरीय प्रदर्शनाला भेट देऊन प्रदर्शनाची पाहणी केली. राज्याच्या विविध भागातील महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या प्रकल्पांबाबत माहिती घेत त्यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधला.

# व्यावसायिक अभ्यासक्रम प्रवेशासाठी मुंबई, पुणेमधून सर्वाधिक अर्ज




■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**मुंबई :** बीबीए, बीसीए, बीएमएस, बीबीएम या व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठी गतवर्षी प्रथमच राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षामार्फत प्रवेश प्रक्रिया राबविण्यात आली. मात्र अनेक विद्यार्थ्यांना याची माहिती नसल्याने दोन टप्प्यात घेण्यात आलेल्या या परीक्षेला विद्यार्थ्यांचा चांगला प्रतिसाद मिळाला होता.

मात्र यंदा या अभ्यासक्रमांसाठी विद्यार्थ्यांचा गतवर्षीच्या तुलनेत फारच कमी प्रतिसाद मिळाला आहे. यंदा राज्यभरातून ६७ हजार ३६५ विद्यार्थ्यांनी नोंदणी केली आहे. यामध्ये पुणे, मुंबई, ठाणे शहरातून सर्वाधिक तर गडचिरोली, सिंधुदुर्ग, भंडारा, जालना, हिंगोली या जिल्ह्यातून सर्वात कमी विद्यार्थ्यांनी नोंदणी केली आहे.

राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षामार्फत बीबीए, बीसीए, बीएमएस, बीबीएम या व्यावसायिक अभ्यासक्रमासाठी राबविण्यात आलेल्या नोंदणी प्रक्रियेला गतवर्षीच्या तुलनेत विद्यार्थ्यांचा कमी प्रतिसाद मिळाला आहे. या अभ्यासक्रमांसाठी २५ डिसेंबर २०२४ ते २० मार्च २०२५ पर्यंत ऑनलाईन अर्ज नोंदणी प्रक्रिया राबविण्यात आली होती.

- अर्ज नोंदणी प्रक्रियेमध्ये राज्यभरातून ६७ हजार ३६५ विद्यार्थ्यांनी नोंदणी केली आहे.
- सर्वाधिक नोंदणी पुण्यातून १३ हजार १९९ विद्यार्थ्यांनी केली आहे. त्याखालोखाल मुंबईतून १२ हजार ७७२ आणि ठाण्यातून ७ हजार ८३ विद्यार्थ्यांनी नोंदणी केली आहे.
- नागपूरमधून ३१३४ व्यावसायिक अभ्यासक्रमांसाठी अर्ज भरले आहेत.
- सर्वात कमी प्रतिसाद गडचिरोली, सिंधुदुर्ग, भंडारा, जालना, हिंगोली या पाच जिल्ह्यांमधून मिळाला आहे.
- गडचिरोलीतून १२२ विद्यार्थी आणि सिंधुदुर्गातून १७६ विद्यार्थ्यांनी या व्यावसायिक अभ्यासक्रमासाठी नोंदणी अर्ज केला आहे.
- रत्नागिरीतही जेमतेम ३५६ विद्यार्थ्यांनी या अभ्यासक्रमांच्या प्रवेश परीक्षेसाठी अर्ज केले आहेत.







# दिल्लीचा चेपॉकवर ऐतिहासिक विजय

## अक्षर पटेलच्या संघाची आयपीएल २०२५ मध्ये विजयाची हॅटट्रिक : चेन्नईचा सलग तीसरा पराभव

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**चेन्नई :** दिल्ली कॅपिटल्सच्या संघाने बलाढ्य चेन्नई सुपर किंग्सचा २५ धावांनी मोठा पराभव केला आहे. यासह दिल्ली कॅपिटल्सने विजयाची हॅटट्रिक साधली आहे. चेन्नई सुपर किंग्स संघाला त्यांच्या घरच्या मैदानावर पुन्हा एकदा मोठ्या पराभवाला सामोरे जावे लागले आहे. दिल्ली कॅपिटल्स संघाने या विजयासह १५ वर्षांनंतर चेपॉकच्या मैदानावर विजयाची नोंद केली. दिल्लीने दिलेल्या १८४ धावांचा पाठलाग करताना चेन्नईचा संघ २० षटकांत ५ विकेट्स गमावत १५८ धावा केल्या.



दिल्ली कॅपिटल्सने अष्टपैलू कामगिरी करत चेन्नईला पराभवाचा दणका दिला. यासह दिल्लीने यंदाच्या मोसमात विजयाची हॅट्ट्रिक नोंदवून गुणतालिकेत पहिले स्थान गाठले. त्याचवेळी चेन्नईला सलग तिसऱ्या पराभवाला सामोरे जावे लागले आहे. धोनीसाठी हा सामना देखील खास होता कारण पहिल्यांदाच धोनीचे आई-वडील त्याला पाहण्यासाठी स्टेडियममध्ये आले होते, पण त्यांच्यासमोर धोनीला संघासाठी विजयी कामगिरी करता आली नाही.

चेपॉकवर झालेल्या या सामन्यात दिल्ली कॅपिटल्सने प्रथम फलंदाजी करताना २० षटकांत १८३ धावा केल्या. दिल्लीसाठी, त्यांचा नवा स्टार खेळाडू केएल राहुलला यावेळी सलामीला उतरावे लागले, कारण सलामीवीर फाफ डू प्लेसिस दुखापतीमुळे सामना खेळणार नव्हता. राहुलने या संधीचा फायदा घेत कठीण परिस्थितीतही उत्कृष्ट अर्धशतक झळकावले.

चेपॉकवर झालेल्या या सामन्यात दिल्ली कॅपिटल्सने प्रथम फलंदाजी करताना २० षटकांत १८३ धावा केल्या. दिल्लीसाठी, त्यांचा नवा स्टार खेळाडू केएल राहुलला यावेळी सलामीला उतरावे लागले, कारण सलामीवीर फाफ डू प्लेसिस दुखापतीमुळे सामना खेळणार नव्हता. राहुलने या संधीचा फायदा घेत कठीण परिस्थितीतही उत्कृष्ट अर्धशतक झळकावले. राहुलने ५१ चेंडूत ६ चौकार आणि ३ षटकारांच्या मदतीने ७७ धावांची महत्त्वपूर्ण खेळी केली. त्याच्याशिवाय अभिषेक पोरेलने झटपट ३३ धावा केल्या, तर ट्रिस्टन स्टब्स, कर्णधार अक्षर पटेल आणि समीर रिझवी यांनीही महत्त्वपूर्ण योगदान दिले. यासह संघाने १८३ धावांचा टप्पा गाठला.

अखेरच्या षटकांमध्ये मथीशा पथिरानाने दिल्लीच्या धावसंख्येवर अंकुश ठेवत मोठी धावसंख्या करण्यापासून रोखले, पण सीएसके संघाचे फलंदाज मात्र ही धावसंख्या गाठण्यातही अपयशी ठरले. खलील अहमदने २ विकेट्स तर जडेजा, नूर अहमद, मथीशा पथिराना यांनी प्रत्येकी १-१ विकेट घेतली.

# व्हि-एड्ज क्रिकेट क्लब संघाला विजेतेपद !



**पुणे :** ट्वेन्टीफोर स्पोटर्स मॅनेजमेंट तर्फे आयोजित 'कोद्रे फार्म्स करंडक' खुल्या गटातील मुलांच्या २५-२५ षटकांच्या आंतरक्लब क्रिकेट स्पर्धेत अभिमन्यु जाधव याने फटकावलेल्या १६३ धावांच्या जोरावर व्हि-एड्ज क्रिकेट क्लबने क्रिकस्टार रायझिंग क्रिकेट क्लबचा १२१ धावांनी सहज पराभव करून विजेतेपद मिळवले. सिंहगड रोड येथील कोद्रे फार्म्स क्रिकेट मैदानावर झालेल्या या स्पर्धेत पहिल्यांदा फलंदाजी करताना व्हि-एड्ज क्रिकेट क्लबने ३२४ धावांचा डोंगर उभा केला. अभिमन्यु जाधव याने ६७ चेंडूत १८ चौकार व ११ षटकारांसह १६३ धावांची खेळी केली. त्याला दुसऱ्या बाजुने राहूल सोनावणे (४० धावा) आणि ऋतुराज धुलगूडे (२९ धावा) यांनी साथ दिली. या आव्हानाचा पाठलाग करताना क्रिकस्टार रायझिंग क्लबचा डाव २०३ धावांवर मर्यादित राहीला. संघाकडून सागर कांबळे (७१ धावा), वैभव बेनबरू (४१ धावा) यांनी प्रतिकार केला. स्पर्धेचे पारितोषिक वितरण पीडीसीएचे सभासद कैलास येवले आणि ट्वेन्टीफोर स्पोटर्स मॅनेजमेंटचे संचालक उदय म्हात्रे यांच्या हस्ते करण्यात आले. विजेत्या व्हि-एड्ज क्रिकेट क्लब आणि उपविजेत्या क्रिकस्टार रायझिंग क्लब या संघांना करंडक आणि मेडल्स् देण्यात आले.

# यश क्रिकेट क्लब, पवार फाउंडेशन संघांचे विजय

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** पवार फाउंडेशन आणि युवा पर्व फाउंडेशन आयोजित युवा पर्व चषक १४ वर्षाखालील क्रिकेट स्पर्धेत साखळी फेरीत यश क्रिकेट क्लब, पवार फाउंडेशन या संघांनी आपापल्या प्रतिस्पर्धी संघांचा पराभव करून आगेकूच केली.

राजगड स्पोर्टस अकादमी, आव्हाळवाडी येथे सुरू असलेल्या या स्पर्धेत साखळी फेरीत पहिल्या लढतीत तुळशीराम राठोड(११२धावा) याने केलेल्या शतकी खेळीच्या जोरावर यश क्रिकेट क्लब संघाने जेके क्रिकेट क्लब संघाचा २३५ धावांनी धुव्वा उडविला. दुसऱ्या सामन्यात स्वराज शिंदे(८०धावा व १-११) याने केलेल्या अष्टपैलू खेळीच्या जोरावर पवार फाउंडेशन संघाने पाटोळे क्रिकेट क्लब संघाचा ४१धावांनी पराभव केला.



**निकाल: साखळी फेरी:**

यश क्रिकेट क्लब: ४९.३षटकात सर्व बाद २९५धावा(तुळशीराम राठोड ११२(९३,२०×४,१×६), अर्जुन बदुरे ८१(८०,१३×४), विराट वानखेडे ४-७२, ओंकार घुले २-३५, अविष्कार भगत २-४०) वि.वि.जेके क्रिकेट क्लब: २३.२ षटकात सर्वबाद ६० धावा(मयूर सासवडे १२, पूजन सोनी ५-७, धनंजय कुमार २-७, ओंकार रूपनूर २-९); सामनावीर - तुळशीराम राठोड; यश क्रिकेट क्लब संघ २३५ धावांनी विजयी.

# भारताच्या हितेशची पदक निश्चिती; विश्वचषक बॉक्सिंग स्पर्धेच्या अंतिम फेरीत

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** वजनी गट बदलल्यानंतरही राष्ट्रीय विजेत्या हितेशने (७० किलो) सर्वोत्तम तंत्रासह खेळ करताना विश्वचषक बॉक्सिंग स्पर्धेची अंतिम फेरी गाठली. जागतिक बॉक्सिंगच्या स्थापनेनंतर होणाऱ्या पहिल्याच विश्वचषक स्पर्धेत अंतिम फेरी गाठणारा हितेश पहिला भारतीय बॉक्सिंगपटू ठरला. त्यामुळे त्याचे पदकही निश्चित झाले आहे.

ब्राझीलमध्ये सुरू असलेल्या या स्पर्धेत हितेशने परिपूर्ण तंत्र आणि कौशल्यासह फ्रान्सच्या माकन ट्राओरेवर एकतर्फी वर्चस्व राखत विजय मिळविला. हितेशने ऑलिम्पिकपटू ट्राओरेविरुद्ध सावध पवित्रा घेतला होता. तुलनेत ट्राओरे सुरुवातीपासून कमालीचा आक्रमक खेळला. यामुळे हितेशला



खेळाच्या वेगावर नियंत्रण राखणे शक्य झाले. तिसऱ्या आणि पाचव्या फेरीत त्याला पेनल्टी गुणांचा फायदा झाला.

हितेशचे तंत्र आणि नियोजन इतके अचूक होते की पाचही फेऱ्यांत त्याने एकदाही ट्राओरेचे पंचेस थेट शरीरावर बसणार नाहीत याची काळजी घेतली. यामुळेच चार फेऱ्यांतील निकाल २८-२८ असा बरोबरीत राहूनही पंचांचा कौल हितेशच्या बाजूने राहिला. अखेरच्या फेरीत हितेशने वर्चस्व राखत २९-२७ असा विजय मिळविला. विजेतेपदासाठी आता त्याची गाठ इंग्लंडच्या ओडेल कामराशी पडणार आहे.

उपांत्य फेरीत भारताच्या अन्य तीन बॉक्सिंगपटूंना मात्र अपयश आले. अपेक्षा उंचावलेल्या जदुमणी सिंहला उझबेकिस्तानच्या माजी आशियाई विजेत्या असिबेक जालीलोवकडून २-३ असा पराभव पत्करावा लागला. विशालला उझबेकिस्तानच्याच तुराबेक खाबीबुलाएवकडून ९० किलो, तर सचिनला पोलंडच्या पावेल ब्रॅशकडून ६० किलो वजनी गटात एकतर्फी पराभवाचा सामना करावा लागला.

# पहिल्या दिवशी एसके फ्लिपर्स, एसएसआर डॉल्फिन्स संघ आघाडीवर



**पुणे :** पूना क्लब यांच्या वतीने आयोजित तिसऱ्या द पूना क्लब स्विमिंग लीग २०२५ स्पर्धेत गटसाखळी फेरीत अ गटात एसके फ्लिपर्स संघाने १६९ गुणांसह, तर ब गटात एसएसआर डॉल्फिन्स संघाने १९० गुणांसह आघाडी प्राप्त केली आहे. पूना क्लब स्विमिंग पूल या ठिकाणी सुरु असलेल्या या स्पर्धेत साखळी फेरीत अ गटात राह्यान खैराज, रायान संघवी, रोहन माळी, प्रमीत सूद, जेशा शहा यांच्या सुरेख कामगिरीच्या जोरावर एसके फ्लिपर्स संघाने १६९ गुणांसह आघाडी मिळवली. तर, याच गटात अडवाणी स्प्लॅश टायटन्स संघाने १५५ गुणांसह दुसरे, अद्विक परमार ऑल स्टार्स संघाने १५२ गुणांसह तिसरे स्थान मिळवले. ब गटात एसएसआर डॉल्फिन्स संघाने १९० गुणांसह आघाडी प्राप्त केली. तर, रियल रिच संघाने १५० गुणांसह दुसरे आणि जेट्स संघाने १४८ गुणांसह तिसरे स्थान मिळवले. याआधी स्पर्धेचे उदघाटन पूना क्लबचे अध्यक्ष गौरव गढोक, पूना क्लबच्या क्रीडा विभागाचे चेअरमन तुषार आसवाणी, अमित रोपलेकर आणि मुख्य कार्यकारी अधिकारी व सचिव कर्नल सरकार यांच्या हस्ते करण्यात आले.



# पांड्याचा इतिहास! कुंबळेचा १६ वर्षांपूर्वीचा विक्रम मोडला; पहिलाच कर्णधार ठरला

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** हार्दिक पांड्याने इंडियन प्रीमिअर लीगच्या लखनऊ सुपर जायंट्सविरुद्धच्या सामन्यात ऐतिहासिक कामगिरी केली. हार्दिकने आजच्या सामन्यात ५ विकेट्स घेतल्या आणि आयपीएलच्या इतिहासात आतापर्यंत एकाही कर्णधाराला न जमलेली कामगिरी केली. त्याने १६ वर्षांपूर्वी अनिल कुंबळेने नोंदवलेला विक्रम मोडला.

मिचेल मार्शने पहिल्या षटकात मिळालेल्या जीवदानाचा फायदा उचलला. त्याने ३१ चेंडूंत ९ चौकार व २ षटकारांच्या मदतीने ६० धावांची वादळी खेळी केली. पण,



रोहित शर्माच्या टिप्सनंतर मुंबईच्या गोलंदाजांनी चेंडूता वेग कमी केला अन् विकेट्स मिळवल्या. हार्दिक पांड्याने स्लोव्हर बाऊन्सरवर निकोलस पूरनला ( १२) झेलबाद केले. हार्दिकच्या संथ चेंडूवर रिषभ ( २) झेलबाद झाला. आयुष बदोनीने पु १९ चेंडूंत ४ चौकारांसह ३० धावांची खेळी केली.

एडन मार्करमने संयमी खेळ करताना ३८ चेंडूंत २ चौकार व ४ षटकारांच्या मदतीने ५३ धावा केल्या. हार्दिकने शेवटच्या षटकात आणखी दोन विकेट्स घेताना पाच विकेट्सचा कोटा पूर्ण केला. आयपीएलमध्ये एका सामन्यात पाच विकेट्स घेणारा तो पहिलाच कर्णधार ठरला.

हार्दिकने कर्णधार म्हणून आयपीएल सामन्यात ३ वेळा ३ किंवा त्यापेक्षा विकेट्स घेतल्या आडेत. शेन वॉर्नने पाचवेळा असा पराक्रम केला आहे. हार्दिकने आज अनिल कुंबळे व युवराज सिंग यांच्याशी बरोबरी केली. हार्दिकच्या नावावर एकूण कर्णधार म्हणून ३० विकेट्स घेतल्या आणि याही विक्रमक कुंबळेशी बरोबरी केली. शेन वॉर्न ५७ विकेट्ससह अव्वल आहे.हार्दिकने आज आर अश्विन ( २५), पॅट कमिन्स (२१) व झहीर खान ( २०) यांना मागे टाकले.

# जस्टीन लँगरला पत्रकार परिषदेदरम्यान आईचा फोन

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** शुक्रवारी झालेल्या आयपीएल लढतीत लखनौनं मुंबईला नमवलं. सामन्यानंतर लखनौचे प्रशिक्षक जस्टीन लँगर पत्रकार परिषदेत बोलत होते. पत्रकारांचे मोबाईल लँगर यांच्यासमोरच्या टेबलावर रेकॉर्डिंगसाठी ठेवले होते. त्यापैकी एका फोनवर कॉल आला. त्यानंतर जे घडलं ते गंमतशीर होतं.

लँगर बोलत असताना एका पत्रकाराच्या फोनवर आईचा कॉल आला. 'आईचा फोन आहे, कोणाची तरी आई कॉल करते आहे. मी फोन उचलू का'? असं लँगर यांनी विचारलं. त्यांनी फोन उचलला आणि म्हणाले, 'आई, रात्रीचे १२ वाजून गेलेत. मी पत्रकार परिषदेत आहे', असं बोलून लँगर यांनी कॉल ठेवला आणि हॉलमध्ये हास्यकल्लोळाची लाट उसळली.

फोन ठेवताच लँगर यांनी मयांक यादवबद्दल बोलायला सुरुवात केली. ते म्हणाले, 'मयांक यादव हा लखनौ सुपरजायंट्स संघाचा महत्त्वपूर्ण शिलेदार आहे. मयांकच्या भन्नाट वेगाने सगळ्यांना प्रभावित केलं. मात्र दुखापतीमुळे मयांक त्या हंगामात खेळू शकला नाही. आताही दुखापतीमुळे तो बंगळुरूच्या नॅशनल क्रिकेट अकादमीमध्येच आहे. मयांकची तब्येत वेगाने सुधारतो आहे. भारतीय क्रिकेट आणि आयपीएलसाठी ही चांगली गोष्ट आहे.

# रोहित आरसीबी विरुद्धच्या सामन्याला मुकणार? मुंबईच्या कोचने दिले अपडेट्स

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** आयपीएलमध्ये शुक्रवारी झालेल्या मुंबई इंडियन्स विरुद्ध लखनऊ सुपर जायंट्स सामन्यात रोहित शर्माला दुखापतीमुळे संघाबाहेर बसावे लागले होते. सरावादरम्यान त्याच्या गुडघ्याला दुखापत झाल्याची माहिती हार्दिक पंड्याने दिली होती. अशातच आता रोहित शर्मा आरसीबीविरुद्धच्या सामन्यालाही मुकण्याची शक्यता आहे. संघाचे मुख्य प्रशिक्षक माहेला जयवर्धने यांनी रोहितच्या दुखापतीबाबत अपडेट दिले आहेत.

सामन्यानंतर माहेला जयवर्धने यांनी माध्यमांशी संवाद साधला.



यावेळी त्यांना रोहितच्या दुखापतीबाबत विचारण्यात आलं. यासंदर्भात बोलताना रोहितची दुखापत गंभीर नसल्याची माहिती त्यांनी दिली. तसेच तो लवकरात लवकर बरा होईल, अशी आम्हाला अपेक्षा आहे, असेही ते म्हणाले.

"सरावादरम्यान रोहित शर्माच्या गुडघ्याला दुखापत झाली. काल त्याने फलंदाजीचा प्रयत्न केला, पण त्याला अस्वस्थता जाणवत होती. दुखापत गंभीर नसली तरी खबरदारी म्हणून संघ व्यवस्थापनाने त्याला आणखी काही दिवस विश्रांती देण्याचा निर्णय घेतला आहे. तो लवकर बरा होईल, अशी आम्हाला आशा आहे," अशी प्रतिक्रिया माहेला जयवर्धने यांनी दिली. दरम्यान, यंदाच्या आयपीएलमध्ये रोहित शर्माचे प्रदर्शन निराशाजनक राहिले आहे. त्याने तीन सामन्यांत ३० पेक्षा कमी धावा केल्या आहेत. गुजरातविरुद्धच्या सामन्यात त्याने ८ धावा केल्या, तर चेन्नई सुपर किंग्जविरुद्ध तो खातेही उघडू शकला नाही.

## न्यूझीलंडच्या 'बी' टीमने जगासमोर वस्त्रहरण केले

# १२ खेळाडूंसह खेळले, तरीही पाकिस्तानी हरले!

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** पाकिस्तान संघाला तिसऱ्या वन डे सामन्यांत न्यूझीलंडने पराभूत केले. न्यूझीलंडने ही मालिका ३-० अशी जिंकली आणि पाकिस्तानची पुन्हा जगासमोर लाज गेली. न्यूझीलंडच्या ८ बाद २६४ धावांचा पाठलाग करताना पाकिस्तानचा संपूर्ण संघ ४० षटकांत २२१ धावांवर तंबूत परतला. विशेष म्हणजे पाकिस्तान या सामन्यात १२ खेळाडूंसह खेळला आणि तरीही ४३ धावांनी त्यांना हार पत्करावी लागली.



न्यूझीलंडने ४२ षटकांत ८ बाद २६४ धावा केल्या. रिस मारीयूने ६१ चेंडूंत ५८ धावा करून चांगली सुरूवात करून दिली. हेन्री निकोल्स ( ३१) व डॅरिल मिचेल ( ४३) टीम सेइफर्ट ( २६) व कर्णधार मिचेल ब्रेसवेल ( ५९) यांच्या खेळीने न्यूझीलंडने ही धावसंख्या उभी केली. पाकिस्तानच्या आकिफ जावेदने सर्वाधिक ४ विकेट्स घेतल्या, तर नसीम शाहने दोन बळी टिपले.

पाकिस्तानला सुरुवातीलाच झटका बसला. इमाम-उल हकला रिटायर्ड हर्ट होऊन मैदान सोडावे लागले. इमामला रिप्लेसमेंट म्हणून उस्मान खान मैदानावर आला, परंतु तो १२ धावांवर बाद झाला. अब्दुल्लाह शफिक व बाबर आझम यांनी दमदार खेळ केली. बाबरने ५८ चेंडूत अर्धशतक पूर्ण केले, परंतु मिचेल ब्रेसवेलने त्याला बाद केले. शफिक ३३ धावांवर माघारी परतला. कर्णधार मोहम्मद रिझवान ( ३७) व तय्यब ताहीर यांच्या व्यतिरिक्त अन्य फलंदाज अपयशी ठरले.

नसीम शाहने १७ धावा केल्या, परंतु पाकिस्तानचा संघ ४० षटकांत २२१ धावांवर ऑल आऊट झाला. बेन सिअर्सने ३४ धावांत ५ विकेट्स घेतल्या. जेकब डफीने दोन बळी टिपले. मिचेल ब्रेसवेल, मुहम्मद अब्बास व डॅरिल मिचेल यांनी प्रत्येकी १ विकेट घेतली.

#रा